Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

* वर्ष ५४ * अंक २५५ * * नागपूर * | गुरुवार, दिनांक १२ डिसेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख
खरीखरी..

## आता मल्होत्रा पर्व

गेली सहा वर्ष रिझर्व बँकेचे गव्हर्नर म्हणून शक्तिकांत दास हे काम पाहत होते. त्यांची कारकीर्द आज संपलेली आहे. आता रिझर्व बँकेच्या गव्हर्नर पदी संजय मल्होत्रा यांना निवडण्यात आलेले आहे. रिझर्व बँकेचे गव्हर्नरपद हे देशातील शक्तिशाली पदांपैकी एक आहे. संजय मल्होत्रा आतापर्यंत अर्थ मंत्रालयामध्ये संकटमोचक म्हणून काम करत राहिलेले आहेत. देशाचे अंदाजपत्रक अर्थमंत्री मांडत असले. तरी त्यांच्या मागे ज्या पद्धतीने मल्होत्रा साहेबांनी किल्ला लढवला. त्यामुळेच त्यांना हे पद मिळाले असावे. या सरकारने ज्याप्रमाणे अनेक क्रिमिनल कायद्यात बदल केले. त्याच प्रमाणे सध्या कर प्रणालीतही बदल करण्यात आलेले आहेत. मल्होत्रा यांनीच हे कार्य केले आहे, हे जगजाहीर आहे. जुन्या आयकर कायद्याच्या ऐवजी नवीन अत्यंत सोपा आणि सरळ असा कायदा त्यांनी आणला. ज्या ज्या प्रश्नांची उत्तरे पत्रकारांना द्यायची होती. त्याही बाबतीत मल्होत्रा यांनी आपले कर्तव्य अत्यंत सूत्रबद्धपणे निभावले. जीएसटी चा कायदा सुरू झाल्यानंतर त्याच्या अध्यक्षपदी अर्थमंत्री असतात. पण या जीएसटीच्या बैठकीत राज्याचे अर्थमंत्री किंवा इतर अधिकारी यांचा समन्वय राखण्याचे कार्य मल्होत्रा करीत असत. बहुदा त्यांच्या या कामगिरीमुळेच त्यांना दिल्लीहून मुंबईला पाठवण्यात आलेले असावे. मल्होत्रा यांनी देशाच्या अनेक महत्त्वपूर्ण पदावर काम केलेले आहे. केंद्रात अनेक महत्त्वाची पदे भूषवल्यावर कालपर्यंत ते सर्वोच्च पदावर होतेच. आता शक्तिकांत दास यांच्यानंतर रिझर्व बँकेचा कारभार तेवढ्याच गतीने चालवणे गरजेचे आहे. देशातील अर्थकारण सध्या म्हणावे म्हणजेच ज्या पद्धतीने चालावे. त्या पद्धतीने चालत नाही, असा जो आरोप होतो. त्याला उत्तर देण्याचे कर्तव्य मल्होत्रा यशस्वीपणे करतील अशी आशा सरकारला वाटते. सध्या देशाचा विकासदर साडेपाच टक्क्यांपेक्षाही कमी आहे. त्यामुळे देशाच्या औद्योगिक विकासासाठी सध्याचे जे व्याजदर आहेत. त्यात कपात करणे गरजेचे आहे. व्याज कपातीसाठी सध्या जबरदस्त मागणी करण्यात येत आहे. ही व्याजाची दरकपात केल्याशिवाय आता आपल्यासमोर दुसरा पर्याय नाही. शक्तीकांत दास यांनी जवळ जवळ दोन वर्षापासून रिझर्व बँकेची परिस्थिती 'जैसे थे' ठेवलेली आहे. आता यापुढे पुढील दोन महिन्यात पतधोरण ठरवण्यासाठी बैठक होणार आहे. तेव्हा देशाचा अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वीच बहुधा मल्होत्रा यांना व्याजांचे दर खाली आणावे लागतील. कर प्रणालीत ज्याप्रमाणे मल्होत्रा यांनी सुधारणा केल्या. तेच कार्य ते आताही करतील यात शंकाच नाही. देशाची अर्थव्यवस्था सुदृढ करण्यासाठी त्वरित पावले उचलावी लागणार आहेत. मल्होत्रा ही सर्व कामे यशस्वीपणे करतील, याबद्दल तिळमात्र शंका घेण्याचे कारण नाही. शासन, प्रशासन आणि जनता यांच्यातील दुवा म्हणून मल्होत्रा यांची गणना होईल असे आम्हाला असे वाटते. त्यासाठी त्यांना खूप खूप शुभेच्छा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## संचारबंदी, इंटरनेटही बंद, दगडफेक, पोलिसांचा लाठीमार

# परभणी बंदला हिंसक वळण

### जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलक महिलांची धडक

### एसटीच्या बस फेऱ्या बंद

■ **वृत्तसंस्था, परभणी, दि. १० :**
परभणीतील बंदला हिंसक वळण लागले आहे. आंदोलकांकडून शहरातील काही दुकानांची तोडफोड करण्यात आली. तर काही ठिकाणी वाहनांची जाळपोळ करण्यात आली आहे. जमाव पांगवण्यासाठी पोलिसांकडून अश्रू धुरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. मात्र, जमावाकडून पोलिसांच्या दिशेने दगडफेक करण्यात आली. दंगल नियंत्रक पथकाला पाचारण करण्यात आले असून परिस्थिती नियंत्रणात आली आहे.



परभणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ असलेल्या संविधानाच्या प्रस्ताविकेची मंगळवारी समाजकंटकाकडून विटंबना करण्यात आली. याच्या निषेधार्थ बुधवारी परभणी बंदचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला आज अचानक हिंसक वळण लागले.

आंदोलकांमध्ये महिलांचा देखील समावेश आहे. अनेक महिला रस्त्यावर उतरल्या. त्यांनीही पोलिसांच्या दिशेने दगडफेक केली. परभणी बंद असताना जी दुकाने सुरू होती, अशी दुकाने आंदोलकांनी पेटवून दिल्याची माहिती आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात हा प्रकार घडला.

परभणी शहर बंद दरम्यान, काही मोर्चेकरी महिला थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्या. यावेळी पोलिसांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. परंतु, महिला आक्रमक झाल्याने पोलिसांनी त्यांना आत सोडले. कार्यालयात शिरल्यानंतर आंदोलक महिलांनी जोरदार घोषणाबाजी केली.

परभणीमध्ये आज जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले होते. परंतु, या आदेशाला न जुमानता शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याशेजारी मोठ्या प्रमाणात जमाव जमला होता.

दरम्यान, या घटनेनंतर विविध पक्षांच्या नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या असून, महायुतीचे सरकार आल्यापासून हेतुपुरस्सर अशा घटना घडत असल्याचे शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. सर्वांनी संयम बाळगण्याचे आवाहन आमदार मेघना बोर्डीकर यांनी केले आहे तर या प्रकरणी कठोर कारवाई करण्याची मागणी आघाडीच्या नेत्यांनी केली आहे.

## धनखड हेडमास्तर, प्रवचन देतात...

### खरगेंची टीका



■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १० :**
इंडिया ब्लॉकने अध्यक्ष जगदीप धनखड यांच्याविरोधात आणल्या जाणाऱ्या अविश्वास प्रस्तावावर पत्रकार परिषद घेतली.
काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, सभागृहात अनुभवी नेते, पत्रकार, लेखक, प्राध्यापक आहेत. शेतात काम करून अनेकजण सभागृहात आले आहेत. 40-40 वर्षांचा अनुभव आहे, अशा नेत्यांची सभापती मुख्याध्यापकांसारखी शाळा घेतात आणि प्रवचन देतात. विरोधी पक्षाचे लोक 5 मिनिटे बोलतात, तर 10 मिनिटे त्यांचे भाषण असते. सहसा विरोधी पक्ष सभापतींकडून संरक्षण घेतात, सभापती हे संरक्षक असतात. ते पंतप्रधान आणि सत्ताधारी पक्षाचे गुणगान करत असतील, तर विरोधकांचे कोण ऐकणार?
त्यांच्याशी आमचे कोणतेही वैयक्तिक वैर, द्वेष किंवा राजकीय लढा नाही. नागरिकांना नम्रपणे सांगू इच्छितो की, संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी आम्ही अत्यंत विचारपूर्वक आणि मजबुरीने हे पाऊल उचलले असल्याचे खरगे म्हणाले.

## रात्री गुफ्तगू... आज दिल्ली वारी!

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**
मंत्रिमंडळ विस्तार तसेच खातेवाटपाबाबत महायुतीमध्ये अद्याप एकमत झाले नाही. या संदर्भात मंगळवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची दीड तास बैठक झाली. मात्र अंतिम निर्णय झाला नाही.

त्यामुळे युतीतील हे प्रमुख नेते आता दिल्लीत अमित शहा यांची भेट घेण्यासाठी गेल्याची माहिती आहे. मंगळवारी मंत्रिमंडळ विस्तार संदर्भात फडणवीस, शिंदे, अजित पवार यांची मेघदूत या बंगल्यावर दीड तास चर्चा झाली. मात्र या चर्चेतून कोणताही तोडगा निघाला नाही. कोणत्या आमदारांना मंत्री पद द्यायचे आणि खाते वाटपावर देखील चर्चा झाल्याची माहिती आहे. मात्र या संदर्भात अद्याप कोणताही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे हे तिन्ही नेते दिल्लीला अमित शहा यांच्याशी चर्चा करतील, त्यानंतरच मंत्रिमंडळ विस्तार होईल, अशी माहिती पुढे आली आहे.

शिवसेनेतील काही आमदारांची मंत्रीपदी वर्णी लावण्यात भाजपचा विरोध आहे. त्यामुळे महायुतीतील आमदारांच्या मनात धाकधूक वाढली आहे.

## फिरत्या मंत्रिपदांचा शिंदेंचा फॉर्म्युला



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**
महायुती सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मर्यादित मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिंदे यांच्यापुढे इच्छुक आमदारांची नाराजी दूर करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, शिंदेंना या मुद्यावर तोडगा काढण्यात यश आले आहे. त्यानुसार त्यांनी मंत्रिपदासाठी इच्छुक आमदारांना प्रत्येकी अडीच वर्षांसाठी मंत्रिपद देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. मंत्रिमंडळात विस्तारात शपथ घेणाऱ्या आमदारांना शपत घेतल्याच्या तारखेपासून अडीच वर्षांपर्यंत मंत्रीपदी राहता येईल. त्यानंतर आपल्या सहकारी आमदारांसाठी आपले पद सोडावे लागेल. शिवसेना त्यांच्याजागी नव्या इच्छुक आमदाराची मंत्री म्हणून नियुक्ती करेल. मात्र, अनेकांना हा फॉर्म्युला मान्य नसल्याचे समजते.



# मुंबई-नाशिक मार्गावर पुढील तीन महिने कोंडीचे

## साकेत पुलाजवळील मुख्य रस्त्याच्या रुंदीकरणास सुरुवात

**ठाणे, दि. ११ : प्रतिनिधी**

मुंबई नाशिक महामार्गावरील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या साकेत पूल भागातील मुख्य मार्गिकेच्या रुंदीकरणास सुरूवात झाली आहे. साकेत पूल ते माजिवडा असे हे काम सुरू असून या कामास किमान तीन महिने लागण्याची शक्यता आहे. याचा परिणाम दररोज सकाळी नवी मुंबई, भिवंडी आणि नाशिकच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहन चालकांना सहन करावा लागण्याची शक्यता आहे. मुख्य मार्गिकेचे काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गिकेवर आठ वाहिन्या वाहन चालकांना उपलब्ध होणार आहेत. त्यानंतर साकेत पूलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले जाईल. त्यामुळे काही महिने मुंबई नाशिक महामार्गावर कोंडीची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मुंबई नाशिक महामार्गावरून दिवसाला हजारो वाहनांची वाहतूक होत असते. उरण जेएनपीटी आणि नाशिक येथून गुजरात किंवा भिवंडीच्या दिशेने वाहतूक करणाऱ्या वाहनांनाही याच मार्गावरून वाहतूक करावी लागते. त्यामुळे या मार्गावर वाहनांचा मोठ्याप्रमाणात भार असतो. मुंबई नाशिक महामार्गाचा रस्ता वडपेपासून समृद्धी महामार्गाला जोडला जाणार आहे. त्यामुळे समृद्धीचा संपूर्ण भार या मार्गावर येणार आहे. त्यामुळे भविष्यात होणारी कोंडी कमी करण्यासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) २०२१ मध्ये या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हाती घेतले आहे.

वडपे ते ठाणे या सुमारे २४ किलोमीटरची मार्गिका मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे 'एमएसआरडीसी'चे नियोजन आहे. येथील अतिरिक्त नव्या मार्गिकांचे काम टप्प्या-टप्प्याने केले जात आहे. परंतु आता मुख्य मार्गिकेच्या निर्माणाचे काम देखील सुरू झाले आहे. सोमवारपासून साकेत पूल ते माजिवडा उड्डाणपूल असे हे काम सुरू झाले आहे. मुख्य मार्गिकाचे काम सुरू झाल्याने ठाण्याहून नाशिक, भिवंडी आणि नवी मुंबईच्या दिशेने वाहतूक करणारी वाहने मुख्य रस्त्यालगत तयार करण्यात आलेल्या नव्या मार्गिकेवरून वाहतूक करत आहेत. मुख्य मार्गिका बंद झाल्याने त्याचा परिणाम या मार्गावरील वाहतूक व्यवस्थेवर होऊ लागला आहे. मार्गावर कोंडी होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. पुढील तीन महिने या वाहतूक कोंडीचा ताप ठाणेकरांना सहन करावा लागणार आहे. परंतु या मुख्य मार्गिकेचे काम पूर्ण झाल्यानंतर वाहन चालकांना आठ पदरी मार्गिका उपलब्ध होणार असल्याची माहिती एमएसआरडीसीच्या अभियंत्यांनी दिली. असे असले तरी साकेत पूलावर केवळ चार पदरी मार्गिका उपलब्ध आहे. त्यामुळे साकेत पूलाचे काम सुरू झाल्यानंतर चालकांना पुन्हा कोंडीचा ताप सहन करावा लागणार आहे. या संदर्भात कापूरबावडी वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मंजुषा भोंगळे यांच्याशी संपर्क साधला असता, मुख्य रस्ता बंद करण्यात आला असला तरी त्या लगतच्या नव्या रस्त्यावरून वाहतूक सोडण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

# रायगड किल्ला व परिसर पर्यटन विकासाचे काम उत्तम दर्जाचे व जलदगतीने व्हावे - खासदार छत्रपती संभाजी राजे भोसले

**नवी मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**



रायगड किल्ला व परिसर पर्यटन विकासाचे काम उत्तम दर्जाचे व जलदगतीने व्हावे यासाठी जिल्हा प्रशासनाने प्राधिकरणाशी समन्वय राखून काम करावे. यासाठी शासनाव्दारे मंजूर झालेला निधी 100 टक्के खर्च होईल यासाठी योग्य नियोजन करावे. अशा सूचना रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदार छत्रपती संभाजी राजे भोसले यांनी केले.

खासदार छत्रपती संभाजी राजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली कोकण भवन येथील आयुक्त कार्यालयाच्या मुख्य दालनात आज रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाची आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस कोकण विभागाचे महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमुख, रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे, उपआयुक्त(नियोजन) प्रमोद केंबावी, रायगडचे उप जिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके, महाडचे उपविभागीय अधिकारी ज्ञानोबा बानापूरे, रायगड पाणी संवर्धन विभागाचे अधिक्षक अभियंता संजय शिंदे, रोहाचे सहाय्यक वनसंरक्षक रोहित चोबे, पेण-रायगड विद्यूत विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीमती संजिवनी कट्टी तसेच प्राधिकारणाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

रायगड किल्ला संवर्धन व किल्ल्याच्या आजूबाजूचा परिसर पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत करण्यासाठी शासनाद्वारे निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानूसार आराखडा तयार करण्यात आला असून आराखडयातील कामांची अंदाजपत्रके तयार करुन निविदा प्रक्रीय पूर्ण झाल्या आहेत. यावेळी रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटनाची कामे उत्तम दर्जाची आणि जलद गतीने होण्यासाठी उपसमिती गठीत करण्याच्या सुचना आराखडा प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदर छत्रपती संभाजी राजे भोसले यांनी संबंधितांना दिल्या.

या बैठकीत किल्ल्यांचा इतिहास जिवंत करुन दाखविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन "शिवसृष्टी" निर्माण करण्यात येणार असल्याबाबतचे सादरीकरण करण्यात आले. यात रायगड किल्ल्यावर प्राचिन वस्तूंचे संवर्धन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पर्यटकांना मनोरंजनासह गड-किल्ल्यांची माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. किल्ल्यावरील सर्व वस्तूंचे माहिती संग्रहण करण्यात येणार आहे. रायगड किल्यावरील चित्त दरवाजा, नाना दरवाजा, खुबल्दा बुर्ज, महादरवाजा आदींचे संवर्धन व जिर्णोद्धार करणे, तसेच पर्यटक व शिवप्रेमींना रायगडावर पोहचण्यासाठी मजबूत पायवाटा निर्माण करणे, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आदी महत्वाच्या सोयी उपलब्ध करून देणे, जलसंवर्धन करणे याबाबींचा समावेश आहे. याशिवाय पाचाड येथील राजमाता जिजाऊ समाधी व जिजामाता वाडा यांच्या संवर्धन व जिर्णोद्धाराचे कार्य तसेच याठिकाणी पर्यटकांसाठी आवश्यक सोयी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावीत आहे.

प्रगत संगणन विकास केंद्र (सीडॅक) व्दारे आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पर्यटकांच्या मार्गदर्शनासाठी विविध ॲप तयार करण्यात येणार आहेत. तसेच व्हिज्यूअल तंत्रज्ञानाचा वापर करुन पर्यटकांना गड-किल्ले आणि इतिहासातील माहिती देण्यासाठी विविध ठिकाणी दालने तयार करण्यात येणार आहेत. याचे प्रारुप स्वरुपाचे सादरीकरण प्रगत संगणन विकास केंद्र (सीडॅक) च्या अधिकाऱ्यावद्दारे याबैठकीत करण्यात आले.

या बैठकीत रायगड जलसंधारण विभागाव्दारे रायगड किल्ला, शिवसृष्टी आणि परिसरातील गावांसाठी भवीष्यात 30 वर्षे पूरेल या दृष्टीकोनातून पाण्याचे नियोजन करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. त्या आराखड्याचे सादरीकरण यावेळी करण्यात आले.

# "अमृत" च्या आर्थिक साक्षरता प्रशिक्षण योजनेसाठी संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध

**नवी मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन, उन्ती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या स्वायत्त संस्थेद्वारे अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी "आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम" ही योजना जाहीर करण्यात आली आहे. या संस्थेच्या आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ठरविण्यात आलेल्या लक्षित गटाच्या 18 ते 60 वयोगटातील उमेदवारांना 'प्रथम येयील त्यास प्रथम प्राधान्य' या तत्वावर प्रवेश मिळण्याकरीता अमृतच्या संकेतस्थळावर अर्ज करावेत. अशी माहिती अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी दिली.

आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमातून लाभार्थ्यांची वैयक्तिक तसेच कौटुंबिक आर्थिकस्थिती सुधारणे, स्वयंरोजगाची निर्मिती, प्रशिक्षणामार्फत लाभार्थ्यांनी इतर गरजू समाज घटकांची आर्थिकस्थिती सुधारण्यास मदत करावी ही अपेक्षित सकारात्मक उद्दिष्टे लक्षात घेऊन शासनाद्ववारे महाराष्ट्र संशोधन, उन्ती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत अव्वल 50 प्रशिक्षणार्थ्यांची प्रमाणपत्र परीक्षा शुल्क माफ करण्यात येणार आहे. आर्थिक साक्षरतेच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण करणाऱ्या या online योजनेचा (Wealth Management) अभ्यासक्रम हा 1.Basic Financial Services Knowledge (2 महिने), 2. Professional Grooming & Personality development. (1 महिना), 3. Market Application & Employability Skills. (1महिना) या ३ टप्प्यात असेल.

अमृतच्या लक्षित गटातील १८ ते ६० वयोगटाच्या उमेदवारांना या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेता येईल. 'प्रथम येईल त्यास प्राधान्य' या तत्त्वाने प्रवेश देण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी 4 महीने राहील, शिक्षणाची भाषा इंग्रजी आणि मराठी राहील. लाभार्थीचे पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा पदवी परीक्षा (अंतिम वर्ष) शिक्षण चालू असणे अपेक्षित आहे. लाभार्थ्यांना डिजिटल स्वरूपामध्ये शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल.

या अभ्यासक्रमामध्ये Mutual Funds, SIP, SWP, Stock Market, Insurance इत्यादी गुंतवणूकी संबंधित माहितीचे ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण दिले जाईल. भारतीय रिझर्व बँक (RBI), SEBI सारख्या विविध भारतीय वित्तीय संस्थांची माहिती देण्यात येईल.

प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी NISM-5A, IRDAI सारख्या प्रमाणन परीक्षे करीता अर्ज करू शकतील. या प्रमाणन परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी प्रशिक्षणार्थीकरीता सराव परीक्षा घेण्यात येतील. प्रशिक्षणार्थ्यांपैकी पहिल्या अव्वल ५० गुणवंत विद्यार्थ्यांचे NISM-5A, IRDAI या प्रमाणन परीक्षेचे परीक्षा शुल्क हे संस्थे मार्फत बक्षीस स्वरूपी परत देण्यात येईल.

इच्छुक उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी www.mahaamrut.org.in या 'अमृत' संस्थेच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच https://app.mahaamrut.org.in/amrut/choose-login या लिंक वर जाऊन अर्ज करावा व आवश्यक ते सर्व कागदपत्र अपलोड करावेत. अमृतच्या आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा. असे आवाहन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# जोगेश्वरी -पवई लिंक रोडवर वाहती गटारे गलिच्छ पाण्याने नागरिक, वाहन चालक त्रस्त

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**



नेहमी करिता प्रचंड वर्दळीच्या आणि वाहतुकीच्या जोगेश्वरी-पवई लिंक रोडवर प्रगती बस स्थानकाजवळ साई सिद्धी बिल्डिंग समोर मोठ्या प्रमाणात गटाराचे घाण पाणी मुख्य रस्त्यावर वाहत आहे.रस्त्याकडेला असलेले गटार फुटल्याने गेल्या काही महिन्यापासून गटारचे घाण पाणी मुख्य रस्त्यावर येत आहे. घाण पाण्याबरोबर गटाराच्या आजूबाजूला कचरा फेकला जात असल्याने कचरा ही रस्त्यावर येत आहे. जोगेश्वरी कडून पवई कडे जाणाऱ्या- येणाऱ्या वाहन चालकांना या घाणीतून दुर्गंधीयुक्त गलिच्छ ठिकाणावरून प्रवास करावा लागत आहे.घाण पाणी वाहत असल्याने या ठिकाणी हिरवळ दाटली आहे. रस्त्याच्या मधोमध हिरवळ जागेवरून दुचाकी सरकून अपघात होण्याची दाट शक्यता आहे. वाहन चालकासह या विभागातील नागरिक आणि येथून ये- जा करणाऱ्या पादचारी या मार्गावरून प्रशासनावर जोरदार टीका करीत आहे. आम्हाला दररोज या घाण पाण्यातून प्रवास करावा लागत आहे. ऐखादे वाहन वेगात गेले तर रस्त्यावरील घाण पाणी नागरिकांच्या अंगावर उडते. जोगेश्वरी ते पवई आयटी पर्यंत मेट्रोचे काम सुरू असल्याने ठीक ठिकाणी खोदकाम चालू आहे त्या मुळे जागोजागी मातेचे ढिगारे साचले आहेत गटारे फुटलीआहेत. लोकप्रतिनिधीनी निवडणुकीच्या प्रचाराला अनेक वेळा येथून ये -जा केले आहे. प्रशासन अधिकारी येथून नेहमी जात असतात पण ही समस्या ते सोडवून शकत नाहीत का त्यांना हे दिसत नाही का ? अशी प्रतिक्रिया प्रवासी संजय बोर्डे यांनी दिली. त्यामुळे याबाबत आता तरी महापालिकेला जाग येईल का असा सवाल स्थानिक नागरिक आणि वाहनचालक करत आहेत.

# नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत नेरुळ व घणसोली विभागात पाडकामाची कारवाई

**नवी मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**



नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरुळ व घणसोली विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका बी विभाग नेरूळ कार्यक्षेत्राअंर्तगत असलेल्या अनधिकृत बांधकाम धारक श्री. रामचंद्र बाळाराम ठाकूर घर क्र. 105, नेरूळगाव, नेरूळ या इमारतीवर निष्कासन कारवाई करण्यात आलेली आहे.

सदर ठिकाणच्या अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आले. त्यानुसार सदरील बांधकाम 14 मजुर, 5 ब्रेकर, 2 गॅस कटर यांच्या सहाय्याने निष्कासीत करण्यात आले. या धडक मोहिमेसाठी नेरुळ विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी तसेच अतिक्रमण विभागातील अधिकारी /कर्मचारी यांचे समवेत सुरक्षारक्षक, स्थानिक पोलीस तैनात होते. तसेच नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय घणसोली कार्यक्षेत्रातील श्री.राजु सातपुते (घरमालक व विकासक), यांनी सर्व्हे नं.29/30,से.22, तळवलीगांव,घणसोली यांनी नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे आर.सी.सी., तळ+पहिल्या मजल्याचे काम पुर्ण होवुन दुस-या मजल्याच्या कॉलमचे काम प्रगतीपथावर असल्याचे दिसुन आले. केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हुन हटविणे आवश्यक होते. परंतु सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. सदरच्या ठिकाणच्या अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यानुसार सदरील अनधिकृत बांधकाम 01 जेसीबी पोकलेन, 06 कामगार यांच्या सहाय्याने निष्कासीत करण्यात आले. तसेच दंडात्मक शुल्क रक्कम रु.50,000/- एवढे वसुल करण्यात आले आहे. या धडक मोहिमेसाठी घणसोली विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागातील अधिकारी / कर्मचारी, तसेच पोलिस पथक तैनात होते.

# 'दर्द से हमदर्द तक' संस्थेतर्फे तर्फे अधिवक्ता दिवस साजरा

**जव्हार, दि. ११ : प्रतिनिधी**




दर्द से हमदर्द तक ट्रस्ट ह्या संस्थे मार्फत अधिवक्ता दिवस साजरा करण्यात आला. ह्या दिवशी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे अनिल सिंग (वरिष्ठ अधिवक्ता व माजी सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया) हे हजर होते. तसेच मुख्यवक्ता व सत्कारमूर्ती असलेले प्रदीप सिंग राजपूत, मुख्य जिल्हा सरकारी वकील,सोलापूर हे होते.

राजपूत ह्यांनी त्यांच्या सरकारी वकील म्हणून कार्यकाळात गुन्हेगारांचा कर्दनकाळ ठरत १०९ प्रकरणांमध्ये जन्मठेपेची शिक्षा तसेच 2 प्रकरणांमध्ये फाशीची शिक्षा मिळवून दिल्यामुळे त्यांचा सत्कार दर्द से हमदर्द तक संस्थेच्या वतीने अधिवक्ता दिनाचे औचित्य साधुन अनिल सिंग ह्यांच्या हस्ते करण्यात आला. सदर वेळी ॲड.सुनिता खंडाळे या सुद्धा उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या वेळी प्रदीपसिंग राजपूत यांनी लिहिलेल्या सुधारित कायद्यावरील पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल सिंग ह्यांच्या हस्ते करण्यात आले. सदर पुस्तक हे वकिलांना तसेच कायद्याच्या विद्यार्थ्यांना व सामान्य नारीकांना देण्यात आले.

सदरचे पुस्तक सुधारित कायद्यावर थोडक्यात प्रकाश टाकणारे व मार्गदर्शन ठरेल असे वक्तव्य अनिल सिंग यांनी आपल्या अधेक्षिय भाषणात केले. त्याचबरोबर दर्द से हमदर्द तक संस्था जे विना मूल्य कायदेशीर मदत करण्याचे कार्य करत आहे. अशा कार्याची गरज असल्याचे देखील त्यांनी म्हंटले आहे. दर्द से हमदर्द तक संस्थेच्या वतीने प्रकाश सालसिंगीकर यानी संस्था कशा पद्धतीने काम करते याची थोडक्यात माहिती दिली व संस्थेने दोन वर्षात सुमारे ६०० हून अधिक लोकांना विनामूल्य तुरुंगातून बाहेर काढल्याचे सांगितले.

ही संस्था आरोपींना तर हम दर्द आहेच पण नवेदित वकिलांना सुद्धा संधी उपलब्ध करून देत आहे. मुख्य वक्ते प्रदीप सिंग राजपूत यांनी गुन्हा नोंद होण्यापासून ते निकाली लागण्यापर्यंत फौजदारी खटला कसा चालतो याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन करताना ३०२ म्हणजेच खून खटला तसेच पॉक्सो खटल्यातील काही प्रत्यक्ष उदाहरण देऊन कोर्टामध्ये बचाव पक्षांनी स्वतःची बाजू कशी मांडली पाहिजे व सरकारी पक्ष आपली बाजू कशी मांडतात व कोणत्या चुका कोर्टामध्ये टाळल्या पाहिजे या बद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. या सर्व कार्यक्रमा दरम्यान उपस्थित असणाऱ्या वकील व विद्यार्थ्यांना असणाऱ्या शंकांचे निरसन प्रश्न-उत्तर द्वारे झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिक साखळकर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन चिंदरकर यांनी केले.

# पालकमंत्री नसल्याने पाणी नियोजन लांबणीवर

**पुणे, दि. ११ : प्रतिनिधी**

राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतरही मंत्रिमंडळ विस्तार आणि पालकमंत्री पदाची घोषणा न झाल्याने जिल्ह्यातील पाणी नियोजनही लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या हंगामात समाधानकारक पाऊस झाला असल्याने पाणी उपलब्धतेची चिंता नसली तरी, पाणी वाटप नियोजनाची कालवा समिती बैठक लांबणीवर पडल्याचा परिणाम वितरणावर होण्याची शक्यता आहे. खडकवासला धरण साखळी प्रकल्पातून शेतीला किती पाणी द्यायचे आणि शहराला पिण्यासाठी किती पाणी आरक्षित ठेवायचे, याचा निर्णय कालवा समितीच्या बैठकीत होत असतो. पालकमंत्री या समितीचे अध्यक्ष असतात. मात्र, पालकमंत्र्यांच्या नियुक्तीअभावी पाणी वाटप नियोजनही रखडले आहे. राज्य शासनाने पाण्याचे प्राधान्यक्रम ठरविले आहेत. यामध्ये पिण्याच्या पाण्याला पहिले प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानंतर शेती आणि उद्योग असा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील पाणी पुणे शहराला पिण्यासाठी वापरले जाते. तसेच दौंड, इंदापूर आणि बारामती या तीन तालुक्यांसाठी पिण्यासाठी आणि शेतीसाठी उपलब्ध करून देण्यात येते. शहराला पिण्यासाठी आवश्यक पाणी, सिंचनासाठीची आवर्तने, बाष्पीभवन, जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींचा विचार करून पाण्याचे नियोजन करावे लागते. त्यासाठी दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात कालवा समितीची बैठक होते. त्यामध्ये पाणी वाटपावर चर्चा करून निर्णय घेतले जातात. त्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत धरणात उपलब्ध असलेला पाणीसाठा विचारात घेतला जातो. यावेळी विधानसभा निवडणुकीमुळे कालवा समितीची बैठक लांबणीवर पडली. त्यानंतर निवडणुकीचा निकाल लागून महायुती सत्तेत आली आहे.

# ठाण्यात चिनी मांजा, चिनी दोरा वापरणे पडणार महागात

**ठाणे, दि. ११ : प्रतिनिधी**

पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा चिनी मांजा, चिनी दोरा, नायलॉन, प्लास्टिक कृत्रिम मांजा हा माणसांबरोबरच पक्ष्यांसाठी घातक ठरत असल्यामुळे अशा मांजांच्या वापरावर ठाणे महापालिकेने प्रतिबंध केला आहे. पालिकेच्या पथकाकडून दुकानांमध्ये तपासणी मोहिम राबवून मांजा जप्तीची कारवाई केली जाणार असून अशा व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्याची तयारी पालिकेने सुरू केली आहे. यामुळे चिनी मांजा, चिनी दोरा वापरणे महागात पडण्याची चिन्हे आहेत.

पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा प्लास्टिक किंवा सिंथेटिक पदार्थापासून तयार केलेला चिनी मांजा, चिनी दोरा, नायलॉन, प्लास्टिक कृत्रिम मांजा हा माणसांसाठी तसेच पक्ष्यांना घातक ठरतो. चिनी मांजा म्हणून ओळखला जाणारा हा धागा तयार करण्यासाठी बारिक चूरा केलेली काच, धातू किंवा अन्य तिक्ष्ण पदार्थांचा वापर करण्यात येतो. अशा धाग्याचे उत्पादन, विक्री, साठवण आणि वापर यावर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने निर्बंध घातलेले आहेत. या धाग्याचे जैविकरित्या विघटन होत नाही. पतंग उडवण्यासाठी केवळ सुती धागा वापरण्यास परवानगी आहे. त्यामुळे चिनी मांजा, चिनी दोरा, नायलॉन, प्लास्टिक कृत्रिम मांजांच्या वापरावर ठाणे महापालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यात आला आहे.

चिनी मांजा आणि सिंथेटिक-नायलॉन मांजाची विक्री, उत्पादन, साठवण आणि वापर टाळण्यासाठी पालिकेच्या पथकाकडून दुकानांमध्ये तपासणी मोहिम राबवून मांजा जप्तीची कारवाई केली जाणार आहे. प्रभाग समिती स्तरावर ही तपासणी आणि जप्ती मोहीम नियमितपणे राबविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक प्रभाग समितीत सहाय्यक आयुक्त स्तरावर कर निरिक्षक, स्वच्छता निरिक्षक, आरोग्य निरिक्षक, प्रदूषण नियंत्रण कर्मचारी यांचे दक्षता पथक तयार करण्यात आले आहे. तसेच, स्थानिक पोलिसांनाही याविषयी माहिती देण्यात आली आहे. याशिवाय, प्रतिबंधित सिंथेटिक, नायलॉन मांजाची विक्री, उत्पादन, साठवण, पुरवठा किंवा वापर याबाबतच्या तक्रारी करण्यासाठी ८६५७८८७१०१ हा टोल फ्री क्रमांक नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

> पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा चिनी मांजा, चिनी दोरा, नायलॉन, प्लास्टिक कृत्रिम मांजा हा माणसांबरोबरच पक्ष्यांसाठी घातक ठरत असल्यामुळे त्याच्या वापरास बंदी घालण्यात आली आहे. शहरातील दुकानांमध्ये तपासणी मोहिम राबवून मांजा जप्तीची कारवाई केली जाणार आहे. पोलिसांनीही अशीच कारवाई करावी यासाठी त्यांनाही पत्र पाठविले आहे. याशिवाय, संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी पोलिसांची मदत घेतली जाणार आहे.
>
> **– प्रशांत रोडे, अतिरिक्त आयुक्त, ठाणे महापालिका**

# भिवंडीतील रेड लाईट भागातून बांगलादेशी महिलांची धरपकड

**भिवंडी, दि. ११ : प्रतिनिधी**

बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदूवर क्रूर अत्याचार सुरू असताना भारतात बांगलादेश विरोधात आंदोलन होऊन देशात अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची हकालपट्टी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या दरम्यान भिवंडी शहरातील देह व्यापार करणाऱ्या महिलांची वस्ती असणाऱ्या हनुमान टेकडी या रेड लाईट एरियात ठाणे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या पथकाने केलेल्या कारवाईत सहा बांगलादेशी महिलांची धरपकड करण्यात आली आहे.पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची धरपकड करण्याचे सक्त आदेश ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी दिल्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांच्या नेतृत्वा खालील पोलिस पथकाने सोमवारी दुपारच्या सुमारास शहरातील हनुमान टेकडी येथील रेड लाईट भागात छापेमारी करून सर्व खोल्यांमधील महिलांची झाडझडती घेतली. त्यामधील सहा महिलांकडे भारतीय नागरिक असल्याचे कोणतेही पुरावे आढळून आले नाहीत. त्यामुळे अधिक चौकशीत त्या बांगलादेशी असल्याचे स्पष्ट झाल्याने त्या महिलांना ताब्यात घेऊन स्थानिक भिवंडी शहर पोलिस ठाण्यात आणले.त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून आरोपी महिलांना शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.या परिसरात पोलिस विभागाने बऱ्याच काळानंतर अशी कारवाई केली आहे.पण यंत्रणेने एवढ्या वर न थांबता बांगलादेशी महिलांना आश्रय देणारे व त्यांच्या कडून देह व्यापार करवून घेणाऱ्यां विरोधात सुध्दा कारवाई होण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# भारत सरकारने बांगलादेश सरकारला सक्त ताकीद द्यावी

## सकल हिंदू समाजाची मागणी



■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. ११ :** बांगलादेशात हिंदूंसह अल्पसंख्याकांवर अत्याचार होत आहेत. या अत्याचाराच्या निषेधार्थ मंगळवार जिल्हाधिका ?्यांमार्फ त पंतप्रधानांना निवेदन देण्यात आले. यात तेथील अल्पसंख्याकांवर होणा ?्या अत्याचाराचा निषेध नोंदवण्यात आला. भारत सरकारने बांगलादेश सरकारला हिंदू अत्याचारविरोधात सक्त ताकीद द्यावी, यासह अन्य मागण्या करण्यात आल्या. जिहादी अतिरेक्यांनी ५५ ऑगस्टपासून बांगलादेशात अस्थिरता निर्माण केली आहे. हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याक समुदायांवर हल्ले आणि अत्याचार वाढले आहेत. आतापर्यंत बांगलादेशातील ५०५० जिल्ह्यांमध्ये हिंदू अल्पसंख्याकांवर दोनशेहून अधिक हल्ले झाले आहेत. यात ३५०३५० पेक्षा जास्त लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. हिंदू उद्योगपती, हिंदू कलाकार, हिंदू नेत्यांची हत्या झाली आहे. बांगलादेशातील हिंदूंच्या बाजूने उभे राहिलेले इस्कॉनचे साधू चिन्मय कृष्णदास यांना राष्ट्रध्वजाचा अपमान केल्याच्या खोट्या आरोपाखाली अटक करण्यात आली.

बांगलादेशात हिंदूंसह अल्पसंख्याकांची घरे आणि व्यावसायिक आस्थापनांमध्ये जाळपोळ आणि लुटमारीच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. यामध्ये मंदिरातील चोरी आणि देवांचा अपमान अशा घटनांचा समावेश आहे. कायदेशीर आणि शांततेने लढणा ?्या हिंदूंच्या धर्मगुरूंनाच दोषी ठरवले जात आहे. आता गाझा, सीरिया, लेबनॉनमधील घटनांबद्दल चिंता व्यक्त करणारे गप्प आहेत. येथील अत्याचार त्वरित थांबवावेत आणि बांगलादेशातील परिस्थिती पूर्वपदावर आणून हिंदू, बौद्ध, ख्रिश्चनांचे जीवनमान सुधारावे, अशा मागण्या समस्त हिंदू समाजाकडून भारत आणि बांगलादेश सरकारकडे करण्यात येत आहेत. आणि इतर अल्पसंख्याक समुदायांना सुरक्षित करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात प्रमुख मागण्या करण्यात आल्या मानवाधिकार संघटनांनी बांगलादेशातील हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांवर होणारे हल्ले आणि अत्याचाराकडे लक्ष द्यावे. हा मुद्दा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडला पाहिजे. बांगलादेश सरकारने बांगलादेशातील हिंदूंच्या जीवित व मालमत्तेचे रक्षण करावे आणि महिलांवरील अत्याचाराच्या घटना रोखल्या पाहिजेत. हिंदू कलाकार, व्यापारी, उद्योगपती, खेळाडू, राजकीय नेते तसेच हिंदू मंदिरांना सुरक्षा पुरवण्यात यावी. बांगलादेशातील पाकिस्तानी जिहादींचा हस्तक्षेप थांबवा. हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याक समुदायांवरील अत्याचाराचा मुद्दा संयुक्त राष्ट्रात उपस्थित करावा. बांगलादेशातील हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याक समुदायांच्या संरक्षणाची मागणी करणाऱ्या विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चळवळींना सुरक्षा प्रदान करण्यात यावी.

# आक्रोश मोर्चाचे साधू, साध्वींनी केले नेतृत्व




■ महासागर प्रतिनिधी,
**बुलढाणा, दि. ११ :** बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या या अत्याचारा विरोधात बुलडाणा येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने आज मंगळवार, १० डिसेंबर रोजी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. साधू, साध्वींच्या नेतृत्वात महिला व युवतींच्या लक्षणीय सहभागात हा मोर्चा दुपारी निघाला.

गर्दे वाचनालय येथून या मोर्चाला सुरुवात झाली. स्व भोंडे सरकार चौक मार्गे तहसील कार्यालय, शिवालय, संगम चौक, जयस्तंभ चौक मार्गे हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या वेळी मोर्चातील पदाधिकाऱ्यांनी मागण्यांचे निवेदन पंतप्रधान मोदी यांच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. आमदार संजय कुटे, आमदार आकाश फुंडकर, आमदार चैनसुख संचेती, माजी आमदार विजयराज शिंदे, योगेंद्र गोडे, मृत्युंजय गायकवाड, अमोल अंधारे, सचिन देशमुख, विनायक भाग्यवंत, ॲड. सुनील देशमुख, सतीश भाकरे आदींची यावेळी उपस्थिती होती. बटोगे तो कटोगे बांग्लादेश ते सिध्द हुआ अब तो जागो, मम दिक्षा हिंदु रक्षा, चला धर्म रक्षणासाठी सज्ज व्हा, हिंदुंना वाचवायला हवे आदी फलकांचा मोर्चात समावेश होता. जय श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज की जय, हर हर महादेव, बजरंग बली की जय अशा घोषणा मोर्चात देण्यात आल्या.

# डीएनए ठरला पुरावा आणि न्यायालयाने ठोठावली शिक्षा

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. ११ :** खरा गुन्हेगार कोण हे ठरवतांना आलेला पेच शेवटी न्याय वैद्यकीय पुराव्याआधारे सुटला. येथील जिल्हा न्यायाधीश वर्ग एक तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.ए.एस.एम.अली यांनी या प्रकरणात आरोपी प्रियकरास दहा वर्ष सश्रम कारावास तसेच दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. पीडित युवती ही एका शिक्षकाकडे खाजगी शिकवणीस जायची. तिने शिक्षक राहुल भारती विरोधात पोलीस तक्रार दाखल केली होती. आरोपीने पीडितेसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यातून ती गर्भवती राहली. शिक्षकच आरोपी असल्याचे तिने तक्रारीत नमूद केले होते. पोलिसांनी मग पीडिता व शिक्षक या दोघांचा डीएनए वैद्यकीय तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवला. अहवालात बाळाचे वडील शिक्षक नसल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी मग पुन्हा सखोल चौकशी सूरू केली. पीडितेचा प्रियकर तणवीर शहा गुलाम शहा, २४२४ यास ताब्यात घेण्यात आले. पीडितेस पुन्हा विचारणा करण्यात आली की कुणामुळे गर्भवती राहली. त्याचे उत्तर सांगू शकत नसल्याचे ती म्हणाली. मग आरोपी प्रियकराचा डीएनए तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आला. या अहवालात पीडिता ही प्रियकरापासून गर्भवती झाल्याचे स्पष्टझाले. प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी पीडितेने शिकवणी घेणा ?्या शिक्षकाविरोधात साक्ष दिली. तसेच प्रियकरास ओळखत नसल्याचे सांगितले. आरोपी प्रियकरने जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केल्यावर त्या अर्जास पीडितेने होकार दिला. पीडिता व तिची आई या दोघी आरोपीचा बचाव तर शिक्षकांस फसवीण्याच्या प्रयत्न करीत असल्याचे दिसून येताच पोलिसांनी शिक्षक राहुल भारती विरोधात गुन्हा दाखल नं करता प्रियकर विरोधात गुन्हा दाखल केला. त्याला अटक करण्यात आली. न्यायालयात शासकीय अधिवक्ता विनय आर. घुडे यांनी १३१३ साक्षीदारांची साक्ष नोंदवून घेतली. स्वाती एन. गेडे यांनी कामकाज हाताळले. पीडितेस खाजगी शिकवणी घेणा ?्या शिक्षकाने नव्हे तर तिच्या प्रियकराने गर्भवती केले, असे युक्तीवादात सिद्ध झाले. त्यामुळे आरोपी प्रियकर तनवीर यास सजा ठोठावण्यात आली. तसेच शिक्षक राहुल भारती निर्दोष असल्याचे स्पष्ट करण्यात आले. दुस ?्या एका प्रकरणात नवव्या वर्गात शिकणा ?्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीस गर्भवती करणा ?्या अमित मरसकोल्हे या आरोपीस न्यायालयाने २० वर्षाचा कारावास ठोठवला आहे. जिल्हा न्यायाधीश ४४ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. पी. आदोने यांनी ही सजा सुनावली आहे. या प्रकरणात शासकीय अधिवक्ता म्हणून विनय आर. घुडे यांनी बाजू मांडली होती.

# युवकाने गळफास घेत केली आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी,
**कळंब, दि. ११ :** तालुक्यातील कळसपूर येथील युवकाने आजाराला कंटाळून घराच्या आड्याला गळफास घेऊन जीवन यात्रा संपवली. ही घटना सोमवारी दि. ९ डिसेंबर रोजी घडली असून आकाश ओंकार सोनवणे (वय २३) वर्ष असे मृत तरूणाचे नाव आहे. या प्रकरणी पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, कळंब तालुक्यातील कळसपूर येथील आकाश सोनवणे याला दारूचे व्यसन जडल्याने व अति मध्य सेवनाने आजार जडला होता. याच आजाराला कंटाळून सोमवारी दुपारी घरी कोणी नसल्याचे पाहून राहत्या घरातीलच आड्याला दोर बांधून गळफास घेत आपली जीवन यात्रा संपविली. ही घटना गावातीलच मामे भाऊ श्याम शंकर आत्राम यांच्या लक्षात आली. दरम्यान त्यांनी मृतक आकाश याच्या शेजारी राहणारा चुलत भाऊ उमेश सोनवणे याला बाबत फोनद्वारे माहिती दिली. उमेश याने लगेच घर गाठून पाहिले असता, मृतक आकाश हा नायलॉन दोरीने गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत दिसला. या प्रकरणी मृतकाचा चुलत भाऊ उमेश सोनवणे यांनी कळंब पोलिसात फिर्यादी असून कळंब पोलिसांनी स्पॉट पंचनामा करीत प्रेत उत्तरीय तपासणीसाठी कळंब शासकीय रुग्णालयात पाठविले असून पुढील तपास कळंब पोलिस करीत आहे.

# ट्रकची दुचाकीला मागून धडक एक ठार एक जखमी



■ महासागर प्रतिनिधी,
**मलकापूर , दि. ११ :** मलकापूर भरधाव जाणाऱ्या ट्रक ने दुचाकीलामागून दिलेल्या धडकेतएकजणठार तर एकजणगंभीर जखमी झाल्याची घटना आज १० डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास नांदुरा रोडवरील मुंदडा पेट्रोल पंप जवळ घडली. मिळालेल्या माहितीनुसार, प्रसाद भटू वाणी (वय ४६) व त्यांच्यासोबत अजय रत्नकांत पाटील (वय ३७) दोन्ही रा. पारोळा जि. जळगाव हे एमएच १९ बीझेड ९२७५ या क्रमांकाच्या दुचाकीने शहराकडे येत होते. त्यावेळी आरोपी निंबाराम डंगाराम रा. नेहरूकनी धानी ता. गुडामलानी जि. बारमेर राजस्थान हा आपला मालवाहू ट्रक क्रमांक आरजे १९ सिजी ४१३३ या वाहनाने येत असताना त्याने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव चालवीत दुचाकीला मागून जबर धडक दिली. या अपघातात दुचाकीवर मागे बसलेला अजय रत्नाकांत पाटील याचा जागीच मृत्यू झाला तर दुचाकी चालक प्रसाद भटू वाणी हे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. प्रकरणी प्रसाद वाणी याने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी मलकापूर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# आशा गट प्रवर्तक व कामगार संघटनेचा मेळावा

■ महासागर प्रतिनिधी,
**बुलढाणा, दि. ११ :** शासनाने विधान सभा निवडणूक तोंडावर असताना आचारसंहिता लागण्यापूर्वी कामगार हितासाठी जे निर्णय घेतले त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी सीआयटीयूचे जिल्हाध्यक्ष कॉ.पंजाबराव गायकवाड यांनी लोणार येथे आयोजित मेळाव्याचे उद्घाटन करताना केली.




लोणार येथील पंचायत समिती कार्यालय समोरील संत गजानन महाराज सभागृहांत ८ डिसेंबर रोजी सीटूच्या वतीने आशा गट प्रवर्तक व शालेय पोषण आहार कामगार संघटनेचा संयुक्त मेळावा आयोजित करण्यात आला होता. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्षा गंगा अंभोरे या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून जितेंद्र झीने, जयश्री तायडे, ललिता बोदडे, सुमित्रा लिहिणार, बेबीनंदा अंभोरे, शोभा काळे, अनुसया गारोडे, कविता चव्हाण ह्या विचार मंचावर उपस्थित होत्या.

पुढे बोलताना पंजाबराव गायकवाड म्हणाले की, राज्य स्तरावरून निधीची तरतूद झाली नसल्यामुळे मानधन होत नाही, असे सांगितले जाते. यावरून सरकार मागील अनेक वर्षांपासून अत्यंत अल्प मानधनावर काम करीत असलेल्या कामगारांच्या प्रश्नांकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष करून त्यांच्या हक्काचा निधी इतर योजनेकडे तर वळत नाही ना, असा आरोप संघटनेचे जिल्हाध्यक्ष कॉ. गायकवाड यांनी सरकारवर केला. त्यानंतर जितेंद्र झिने, सुमित्रा लिहिणार, जयश्री तायडे, ललिता बोदडे, शोभा काळे यांनी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातील आरोग्य केंद्रातील आशा व गट प्रवर्तक ज्योती काळे, सिंधू अवसरमोल, शीला फाळके, सविता म्हस्के, पौर्णिमा गायकवाड, सुनीता राठोड, ज्योती नागरे, रंजना मोरखडे, आरती सोनटक्के, वर्षा बेदरकर, सुनीता निमकर्डे, रमा मनतकार, सावित्री कोकाटे, सुनीता वानखेडे, गोपिका घोपे यांच्यासह मोठ्या संख्येने आशा व गट प्रवर्तक उपस्थित होत्या. मेळाव्याच्या यशस्वितेसाठी वामन वेव्हळ, अशोक राठोड, शीतल देशमुख, हर्षा घायाळ, आशा लता, पनाड यांनी सहकार्य केले.

# खामगावची शासकीय कार्यालये अतिक्रमण मुक्त कधी होणार?



■ महासागर प्रतिनिधी,
**खामगाव , दि. ११ :** शहरातील शासकीय कार्यालयांना आधीच रिक्त पदांचे ग्रहण लागले असताना आता या कार्यालयासमोरील परिसर अतिक्रमणांच्या विळख्यात सापडला आहे. या अतिक्रमणांचा विळखा केव्हा सुटणार व कार्यालयाचा परिसर केंव्हा मोकळा श्वास घेणार असा प्रश्न कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पडला आहे. शहरातील अधिक वर्दळीचा व शासकीय निमशासकीय व शैक्षणिक संस्था असलेला नांदुरा रोड आहे. या रोडवरील बसस्थानकापासून ते गो. से. महाविद्यालया पर्यंतच्या मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्पादन शुल्क विभाग, उपविभागीय अधिकारी व नगर परिषदेकडे जाणारा रस्ता, पंचायत समिती, दूरसंचार कार्यालय, आयकर विभाग, मुख्य डाकघर, शहर पोलिस ठाणे, सामाजिक वनिकरण, एकात्मिक बाल विकास प्रकल्प, उपविभागीय जलसंधारण कार्यालय, पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग या शासकीय कार्यालयांसह इतर कार्यालये आहेत.

तसेच जिल्हा परिषद हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज, अंजुमन हायस्कूल अशा अनेक शैक्षणिक संस्था आहेत. कार्यालय व शैक्षणिक संस्थेच्या समोरील परिसरात अनेक व्यावसायिकांनी टपऱ्या टाकून तर काहींनी लोखंडी अँगल गाडून टिन पत्र्याची दुकाने थाटली आहेत.

या अतिक्रमित दुकानावरच त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह अवलंबून आहे.

दिवसेंदिवस विळखा वाढतोय शहरातील नांदुरा रोडवर अनेकांनी जागोजागी अतिक्रमण करून दुकाने थाटून व्यवसाय सुरू केले आहेत.

दिवसेंदिवस या रस्त्यावर अतिक्रमण वाढतच जात आहे. दिवसागणिक वाढत जाणाऱ्या अतिक्रमणांमुळे त्या रस्त्याचा श्वास रोखला जात आहे.

हा श्वास मोकळा करण्यास संबंधित अधिकाऱ्यांना वेळ मिळत नाही किंवा त्यांना हे अतिक्रमण हटवायचे नाही, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. अधिकारी कार्यालयात जाण्यासाठी या रस्त्याचा वापर करतात.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **NASRIN BI WAJID KHAN.** NOW MY NEW NAME IS **NASREEN ABID PATHAN.**
**ADD :** PLOT NO 74, JAYHIND NAGAR ,MANKAPUR, NAGPUR,440030

MY OLD NAME WAS **NASRIN BI WAJID KHAN.** NOW MY NEW NAME IS **NASREEN ABID PATHAN.**
**ADD :** PLOT NO 74, JAYHIND NAGAR ,MANKAPUR, NAGPUR,440030

MY OLD NAME WAS **SANGEETA SANJAY GAIKWAD.** NOW MY NEW NAME IS **SANGITA SANJAY GAIKWAD.**
**ADD :** PLOT NO 4171/A/203, MISAL LAYOUT, INDORA NAGPUR 440014

MY OLD NAME WAS **TAHIR AFJAL KHAN PATHAN.** NOW MY NEW NAME IS **TAHIR KHAN AFJAL KHAN.**
**ADD :** AZAD COLONY BADA TAJBAG NAGPUR 440024

## CHANGE OF NAME

**I Hemant Govardhandas Mundhada, hereby declare that my name has erroneously been recorded in some records as Hemant Gowardhan Mundhra, While my correct Name is HEMANT GOVARDHANDAS MUNDHADA as per my Aadhar etc. Henceforth, I will be known with new name as HEMANT GOVARDHANDAS MUNDHADA in all future purpose.**

**Hemant Govardhandas Mundhada**

## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
### Tender Notice

Commissioner NMC invites Offline tenders for the following works. These tender can be submitted by the registered contractors of NMC. The Terms and conditions of tenders are available in tender form. The sale and purchase of Tender form at E.E. (DPDC) Office, 5th Floor, B-Wing NMC, Nagpur.

| Tender No. | Name of Work | BOQ Cost (Rs.) | EMD (Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | Renovation and Repairing of Samaj Bhavan near Hanuman mandir sahyog nagar in par. No. 02 | 834956 | 8400 |
| 2 | Providing and fixing I Blocks from H/o Sharma to H/o Hathibed at Guruteg bahadur nagar nari in pra. No. 02 | 819714 | 8400 |
| 3 | Construction of Foothpath at shri Nagar in pra.no. 32 | 833233 | 8400 |
| 4 | Construction of Foothpath at Bajrang Nagar Various places in pra. No. 32 | 833327 | 8400 |
| 5 | Construction of Foothpath at Vishwakarma Nagar various places in pra. No. 32 | 833443 | 8400 |
| 6 | Construction of Foothpath at new subhedar in front of srwasti school in pra. No. 32 | 833628 | 8400 |
| 7 | Construction of Compound wall, shed and fixing I Block at Ganesh mandir old kailas nagar in pra. No. 32 | 833352 | 8400 |
| 8 | Construction of Foothpath at mahalaxmi nagar 1 various in pra. No. 32 | 833135 | 8400 |
| 9 | Construction of Foothpath at Dyaneshwar Nagar in pra. No. 32 | 833138 | 8400 |
| 10 | Construction of Foothpath at namdev Nagar near H/o shri. Kadu and shri Nagpure in pra. No. 32 | 832974 | 8400 |
| 11 | Construction of Foothpath at uday nagar nagar various places in pra. No. 32 | 832968 | 8400 |
| 12 | Construction of Foothpath at Ambika Nagar near H/o Karangale in pra. No. 32 | 832973 | 8400 |
| 13 | Providing and laying 900mm dia Rcc storm Water Drain Line at ladikar Layout in pra. No. 32 | 835749 | 8400 |
| 14 | Providing and Laying strom water drain line at neelkamal nagar in pra. No. 29 | 833953 | 8400 |
| 15 | Providing & Laying Storm Drain line infront of House of Shri Rahul Ingle at Adiwasi Colony in pra. No. 32 | 835271 | 8400 |
| 16 | Construction of CC pavement road at bajrang nagar lane no. 15 in pra. No. 32 | 835368 | 8400 |
| 17 | Construction of CC Pavement at New Bahulkheda from H/o Shri Patil to Gawali in Prabhag No 34 | 833626 | 8400 |
| 18 | Providing and laying I-Block at Republican Vasahat in pra. No. 33 | 832370 | 8400 |
| 19 | Construction of Samaj Bhavan at Sewadal nagar in pra. No. 30 | 831398 | 8400 |
| 20 | Providing and laying k600 mm dia RCC Storm Water Drain Line at Ladikar layout near H/o Shirpurkar in pra. No. 32 | 835784 | 8400 |

**NOTE -** 1) Cost of Blank Tender form each Rs. 590/- **2)** Tender sale & submission start date : 09/12/2024. **3)** Tender submission and date/sales end date 23/12/2024. up to 5.00 pm. **4)** Date of opening of Tender (if possible) 24/10/2024 up to 5.00 pm. **5)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in tender document.

**Executive Engineer, (DPDC)**
**NMC, Nagpur.**

**Advt No. 761 PR Date 11.12.2024**

PN/24/761

## नित्यानंद उद्योग लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. ६-ए, एमआयडीसी, हिंगणा रोड, एमआयडीसी नागपूर, नागपूर-४४००१६, (महा)
**CIN:** U24100MH1976PLC018874 | **वेबसाइट:** www.nityanandudyog.com
**ईमेल आयडी:** info@nityanandudyog.com | **दूरध्वनी:** +91-9158566652

**सार्वजनिक सूचना**

**ज्याला त्याची चिंता असू शकते**

याद्वारे सर्वसामान्यांना सूचना देण्यात येत आहे की नित्यानंद उद्योग लिमिटेडचे प्लॉट क्रमांक ६-ए, एमआयडीसी, हिंगणा रोड, एमआयडीसी, नागपूर – ४४० ०१६, महाराष्ट्र, भारत येथे नोंदणीकृत पत्ता असलेली खाली नमूद केलेली कागदपत्रे हरवली आहेत आणि ते सापडत नाहीत. . कागदपत्रांचे तपशील खाली दिले आहेत:

| अ. क्र. | विशेष |
|---|---|
| 1 | कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत कंपनीची वैधानिक नोंदी ठेवली जातात. (वर्ष १९७६ ते २०१४ पर्यंत) |
| 2 | सूचनांच्या प्रती आणि अजेंडा, उपस्थिती नोंदवही (वर्ष १९७६ ते २००८) |
| 3 | रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई यांच्याकडे दाखल केलेले काही आरओसी फॉर्म (उदा. वार्षिक रिटर्न, ताळेबंद, वाटप फॉर्म, अधिकृत शेअर भांडवलात वाढ, संचालकाची नियुक्ती/राजीनामा, ऑब्जेक्ट बदलणे, नाव बदलणे, चार्ज फॉर्म). १९७६ ते २००६ पर्यंत |
| 4 | मंडळाचे कार्यवृत्त आणि सर्वसाधारण सभा (१९७६ ते २००८ पर्यंत) |
| 5 | पासून (१९७६ ते २००८ पर्यंत) शेअर हस्तांतरण फॉर्म |

वर नमूद केलेली माहिती गहाळ क्रमांक ९७४/२४ दिनांक ५ डिसेंबर २०२४ पोलीस स्टेशन तहसील नागपूर शहरासह द्वारे सादर केली गेली आहे. उपरोक्त कागदपत्रांपैकी कोणतीही कागदपत्रे कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात आल्यास, त्याने/तिला विनंती केली जाते की ती आमच्या कंपनीला प्लॉट क्रमांक ६-ए, एमआयडीसी, हिंगणा रोड, एमआयडीसी, नागपूर- ४४००१६, महाराष्ट्र, भारत. या नोंदणीकृत पत्त्यावर परत करा.

तारीख: ११ डिसेंबर २०२४
ठिकाण : नागपूर

गौरव अग्रवाल
व्यवस्थापकीय संचालक
**DIN:** 02521758

## MAHAVITARAN — Short e-Tender Notice

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Super scribed percentage rate e-tenders are invited from Established, Reputed & Experienced Contractors and who are registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for the works of **(1)** Various civil maintenance works and providing shed at NABL Lab Toilet at Mankapur, Dist. Nagpur amounting Rs. 1.65 Lakhs **(2)** Drilling of borewell, providing and commissioning submersible pump at 33/11 KV S/stn MHADA Dist. Nagpur amounting Rs. 1.15 Lakhs **(3)** Providing & Installing Fire Fighting Equipment's for Nagpur Rural Circle 33/11 Kv substations under MSKVY 2.0 Scheme, Dist. Nagpur amounting Rs. 8.26 Lakhs **(4)** Annual contract of civil maintenance works for Wardha and Hinganghat Division office under Wardha Circle, Dist. Wardha amounting Rs. 3.78 Lakhs **(5)** Construction of ladies toilet and maintenance work to existing gents toilet in the premises of store shed at Pachgaon, Tq. Umred, Dist. Nagpur amounting 3.97 Lakhs **(6)** Construction of New Transformer Plinth at 33 KV S/Stn. Sarangpuri in the premises of 132 KV S/Stn. Sarangpuri, Tq. Arvi, Dist. Wardha amounting Rs. 2.93 Lakhs **(7)** Misc. civil maintenance works such as metal spreading, Switchyard pipeline and control room Building and DC office maintenance works at 33/11 KV Substation Pimpalkhuta, Tq. Arvi, Dist. Wardha amounting Rs. 7.65 Lakhs **(8)** Providing metal spreading and various civil maintenance works to control room at 33 KV S/stn Kohli under O&M Division Saoner, Tq. Saoner, Dist. Nagpur amounting 6.90 Lakhs **(9)** Various civil maintenance works to the control room, DC office and chain link fencing of switchyard at 33 KV s/stn Umari, Tq. Saoner, Dist. Nagpur amounting Rs. 6.71 Lakhs vide e-tender specification **No. EEC/NGP/e-T-44/2024-25 to EEC/NGP/e-T-52/2024-25** respectively. The tender with all details will be available on MSEDCL's website **www.mahadiscom.in** from **date : 12.12.2024 to 18.12.2024** and submission on **19.12.2024 upto 13.00 hrs.** Corrigendum if any will not be published, the bidders have to check it on website itself.

**PRO NO. 232/NZ**
**Dated 10.12.2024**

**Executive Engineer (C)**
**CCCM Division, Nagpur**

# ईव्हीएम बॅन, बॅलेट पेपरवर ऑन किती संयुक्तिक?

**महाराष्ट्रातील पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडून आघाडीतील घटक पक्ष आप आपली जबाबदारी झटकू पहात आहेत. सोलापूर - मारकवाडी येथील ईव्हीएम विरोधात चाललेल्या आंदोलनाला शरद पवार यांनी भेट देऊन निवडणूक पद्धतीमध्ये बदल करण्याची गरज व्यक्त केली. मारकवाडीच्या आंदोलनामुळे ईव्हीएम विरोधात देश पेटत आहे.असे वक्तव्य करून महाराष्ट्र निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे. याबाबत सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून आपली हौस भागवून घेत आहेत. यामुळे निवडणूक कार्य प्रणालीची बदनामी होते आहे. खरेतर विरोधक ईव्हीएम बाबतचे ठोस पुरावे सुप्रीम कोर्टात सादर करू शकलेले नाहीत. विरोधकांची निवडणूकीत हार झाली की त्यांना ईव्हीएम दोषी आहे असे कां वाटावे असा प्रश्न सुप्रीम कोर्टाला पडलेला आहे.**

----------------

तेलंगणा, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, कर्नाटक, झारखंड, पंजाब, जम्मू - काश्मिर, महाराष्ट्र इ. राज्यात नुकत्याच ईव्हीएमवर निवडणुका लढवल्या गेल्या आहेत.तिथे विरोधकांनी निवडणुकीत ईव्हीएमच्या वापराला अनुमती देऊनच सत्ता स्थापन केलेली आहे, हे विसरून कसे चालेल? खरेतर याबाबत भाजपने आक्रमक भूमिका घेतली पाहिजे होती. परंतु असे झाले नाही. कारण देशातील निवडणूक बॅलेट पेपर ऐवजी ईव्हीएमवर घेण्याचा निर्णय कॉंग्रेसच्या कार्यकाळातच घेतला गेला होता. याची जाणीव भाजपला आहे. तेंव्हा तर बीजेपीला दोन आकडी संख्या गाठणे पणं कठीण झाले होते. तेंव्हाही संसदेतील विरोधकांचे स्थान नगण्य असेच होते. याची जाणीव जनतेला असली पाहिजे.


ईव्हीएम हे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र असल्याने यात फेरफार करून, ईव्हीएमला हॅंग करून पडलेले मतदान दुसरीकडे वळविता येते असा आरोप केला जातो आहे. हे आरोप निवडणूक आयोगाने अनेकदा फेटाळ्ले आहेत. परंतु महाराष्ट्रातील आघाडीचे घटक पक्ष ईव्हीएम विरोधात आखडपाखड करून आपला रोष व्यक्त करीत आहेत.

महाराष्ट्रातील विरोधकांचा निर्णय हा देशातील इतर राज्यातील पक्षांना मान्य असेलच असे नाही. देशात अनेक इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर, तज्ञ कार्यरत आहेत. त्यांनी आजपर्यंत समाजासमोर, मतदारांसमोर येऊन ईव्हीएम विरोधातील आपली भुमिका प्रभावीपणे मांडलेली नाही. एवढे सर्वकाही होऊनही इतर राज्यातून बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात यावे अशी मागणी लावून धरली जात नाही. मग फक्त महाराष्ट्राच्या भरवश्यावर आणि अट्टाहासावर ईव्हीएमला तिलांजली देणे शक्य होणार आहे?

अमेरिकेसारख्या लोकशाही प्रधान देशात बॅलेट पेपरवर मतदान घेतले जात आहे, असे सांगून महाराष्ट्रातील ईव्हीएम विरोधात रान उठवले जात आहे. ते ही फक्त काही पक्षांकडून! त्यांच्यातही विचार भिन्नता आहे. विविध पक्षांमध्ये एकमत झालेले नाही. निव्वळ कोल्हेकुई चालली आहे. यावर देशातील जनतेने तरी विश्वास कां ठेवावा?

महाराष्ट्र वगळता देशातील इतर राज्यात ईव्हीएम विरोधात वातावरण असल्याचे निदर्शनास आलेले नाही. मग देशातील निवडणूक आयोग फक्त महाराष्ट्रासाठी वेगळी भुमिका घेणार आहे कां? याचे उत्तर महाराष्ट्रातील विरोधी पक्षांकडून अपेक्षित आहे.

काड्या करणारे प्रत्येक क्षेत्रात पहायला मिळतात. तो मानवी स्वभावाचा दोष आहे.अशांना दोषी ठरवून शिक्षा करणे शक्य नसल्याने ईव्हीएम वर खापर फोडून



**मिलिंद गड्डमवार**
**राजूरा. जि. चंद्रपूर.**
**९५११२१५२००**

मोकळे होणे हे जास्त सोईचे ठरते आहे.असेच म्हणावे लागेल.

प्रत्येक पक्षाच्या सोईने निवडणूक आयोग चालू शकत नाही.तर आयोगाला संपुर्ण देशातील जनतेचा,पक्षांचा विचार करावा लागेल. महाराष्ट्रातील निवडणूक निकालानंतर आता जे काही मारकवाडी सारखे प्रकार सुरू आहेत ते निश्चितच सराहनीय नाहीत .ईव्हीएमच्या विरोधात जरूर भुमिका घ्या. परंतु ती निवडणूकीपुर्वी ! निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर नाही.

ईव्हीएम वर बहिष्कार घाला. परंतु निवडणूक पुर्व हे काम झाले पाहिजे. निवडणुकी नंतर तर मुळीच नाही. यामुळे मोठ्या लोकशाही प्रधान देशातील निवडणूक आयोगाची बदनामी ही होते आहे.ती ही केवळ महाराष्ट्रातील काही पक्षांमुळे.हे महाराष्ट्रातील चित्र खुप काही आश्वासक असेल असे वाटत नाही. देशातील नागरिकांना, तरूण मतदारांना तर सगळेच पर्याय उपलब्ध हवे आहेत. जेणे करून मतदान हे कुठूनही करता आले पाहिजे. त्याच वेळी मतदानाची टक्केवारी ही वाढू शकेल असे वाटते आहे.जुन्या मतदारांनी बॅलेट पेपर आणि ईव्हीएम दोन्हींचा चांगला व वाईट अनुभव घेतलेला आहे. तेंव्हा यातून काय निवडायचे आणि काय नाही निवडायचे हे मतदारांनाच ठरवू द्यावे. तो अधिकार कुठल्याही पक्षाला मुळीच नाही. तो जनतेचा अधिकार आहे. तो अबाधित असू द्या.

आता काही ग्रामपंचायतींनी बॅलेट पेपरवरच मतदान घ्या असा ठराव मंजूर करून निवडणूक आयोगाला फेर मतदानाचे आवाहन केले आहे. ही कृती निश्चितच भूषणावह वाटत नाही. कारण साप निघून गेल्यावर कितीही काठी आपटली तरीही साप मरणार नाही हे त्यांना चांगले माहीत आहे. म्हणून ही नौटंकी बंद करा आणि सन्मानाने पुढील निवडणुकीला सामोरे जा.

भविष्यात पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर पंचायत, नगर पालिका, महानगरपालिका यांच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. त्या बॅलेट पेपरवर घेण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने,नगर पंचायतीने ठराव पास करून तो प्रादेशिक निवडणूक आयोगाकडे पाठवावा. यावर त्या त्या संस्थेने ठाम असले पाहिजे. यात मतभिन्नता असता कामा नये. निवडणूक आयोग यासाठी तयार नसेल तर संपूर्ण गावांनी मतदानावर, निवडणूक प्रक्रियेवर बहिष्कार टाकावा. तरच ही कृती लोकशाही प्रक्रीयेला तारक असेल असे वाटते आहे.

आज जो बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचा तमाशा सुरू आहे यामागे आर्थिक राजकारण दडलेले आहे. मोठमोठे राजकारणी, साखर सम्राट लोकांनी गावच्या गावे आपली सत्ता केंद्रे स्थापन केलेली आहेत. खास करून पश्चिम महाराष्ट्रात हे सातत्याने सुरू आहे. ते त्या गावांना आपली जहागिरी, मक्तेदारी समजतात.

अश्या गावांमध्ये आपल्या पक्षाविरोधात मतदान होत असेल तर त्या पक्षांना परत मतदान घेण्याची गरज भासते आहे. यासाठीच बॅलेट पेपरचा आग्रह हा काही विशिष्ट गावांमधून धरला जातो आहे. याची माहिती निवडणूक आयोगाला चांगली आहे. भाजपने पश्चिम महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात आपल्या मित्र पक्षाच्या मदतीने पाय पसरणे सुरू केल्याने हा मतदान यंत्रणेतील घोळ सातत्याने समोर आणला जातो आहे. याकडे पणं लक्ष वेधले गेले पाहिजे.

आपल्या मर्जीतील काही गावांना हाताशी धरून हा सर्व ईव्हीएमचा खेळ मांडला जातो आहे. यासाठी आंदोलने करून निवडणूक आयोगाची बदनामी केली जाते आहे. सर्वच सरकारी यंत्रणा या केंद्र व राज्य सरकारच्या गुलाम नसतात. त्यांना पण स्वतःचे अस्तित्व असते. परंतु राजकारणी लोकांनी आपल्या विरोधात मतदान गेले की त्या यंत्रणेची बदनामी करणे सुरू केले आहे. ही अत्यंत गंभीर बाब ठरते आहे. याकडे पणं जनतेचे लक्ष वेधले गेले पाहिजे.

लोकशाही प्रक्रियेत हे राजकारणी लोक सरळ मतदारांना पैसे देऊन आपल्याच पक्षाला मतदान करण्यास सांगतात.ही बाब जनतेपासून लपून राहिलेली नाही.कधी कधी चांगले सुशिक्षित मतदार सुध्दा याला बळी पडतात.मग पैश्यांचे वाटप करूनही योग्य मतदान त्या त्या गावांमधून आपल्या पदरी पडले नसेल तर मग ईव्हीएमवर शंका उपस्थित होणारच? करीता हा सर्व पैशांचा खेळ मतदारांनी समजून घेतला पाहिजे. आपले मत विकले जाणार नाही याची काळजी मतदारांनी घेतली गेली पाहिजे. तरच लोकशाही प्रक्रियेवरील विश्वासाला तडा जाणार नाही.

●●●●●●●

# केंद्रात नरेंद्र..राज्यात देवेंद्र..!!

**(कालच्या अंकावरून पुढे)**

----------------

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भाजपने पुढचा विचार करत आपल्या घटक पक्षांना आणि दोन्ही भागिदारांना कोणत्याच पातळीवर असमाधानी आणि नाराज होण्याची संधी दिली नाही.

संघाची प्रभावी सक्रियता देखील राहिली. या कारणांमुळेच जागा वाटपात आणि उमेदवार निवडीत देखील किरकोळ मतभेद असतानाही तिन्ही पक्ष आणि नेत्यांनी एकत्र येत निवडणूक लढली. एकनाथ शिंदे जेव्हा उद्धव ठाकरे यांच्याशी बंडखोरी करत बाहेर पडले तेव्हा भाजप आपल्यावर सत्तेची कमान सोपवतील याची सुतराम कल्पना नव्हती.

कारण त्यावेळी भाजपकडे १०५ जागा होत्या. पण यावेळी भाजपने १३२ जागांवर विजय मिळवला आहे. त्यामुळे मुख्यमंत्रीपदासाठी भाजप हाच पहिला दावेदार असणे स्वाभाविक होते. असो, शिंदे-फडणवीसांमधील पेल्यातील वादळ अखेर शमले ते महाराष्ट्रासाठी हिताचे आहे. आता भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नव्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात होत आहे.

भाजपच्या विधिमंडळ नेतेपदी निवड झाल्यानंतर त्यांनी आपल्या भाषणांत हिंदवी स्वराज्यापासून अहिल्याबाई होळकर यांचा उल्लेख करत राजकीय प्रवासाची दिशा स्पष्ट केली. तसेच आता बदल्याचे नाही तर बदलाचे राजकारण करणार असे सांगत त्यांनी विकासात्मक कायार्बाबतचा आपला अग्रक्रम स्पष्ट केला आहे.

**उत्तरार्ध**

**शिवाजी विठ्ठल चौगुले**
**बेलेवाडी (मासा)**
**कोल्हापूर.**

महायुती ही निवडणुकीपूर्वीची आघाडी असून विचारांवर आणि विकासाच्या मुद्यावर हे पक्ष एकत्र आलेले आहेत. त्यामुळे या सरकारच्या स्थैयार्ला यत्किंचितही धोका नाही. अशा प्रकारचे स्थिर व भक्कम सरकार विकासाभिमुख कठोर निर्णय घेण्यासाठी महत्त्वाचे ठरते.

तरीही घटक पक्षांना सोबत घेऊन चालण्याची आणि कोणत्याही स्थितीत असंतोष निर्माण होणार नाही, याकडे महायुतीचे प्रमुख नेते म्हणून आणि सरकारचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विशेष लक्ष द्यावे लागणार आहे.

आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीत महायुतीतील घटक पक्षांना चांगली कामगिरी करावी लागणार आहे. अर्थात पहिले आव्हान मंत्रिमंडळातील खातेवाटपाचे आहे. ते समाधानपूर्वक मार्गी लावावे लागेल. त्यानंतर आर्थिक आव्हानांचा डोंगरही समोर आहे.

फडणवीस हे अर्थशास्त्र, कायदे, प्रशासन, सुशासन यांसह विविध क्षेत्रांवर पकड असणारे नेते आहेत आणि त्यांनी गेल्या १५ वर्षांत ही बाब सिद्ध केली आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे नवे शासन राज्याला विकासाच्या नव्या क्षितिजाकडे घेऊन जाणारे ठरावे हीच अपेक्षा....!!

■ ■

# वाढदिवस दक्षिणेतील देवाचा



दक्षिणेतील देव अशी ओळख असलेले सुपरस्टार रजनीकांत यांचा आज ७४ वा वाढदिवस. सुपरस्टार रजनीकांत यांच्या शिरपेचात तीन वर्षांपूर्वी एक मानाचा तुरा रोवला गेला होता.

रजनीकांत यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च अशा मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने दोन वर्षांपूर्वी गौरविण्यात आले होते. ६७ व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार सोहळ्यात तत्कालीन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते त्यांना या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. रजनीकांत यांना यापूर्वी पद्मभूषण (२०००) व विद्मविभूषण (२०१६) या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

जिवंतपणीच आख्यायिका बनलेले रजनीकांत हे एक अवलिया व्यक्तिमत्त्व. रजनीकांत यांच्या नावावर अनेक विनोद, टोमणे, उपदेश, म्हणी, मिम्स प्रचलित आहेत. रजनीकांत यांचे देश विदेशात हजारो फॅन क्लब्ज आहेत. रजनीकांत यांना उद्देशून एखादा अपशब्द जरी काढला तरी तामिळनाडूत दंगली उसळतात. त्यांच्या इतकी लोकप्रियता कोणत्याच अभिनेत्याला मिळालेली नाही. त्यांचा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच सुपरहिट झालेला असतो.

त्यांच्या चित्रपटाचे तिकीट काढण्यासाठी प्रेक्षक पहाटेपासूनच रांगा लावतात. त्यांच्या फोटोवर दुग्धाभिषेख करतात. तामिळनाडूत तर त्यांची मंदिरे आहेत. देवाप्रमाणे लोक त्यांची पूजा करतात. १२ डिसेंबर १९५० रोजी बंगळुरू येथे एका महाराष्ट्रीयन कुटुंबात रजनीकांत यांचा जन्म झाला.

त्यांचे खरे नाव शिवाजीराव गायकवाड असून त्यांच्या वडिलांचे नाव रामोजीराव गायकवाड असे असून आईचे नाव जिजाबाई असे आहे. पुरंदर तालुक्यातील मावडी-कडेपठार हे त्यांचे मूळ गाव. ८० - ९० वर्षांपूर्वी त्यांचे कुटुंब बंगळुरात स्थलांतरित झाले व तिथेच स्थायिक झाले. त्यांचे वडील कर्नाटक पोलिसात शिपाई होते.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

रजनीकांत यांना लहानपणापासून अभिनयाचे वेड होते. अभिनयाचे वेड जपत त्यांनी अनेक लहानसहान कामे केली. बारावी पास झाल्यावर काही काळ त्यांनी बस कंडक्टर म्हणूनही काम केले. नशिब आजमावण्यासाठी त्यांनी मद्रास फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला आणि सिनेजगताला एक सुपरस्टार मिळाला.

अपूर्ण रागंगल या तामिळ चित्रपटातुन त्यांनी आपल्या फिल्मी करियरची सुरवात केली. आजवर त्यांनी १५० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. अंधा कानून या चित्रपटातून त्यांनी बॉलिवूड मध्ये पदार्पण केले.

केवळ तामिळ आणि हिंदीच नव्हे तर कन्नड, तेलगू, तामिळ, बंगाली, इंग्रजी चित्रपटातून भूमिका केल्या. चार दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे रजनीकांत हे आपल्या अभिनयाबरोबरच आपल्या डॅशिंग स्टाईल आणि स्टंट साठीही ओळखले जातात.

लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण त्यांचे चाहते आहेत. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट, प्रेक्षकांची गर्दी खेचून आणणारे, आपल्या संवाद फेकी बद्दल प्रसिद्ध आणि विशिष्ट स्टाईल बद्दल प्रसिद्ध आणि आपल्या विशिष्ट अभिनय शैली साठी रजनीकांत ओळखले जातात.

दक्षिण भारतात त्यांच्या नावे सर्वात जास्त यशस्वी चित्रपट आहेत. त्यांचा चाहतावर्ग देशातच नाही तर विदेशातही आहे. जपानमध्ये त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. तिथे त्यांचे चित्रपट अधिक लोकप्रिय आहेत. तिथेही त्यांचे फॅन क्लब्ज आहेत.

सर्वाधिक चाहतावर्ग असलेला अभिनेता म्हणून त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये त्यांची नोंद झाली आहे. त्यांना चार वेळा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला आहे. रजनीकांत जितके अभिनेते म्हणून श्रेष्ठ आहेत तितकेच ते माणूस म्हणूनही श्रेष्ठ आहेत.

ते त्यांना मिळणाऱ्या मानधनाच्या एकूण ४० टक्के एव्हढी रक्कम समाजसेवेसाठी वापरतात. रजनीकांत हे असे एकमेव अभिनेते आहेत की जे एकाही उत्पादनाची जाहिरात करत नाहीत. उद्देश एकच की लोकांमध्ये कोणताही चुकीचा संदेश जाऊ नये. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या या सुपरस्टारला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

■ ■ ■ ■


# सावधान : घोणसच्या मिलनाचा काळ

सध्या घोणस या अतिविषारी सापाच्या मिलनाचा काळ असल्याने हे सर्प अडगळीच्या ठिकाणांमधुन बाहेर पडतात. हिवाळ्यातील कडाक्याच्या थंडीपासुन स्वतःच्या शरीराचे तापमान वाढविण्यासाठी ऊब मिळवण्यासाठी ऊनाला येवून बसतात.

शेणखताजवळच्या ऊबेला किंवा बाथरूमच्या पाईपमधुन, दाराच्या फटीतुन ऊबदार घरात हे सर्प शिरण्याची शक्यता याकाळात जास्त असते. त्यामुळे या कालावधीत यांच्या बाहेर पडण्याने सर्पदंश होण्याच्या प्रमाणात विलक्षण वाढ होते. बागकाम करणाऱ्या बागप्रेमींनी, शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी तसेच निसर्गभ्रमंती करणाऱ्या हौशी नागरिकांनी व गिर्यारोहकांनी आपली स्वतःची विशेष काळजी घेणे खुप गरजेचे आहे.









**जयराम श्रीरंग सातपुते**
**निसर्ग अभ्यासक**
**अहमदनगर जिल्हा निसर्गप्रेमी**
**तथा जैवविविधता संशोधन व संवर्धन समुह.**
**9604074796**

अडगळीच्या ठिकाणी काम करताना अथवा फिरताना पायात घोट्यापेक्षा जास्त उंचीचे बुट वापरावेत,अडगळीच्या ठिकाणी थेट हात न घालता काम करताना त्याठिकाणी लांब काठी फिरवुन घ्यावी,जेणेकरून हालचाल झाल्याने तिथले सरपटणारे प्राणी तिथुन दुर निघुन जातील. खिडकी दार बंद केल्यावर फट राहणार नाही याची काळजी घ्यावी, बाथरूमच्या पाईपला जाळी बसवलेली असावी.

मांजरांची नजर अतिशय तिक्ष्ण असते.त्यामुळे मोकळ्या शेतात,रानात घर असणाऱ्यांनी मांजर पाळणे खुप फायद्याचे ठरते मांजर अशा सरपटणाऱ्या प्राण्यांबद्दल आपणास कळत-नकळत सावधान करते,त्यामुळे पुढील अनर्थ टाळता येतात.या सापाचा मुख्य नैसर्गिक शत्रू म्हणजेच मुंगुस त्याच्यामुळेही घोणसची संख्या नियंत्रणात येते.

पाठीवर असणाऱ्या बदामी आकाराच्या एकसारख्या नक्षीवरून हा सर्प चटकन ओळखता येतो. कोणाला जर या सर्पाचा दंश झालाच तर कुठेही कसल्याही प्रकारे वेळ न दवडता रूग्णास त्वरीत नजीकच्या तालुका सरकारी दवाखाण्यात दाखल करावे व ॲन्टीवेनम प्रतिविषाची लस घेण्यास प्राधान्य द्यावे. जेवढ्या कमी वेळेत ही लस घेतली जाते तेवढे रूग्णाचे प्राण वाचण्यास व रूग्ण लवकर बरा होण्यास मदत होते.

भारतात विषारी सर्पांचे जे जे मुख्य प्रकार सर्वत्र आढळुन येतात त्या सर्वांची मिळुन एकच ॲंटीवेनम प्रतिविषाची लस सरकारी दवाखाण्यांमध्ये आता उपलब्ध करून दिलेली असते. त्यामुळे कुठल्याही विषारी प्रजातीच्या सपार्चादंश झाला तरी ती एकच लस रूग्णास दिली जाते. म्हणुनच सर्पदंशानंतर सापाच्या प्रजातीची ओळख पटवण्यासाठी सापाला शोधण्यात,त्याचे फोटो सोबत घेण्यात किंवा त्याला मारून सोबत घेण्यात आपला वेळ आजिबात वाया घालवू नये.

NAJA हे होमिओपॅथी औषधाचे दोन थेंब सर्पदंश झालेल्या रूग्णाच्या जीभेवर ठेवल्यास रूग्ण बरा होतो अशी FAKE POST (खोटी पोस्ट) सोशल मेडियावरून वारंवार व्हायरल होत असते. परंतु

NAJA हे होमिओपॅथि औषध हृदयरोगासंबंधीच्या काही आजारांसाठी बनवले गेलेले आहे. सर्पदंशाचा व ठअखअ या औषधाचा तसा तिळमात्र संबंध नाही. सर्पविष रूग्णाच्या हृदयावरही परिणाम करत असल्याने सर्पदंश झालेल्या रूग्णास या ठअखअ औषधाचा थोडाफार फायदाही होवु शकतो पण रूग्णाचे प्राण वाचविण्यासाठी फक्त आणि फक्त प्रतिविषाची लस लवकरात लवकर घेणे गरजेचे आहे.

सर्पावरील प्रतिविषाची लस सर्पदंश झालेल्या रूग्णास वेळेत मिळावी यासाठी प्रत्येक शासकीय तालुकारूग्णालयात ती उपलब्ध करून ठेवणे आता बंधनकारक केलेले आहे,तरीही एक सामाजिक बांधिलकी म्हणुन आपण आपल्या तालुका रूग्णालयाशी कृपया संपर्क करून उपलब्धतेबाबत जरूर खात्री करून घ्यावी..!

घोणस सापाची ही प्रजाती आपले अंडे निसर्गात न सोडता आपल्या शरिराच्या ओटीपोटातच उबवते त्यामुळे इतर सर्पांच्या तुलनेत घोणसचा जन्मदर व पिल्ले जगण्याचा दर यामध्ये खुप कमी तफावत असते. त्यामुळे एकावेळी अनेक सुदृढ पिलांचा जन्म होतो या सपार्चे नुकतेच जन्मलेले पिल्लूही प्रौढ सर्पाइतकेच विषारी असते त्यामुळे लहान पिल्लापासुनही सावध रहाणे गरजेचे असते.

■ ■ ■

# या भाज्या आहेत प्रथिनांचा उत्तम स्त्रोत

आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवण्यासाठी प्रथिने महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यासोबतच आपल्या स्नायूंचे संपूर्ण आरोग्य राखण्यासाठी प्रथिने आवश्यक आहे. अशा परिस्थितीत आपल्या दैनंदिन आहारात प्रथिनांचा समावेश करणे अत्यंत गरजेचे आहे. ज्यामुळे आपले आरोग्य चांगले राहील अनेक रोग आपल्यापासून दूर राहतील.

मांसाहारी आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये भरपूर प्रमाणात प्रथिने असतात असे म्हटले जाते. असे असले तरी जर तुम्ही शुद्ध शाकाहारी असाल तर तुम्हाला काळजी करण्याची अजिबात गरज नाही. अशा अनेक भाज्या आहेत ज्याचे सेवन करून तुम्ही सुद्धा प्रथिनांचे प्रमाण वाढवू शकता. या भाज्यांमध्ये फक्त प्रथिनेच नाही तर इतर पोषक तत्वे ही भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे याचा दुप्पट फायदा होतो आणि हे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.



**पालक :** पालकांमध्ये प्रथिन्यांसह लोह ही उत्तम प्रमाणात असते. पालक खाण्यासाठी तुम्ही पालकाची भाजी घरी बनवू शकता. यासोबतच पालकाचा वापर तुम्ही स्मुदी किंवा सॅलेड बनवण्यासाठी करू शकता. पालकाच्या भाजीमध्ये कॅलरीज कमी असतात पण त्यामध्ये भरपूर प्रमाणात पोषक तत्वे, जीवनसत्वे आणि फायबर असते. ज्यामुळे पालक सुपर फूड म्हणून ओळखले जाते.

**ब्रोकोली :** प्रथिनांचा उत्तम स्त्रोत म्हणूनही ब्रोकोली ओळखली जाते. ब्रोकोली मध्ये व्हिटॅमिन सी देखील मोठ्या प्रमाणात असते. ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. यासोबतच ब्रोकोली मध्ये फायबरही भरपूर प्रमाणात असते.

**ब्रुसेल स्प्राऊट्स :** यामध्ये मोठ्या प्रमाणात फायबर आणि अँटॉक्सिडंट असतात ज्यामुळे पचनशक्ती सुधारण्यास मदत होते. याशिवाय ब्रुसेल स्प्राऊट्स मध्ये व्हिटॅमिन के देखील मोठ्या प्रमाणात असते. जे हाडे मजबूत करण्यासोबतच आवश्यक पोषकत्वांपैकी एक आहे. त्यात व्हिटॅमिन सी देखील मोठ्या प्रमाणात आढळते.

**वटाणे :** प्रोटीनचे प्रमाण वाढवण्यासाठी वटाणे फायदेशीर ठरतात.

वटाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात फायबर आणि अँटिऑक्सिडंट असतात ज्यामुळे हृदयाचे आरोग्य सुधारते आणि पचन सुधारण्यास देखील मदत होते. वटाण्यामध्ये आवश्यक अमिनो ॲसिड देखील असतात जे स्नायूंच्या वाढीस प्रोत्साहन देतात.

**डाळ :** भारतीय घरात मध्ये डाळ ही एक सामान्य गोष्ट आहे. डाळीचे सेवन करण्याचे अनेक फायदे आहेत. रक्तदान नियंत्रित करण्यासाठी आणि पचनास मदत करण्यासाठी डाळ फायदेशीर ठरते. डाळीमध्ये लोह, फोलेट, व्हिटॅमिन बी, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि जस्त चांगल्या प्रमाणात आढळतात. डाळ प्रथिने आणि फायबरचा एक उत्तम स्त्रोत आहे.

■ ■ ■

## अशोकायन

**कानपिचक्या!**

**मोफत धान्य वितरण असो**
**की लाडकी बहीण योजना**
**किती दिवस ठेवायचे**
**हे तर सांगा ना?**

**न्यायालयाने टोचले**
**केंद्र शासनाचे कान**
**त्यापेक्षा का देत नाही बरे**
**रोजगार निर्मितीवर ध्यान?**

**अनुत्पादक वाटपाने**
**खजिना होतो खंगार**
**कार्य प्रेरणाही नष्ट होते**
**याचा विचार कधी करणर?**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## वन्यप्राण्यांचा बंदोबस्त अत्यावश्यक

**वाचक लिहितात**

जंगलालगतच्या गावात वन्यप्राण्यांनी अक्षरशः हैदोस घातला असून, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. शासनाने हा विषय गांभिर्याने घेणे अत्यावश्यक वाटते.

विदर्भाच्या काही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जंगल असून, वन्यप्राण्यांची मोठी संख्या आहे. ताडोबा, पेंच, नागझिरा नवेगाव बांध, उमरेड कऱ्हांडला, मेळघाट, टिपेश्वर, बोरधरण अशी अनेक अभयारण्य आणि टायगर प्रोजेक्ट आहेत. शिकार आणि अन्य कारणांमुळे वन्यप्राण्यांच्या अनेक प्रजाती लुप्त होत असून, वन्यप्राण्यांचे संरक्षण करणे नितांत गरजेचे आहे. याविषयी कुणाचेही दुमत असू नये. तथापि, वन्यप्राणी गावात शिरतात किंवा शेतात गेलेल्या महिला पुरूषांवर हल्ले करून त्यांना ठार मारतात. गेल्या काही वर्षात शेकडो नागरिकांच्या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. अशावेळी सरकार १० लाख रूपये देवून आपल्या कर्तव्याची इतिश्री करते. परंतु, केवळ काही लाख रूपये देवून हा प्रश्न सुटणार नाही. सरकारने कायमस्वरूपी उपाययोजना करायला हव्यात.

■ **निलकंठ सोनकुसरे, नागपूर.**

# एसबीआय कार्डने फोर्स मार्कमध्ये २ कोटी कार्ड्सचा टप्पा ओलांडला




**महासागर प्रतिनिधी, नवी दिल्ली, दि.११ :** भारतातील सर्वात मोठे प्युअर प्ले क्रेडिट कार्ड जारीकर्ता, एसबीआय कार्ड ने संपूर्ण देशात नाविन्यपूर्ण उपाय देणे आणि ग्राहकांचा अनुभव समृद्ध करण्याच्या वचनबद्धतेला अधोरेखित करत २ कोटी कार्ड्सचा टप्पा ओलांडला आहे. हे यश भारताच्या क्रेडिट कार्डच्या लँडस्केपमध्ये बदल करण्यात एसबीआय कार्डची महत्त्वाची भूमिका आणि डिजिटल इंडियाचे चलन चे वचन देखील अधोरेखित करते.

एसबीआय कार्ड १९९८ मध्ये आले. अगदी सुरुवातीपासून एसबीआय कार्ड ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीची रचना करण्यात अग्रेसर आहे. विचारशील कोर कार्ड्स, प्रीमियम ब्रँड्ससह सह-ब्रँडेडभागीदारीपासून आणि रिवॉर्ड्स-चालित आणि जीवनशैली-केंद्रित ऑफरपर्यंत, एसबीआय कार्डने भारतीय क्रेडिट कार्ड उद्योगात ग्राहक-केंद्रित नवोपक्रमासाठी सातत्याने नवीन बेंचमार्क सेट केले आहेत आणि बाजारपेठेत आपले नेतृत्व मजबूत केले आहे. एसबीआय कार्डने वित्त वर्ष १९ आणि वित्त वर्ष २४ च्यादरम्यानात कार्डांमध्ये सुमारे २५% सीएजीआर आणि खर्चात २६% सीएजीआर ची मजबूत वाढ दाखवली आहे.

या कामगिरीवर भाष्य करताना एसबीआय कार्डचे एमडी आणि सीईओ अभिजित चक्रवर्ती म्हणाले: एसबीआय कार्ड ब्रँड 'मेक लाइफ सिंपल' च्या मूल्य प्रस्तावावर आधारित आहे. २ कोटी कार्ड्सचा टप्पा पार करणे हा आमच्या ग्राहकांचा आमच्यावर असलेला विश्वास आणि आत्मविश्वासाचा पुरावा आहे. जे आमचे नावीन्य, उत्कृष्ट ग्राहक सेवा आणि प्रत्येक भारतीयाला सोयीस्कर, सुरक्षित आणि फायद्याचे पेमेंट सोल्यूशन्सनी सक्षम बनवण्याच्या अथक लक्षाला दर्शविते. आम्ही आमच्या वाढत्या ग्राहकांना अतुलनीय मूल्य देण्यासाठी वचनबद्ध आहोत कारण आम्ही त्यांच्या विकसित गरजा सतत पूर्ण करत आहोत.

# इंटरनॅशनल जेमोलॉजिकल इन्स्टिट्युट (इंडिया) लिमिटेडचा रु. ४,२२५ कोटींचा आयपीओ (प्रारंभिक सार्वजनिक ऑफर)

**महासागर प्रतिनिधी, नवी दिल्ली, दि.११ :** इंटरनॅशनल जेमोलॉजिकल इन्स्टिट्युट (भारत) लिमिटेडच्या (आयजीआय किंवा कंपनी), इक्विटी शेअर्सच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी शुक्रवार, १३ डिसेंबर २०२४ रोजी बोली सुरू होणार आहे. रु. २ चे दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअर्सच्या एकूण ऑफर रु. ४२,२५० दशलक्ष आकाराची रु. ४,२२५ कोटी असून, त्यामध्ये रु. १४,७५० दशलक्ष (रु. १.४७५ कोटी पर्यंतच्या नवीन इश्यूचा समावेश आहे. रु. २७,५०० दशलक्ष रु. २,७५० कोटी पर्यंतच्या इक्विटी शेअर्सच्या विक्रीसाठी ऑफरचा समावेश आहे. इश्यूचा प्राइस बँड रू. ३९७ ते रु. ४१७ प्रति इक्विटी शेअर रुपये निश्चित केला आहे. (द प्राइस बँड). कर्मचारी आरक्षण विभागामध्ये बोली लावत असलेल्या पात्र




कर्मचाऱ्यांना प्रति इक्विटी शेअरसाठी छ३९.७ ते छ४१.७ इतकी सवलत दिली जात आहे. किमान ३५ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३५ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावता येईल. (बिड लॉट). कंपनीने नेट प्रोसिड्सचा वापर पुढे नमूद केलेल्या गोष्टींसाठी करण्याचा प्रस्ताव दिला आहे अंदाजे प्रवर्तकाकडून आयजीआय बेल्जियम ग्रुप आणि आयजीआय नेदरलँड्स ग्रुपच्या संपादनासाठी खरेदी मोबदल्याचे पेमेंट रु. १३,००० दशलक्ष रु. १,३०० कोटी; आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशासाठी शिल्लक रक्कम. (ऑफरचा उद्देश) विक्रीच्या ऑफरमध्ये - लि. च्या, दशलक्ष रु. पर्यंतच्या रु. २,७५० कोटी (प्रमोटर सेलिंग शेअरहोल्डर) एकूण इक्विटी शेअर्सचा समावेश आहे.

इक्विटी शेअर्स कंपनीच्या ६ डिसेंबर, २०२४ रोजीच्या रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसद्वारे ऑफर केले जात आहेत, जो महाराष्ट्र, मुंबई येथील कंपनी रजिस्ट्रारकडे सादर करण्यात आला आहे.

ब्लॅकस्टोनच्या प्रायव्हेट इक्विटी एशियाचे प्रमुख अमित दीक्षित म्हणाले: आम्हाला आयजीआयच्या या पुढील वाटचालीस पाठिंबा देताना अभिमान वाटतो.

# 'अजय भारत' विश्वासासह १४० कोटी देशवासीयांच्या सुरक्षेचे श्रेय

**महासागर प्रतिनिधी, नवी दिल्ली, दि.११ :** साहस, वीरता आणि बलिदानातून बीएसएफने केल्या देशाच्या सिमा मजबूत आणि सुरक्षित 'देशातील १४० कोटी लोकांच्या मनात 'अजय भारता' बद्दल निर्माण केलेल्या विश्वासाचे संपूर्ण श्रेय हे छातीचा कोट करून देशाच्या सीमांवर उभ्या असलेल्या



वीर सैनिकांना जाते.' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या काही वर्षांत आंतरिक सुरक्षेपासून ते सीमा सुरक्षेपर्यंत मोठा बदल घडवून आणला आहे. संपूर्ण जग याचे साक्षीदार झाले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी येथे केले. राजस्थानातील जोधपूर येथे सीमा सुरक्षा दलाच्या ६०व्या स्थापना दिन सोहळ्यात केंद्रिय गृहमंत्री शाह प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. गेल्या वर्षांच्या कार्यकाळात सीमा सुरक्षा दलाने अतुल्य साहस, वीरता आणि बलिदानातून देशाच्या पहिल्या नियंत्रण रेषेची फक्त सुरक्षा यंत्रणाच मजबूत केली नाही, तर सीमा प्रश्नांशी लढताना नागरिकांची सुरक्षा देखील सक्षम केली आहे, असे नमूद करीत केंद्रिय गृहमंत्री शाह म्हणाले, १ डिसेंबर १९६५ पासून आजपर्यंत सीमा सुरक्षा दलाने देशाच्या पूर्व आणि पश्चिम सीमांच्या सुरक्षेसाठी अखंडपणे समर्पणातून सेवा दिली आहे.

# कोटक सिक्युरिटीज तर्फे २०२५ साठी बाजाराच्या संभाव्य वाटचालीवर प्रकाशझोत अहवाल प्रसिध्द




**महासागर प्रतिनिधी, मुंबई दि.११ :** कोटक सिक्युरिटीज लिमिटेडने २०२५ मध्ये शेअरबाजाराची वाटचाल कशी राहील, याबाबत आपला मार्केट आउटलुक अहवाल आज प्रसिद्ध केला. कोटक सिक्युरिटीजने या अहवालात समभाग, कमोडीटी आणि चलन बाजाराच्या संभाव्य वाटचालीसह ढोब्ळ अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनावर प्रकाशझोत टाकला आहे. या अहवालामुळे गुंतवणूकदार आगामी वर्षात या घटकांच्या वाटचालीवर आपले लक्ष ठेवू शकणार आहेत. कोटक सिक्युरिटीजचे एमडी आणि सीईओ श्रीपाल शाह या अहवालाच्या प्रकाशनप्रसंगी म्हणाले, जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताने आपले स्थान कायम राखले आहे. त्यामुळे जागतिक गुंतवणूकदारांसाठी भारत हा एक आकर्षक गुंतवणूक केंद्र म्हणून उदयास आले आहे. दीर्घकाळात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वृध्दीच्या क्षमतेवर आम्हाला ठाम विश्वास असला तरी गुंतवणूकदारांनी बाजाराबाबत आशावाद कायम ठेवताना सावधानता बाळगण्याचा सल्ला आम्ही देतो. शेअर बाजाराला अधिक गती मिळेल आणि २०२५ मध्ये कमोडिटी (वस्तू) त्यांच्या ऐतिहासिक पातळीच्याही पुढे जातील, असा आमचा अंदाज आहे.

# संभव बैठकीच्या पाचव्या सत्रात ॲमेझॉनतर्फे विकसित भारतसाठी असलेली बांधिलकी मजबूत

**महासागर प्रतिनिधी, नवी दिल्ली, दि.११ :** पाचव्या वार्षिक संभव समिट मध्येॲमेझॉननेविकसित भारतसाठी आपली वचनबद्धता मजबूत करणाऱ्या अनेक उपक्रमांची घोषणा केली. संभव समिट हा ॲमेझॉनचा भारतातील लघु व्यवसायांचा सन्मान, समर्थन आणि सक्षमीकरण करण्याचा एक प्रयत्न असूनभारतभर आणि जागतिक स्तरावर त्यांच्या विकासाला चालना देण्याचे उद्दिष्ट आहे. याचाच भाग म्हणूनभारताला जागतिक उत्पादन केंद्र म्हणून स्थापित करण्याच्या सरकारी प्राधान्याला गती देण्यासाठी ॲमेझॉनने सोबत सामंजस्य करार केला आहे. ॲमेझॉननेसंभव व्हेंचरफंड मधून१२० दशलक्ष डॉलर राखून ठेवले असून ते भारतातील ग्राहकोपयोगीवस्तूंच्या उत्पादनांचे डिजिटायझेशन करणाऱ्या आणि देशांतर्गत तसेच जागतिक मागणी पूर्ण करणाऱ्यास्टार्टअप्समध्ये गुंतवणूक




करण्यासाठी वापरले जातील. यामुळे हजारो रोजगार निर्माण होतील.ॲमेझॉनने आपली निर्यातवचनबद्धता चार पट वाढवली आहे आणि पर्यंत भारतातून ८० अब्ज डॉलर एकूण निर्यात सक्षम करण्याची योजना आखली आहे. हा महत्त्वाचा टप्पा ॲमेझॉनच्या'ग्लोबल सेलिंग' कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतीय , उत्पादक आणि २ स्टार्टअप्सनानिर्यात सुलभ करून तसेच ॲमेझॉनच्या जागतिक बाजारपेठांमध्ये मेड-इन-इंडिया उत्पादनांची विक्री करून गाठला जाईल. ॲमेझॉन घरगुती आणि स्वयंपाकघरातील उत्पादने, कापड, खेळणी, आरोग्य व पोषण पूरक पदार्थ, आयुर्वेद उत्पादने इत्यादी विविध क्षेत्रांतील निर्यातीस प्रोत्साहन देत राहील. ॲमेझॉनने भारत भरातील व्यवसायांसाठी आपली जागतिक दर्जाची, विश्वासार्ह आणि किफायतशीर लॉजिस्टिक्स सेवा सुरू केली आहे. कंपनीने ॲमेझॉनफ्राईट आणि ॲमेझॉनशिपिंग सुरू केले आहेत. ॲमेझॉनफ्राईट अंतर्गत देशांतर्गत शहरांमध्ये आणि शहरांदरम्यान मालवाहतूक सेवांसाठी ५ फूट ते ४० फूट पूर्ण ट्रकलोड पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. ते विविध क्षमतेच्या गरजा पूर्ण करतात. तसेच ॲमेझॉनशिपिंग अंतर्गत १४,००० हून अधिक पिनकोड्ससाठी उत्कृष्ट वितरण तारीख आणि पिकअप अनुभवासह लास्टमाईल वितरण सेवा सुरू केली आहे. भारत सरकारचे रस्ते वाहतूक आणि महामार्गविभागाचे केंद्रीय मंत्री सन्माननीय श्री. नितीन जयराम गडकरी म्हणाले, सरकारच्या 'विकसित भारत' या दृष्टिकोनाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व भागधारकांचे सक्रिय योगदान महत्त्वाचे आहे.

# होरिबाने भारतातील पहिल्या हायड्रोजन इंटरनल कम्बशन इंजिन (H2-ICE) चाचणी बेड सुविधेचे उद्घाटन केले




**महासागर प्रतिनिधी, पूणे, दि.११ :**-होरिबा क्योटो- जपान- स्थित होरिबा लिमिटेड समूहाची आघाडीची कंपनी, ऊर्जा आणि पर्यावरण, जैव आणि आरोग्यसेवा आणि सामग्रीसह समूहाच्या तीन क्षेत्रांसाठी विश्लेषणात्मक साधने आणि मापन उपाय प्रदान करते. कंपनीने आता आणि सेमीकंडक्टर्सने हायड्रोजनच्या वेगाने उदयास येत असलेल्या क्षेत्रात प्रवेश केला आहे. होरिबा ने चाकण, पुणे येथील होरिबा इंडिया टेक्निकल सेंटर येथे आपल्या पहिल्या हायड्रोजन इंटरनल कम्बशन इंजिन (H2-ICE) चाचणी बेड सुविधेचे उद्घाटन केले आहे. ही नवीन संस्था केवळ व्यवसायाच्या मार्गांचा विस्तार करणार नाही तर कार्बन न्यूट्रॅलिटी, डी कार्बोनायझेशन आणि टिकाऊपणा साध्य करण्याच्या जागतिक दृष्टीकोनात महत्त्वपूर्ण योगदान देईल.होरिबा इंडियाचे चाकण युनिट होरिबा इंडिया टेक्निकल सेंटर १०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीसह २०१६ मध्ये सुरू करण्यात आले होते आणि ते १०,००० चौरस मीटर क्षेत्रफळावर पसरलेले आहे. हे उत्सर्जन मापन प्रणाली, प्रगत विश्लेषणात्मक उपकरणे आणि स्वदेशी सानुकूलित युनिटसाठी २००६ पासून प्रात्यक्षिक आधार म्हणून कार्यरत आहे. ही अत्याधुनिक सुविधा ९००१: २०१५, १४००१: २०१५, ४५००१: २०१८ आणि - १७०२५ :२०१७ सह मान्यताप्राप्त आहे जी मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत मोहिमेला समर्थन देते. होरिबाने २/३ व्हील चेसिस डायनामोमीटर, मेक इन इंडिया चेसिस डायनो, टेस्टिंग कंटिन्युअस एमिशन मॉनिटरिंग सिस्टम म्बियंट एअर क्वालिटी मॉनिटरिंग सिस्टम आणि वॉटर क्वालिटी.

# हाय-व्होल्टेजमनोरंजन फक्त एण्ड टीव्हीवर!



**महासागर प्रतिनिधी, मुंबई दि.११ :** या आठवड्यात, एण्ड टीव्हीवरील मालिका अटल', भीमा', हप्पू की उलटन पलटन' आणि भाबीजी घर पर है' काही रोमांचक मनोरंजन सादर करणार आहेत, जे प्रेक्षकांना त्यांच्या टेलिव्हिजन स्क्रिन्सवर खिळवून ठेवतील. एण्ड टीव्हीवरील मालिका अटल'मधील एपिसोडबाबत कृष्णा देवीची भूमिका साकारणाऱ्या नेहा जोशी म्हणाल्या, ब्रिटीशांना प्रतिकार करण्याच्या प्रयत्नामध्ये अटल मोठा लढा लढण्याचे ठरवतो. यामुळे अटल मोठ्या संकटात सापडणार याची जाणीव असलेली भावना अटलची आई कृष्णा देवीच्या मदतीने योजना आखते. अटलला त्याची आई कृष्णा देवी बेपत्ता असल्याचे समजल्यानंतर तणावाची स्थिती निर्माण होते. '' एण्ड टीव्हीवरील मालिका भीमा'मधील एपिसोडबाबत मेवाची भूमिका साकारणारे अमित भारद्वाज म्हणाले, भीमा तिचा अपमान करणाऱ्या सुनिलला दुखापतग्रस्त करते, ज्यामुळे तो सूड घेण्याचे ठरवतो. तो कलिका सिंगकडे जातो, जी त्याला मलिकाशी ओळख करू देते आणि तिला भीमाचे अपहरण करून कोलकाताला पाठवण्यास सांगते. सुनिल भीमाचे अपहरण करून तिला मलिकाकडे घेऊन जातो, दरम्यान धनिया आणि कुटुंबिय तिचा शोध घेऊ लागतात. ते शेवटी कैलाशा बुआच्या घरी जातात आणि भीमाचा शोध घेण्यासाठी तिच्याकडे मदत मागतात, पण त्यांचे प्रयत्न व्यर्थ ठरतात.'' मालिका हप्पू की उलटन पलटन'मधील एपिसोडबाबत दरोगा हप्पू सिंगची भूमिका साकारणारे योगेश त्रिपाठी म्हणाले, हप्पू त्याच्या कुटुंबाला काश्मीरला घेऊन जाण्याचे वचन जातो.


## आज का अंदाज

गुरूवार १२ डिसेंबर २०२४

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| ६७० | ३४९ | ३६८ | ३७४ | ७८९ | २३० | १७० | ५७७ |
| ५८० | २७७ | ४५८ | ५७८ | ६८० | ३५७ | २६० | ३८८ |
| ४९० | १५० | ५५७ | ४७९ | ५९० | ४५६ | ३५० | १४४ |
| ३९ | ६९ | ७१ | ०१ | ४३ | ५३ | ८६ | ९६ |
| ३२ | ६२ | ७४ | ०४ | ४७ | ५७ | ८० | ९० |
| ३५ | ६५ | ७८ | ०८ | ४१ | ५१ | ८२ | ९२ |

१२ डिसेंबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५३ | ८३ |
| १९ | २९ | ५४ | ८४ |
| १७ | २७ | ५६ | ८६ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल, १०० टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## आजचे राशिभविष्य

**मेष :** मालमत्तेशी संबंधित कामांसाठी प्रयत्न वाढतील. व्यवसायात सहका-यांशीसमन्वय ठेवावा लागेल. संयमाने आणि उत्साहाने काम करा. रागावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न करा.

**वृषभ :** पदोन्नती होईल, पगार वाढण्याची शक्यता आहे. आर्थिक बाजू सुरळीत राहील. आर्थिक बाबतीत व्यावसायिकांशी भेटीगाठी होतील. नोकरीत वाद टाळा. मित्रांच्या मदतीने अडचणी दूर होतील.

**मिथुन :** प्रतिकूल परिस्थितीवर धैयार्ने व शौयार्ने नियंत्रण ठेवा. विरोधी पक्षाच्या कारवायांकडे लक्ष देण्याची गरज आहे. गुप्त कारवायांमधून तुमचे नुकसान करण्याचा प्रयत्न कराल.

**कर्क :** हरवलेली कोणतीही मौल्यवान वस्तू सापडू शकते. उद्योग सुरू करण्याच्या योजनेला गती मिळेल. जोडीदाराशी एकनिष्ठ राहाल. महत्त्वाची कामे आणि कामात अपेक्षित यश मिळण्याची चिन्हे आहेत.

**सिंह :** नोकरीत बढतीची चांगली बातमी मिळेल. कोर्टाच्या कामात थोडे सावध राहाल. आज प्रेमसंबंधांमध्ये सुसंवाद राहील. भावनिक चर्चा चांगली होईल. नात्यात जवळीकता येईल.

**कन्या :** परदेश प्रवासाची संधी मिळेल. आवडीच्या कामात अडकणे टाळा. राजकारणात मित्रपक्ष फायदेशीर ठरतील. शारीरिक श्रम करणा-यांलोकांना फळ मिळेल. कार्यक्षेत्रात गोंधळ निर्माण होऊ देऊ नका.

**तुळ :** आज वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्येतभेदाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. आनंद आणि सहकार्य सामान्य राहील.

**वृश्चिक :** मोठ्या प्रकल्पांवर लक्ष केंद्रित कराल. व्यवसायातील लोकांना नवीन बाबींमध्ये रस राहील. कायमस्वरूपी मालमत्ता खरेदी करण्याची शक्यता आहे. काम तन्मयतेने कराल.

**धनु :** नवीन काम सुरू करू शकाल. जवळचे नातेवाईक. हितचिंतकांचे सहकार्य मिळण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी सकारात्मक बदल दिसून येतील. आधीपासून थांबलेली कामं पूर्ण होतील.

**मकर :** सर्वांशी समन्वय राखा. आज तुम्हाला आर्थिक क्षेत्रातील वरिष्ठ व्यक्तीकडून सहकार्य आणि कंपनी मिळेल. सरकारी सत्तेचा लाभ मिळेल. व्यवसायात वडिलांचे सहकार्य मिळेल.

**कुंभ :** लोक तुमच्या कार्यशैलीने प्रभावित होतील आणि तुमची प्रशंसा करतील. तणावपूर्ण परिस्थितींना तोंड द्यावं लागू शकतं. जमा झालेले भांडवल मुलांवर किंवा प्रियजनांवर खर्च करावे लागू शकतं. ओळखीच्या व्यक्तींच्या वागण्यामुळे तणाव निर्माण होईल.

**मीन :** विचारपूर्वक केलेल्या कामात यश मिळण्याची शक्यता राहील. आर्थिक क्षेत्रात हट्टीपणा दाखवू नका.


## दि. चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.

प्रमुख कार्यालय, सिव्हील लाईन्स चंद्रपुर

टेलिफोन क्र. ०७१७२-२५२१८०,२५४२५३

### निविदा सुचना

बँकेच्या शिपाई व ड्रायव्हर करीता कार्यालयीन गणवेश कापड खरेदी करावयाचे असुन पुरवठाराकडुन सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कापडाचा तपशील | आवश्यक्ता | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १. | शर्ट करीता आकाशी किंवा प्लेन कलर रेमंड कंपनी | २५७ मिटर | १०००/- |
| २ | पॅन्ट करीता निळा किंवा प्लेन कलर रेमंड कंपनी | १४३ मिटर | |
| ३ | शर्ट करीता आकाशी किंवा प्लेन कलर नामांकित कंपनी | ४१ मिटर | |
| ४ | पॅन्ट करीता निळा/काळा/प्लेन कलर नामांकित कंपनी | २३ मिटर | |
| ५ | साडी (सिंथेटिक) प्रिंटेड किंवा प्लेन कलर | ३६ साड्या | |
| ६ | ब्लाऊज कापड नामांकित कंपनी | ३६ मिटर | |
| ७ | शिपाई यांचेकरीता बैंकेच्या नावाचे पॉकेट आकाशी कलर | २० मिटर | |

अटी :-

१) निविदासोबत गुमास्ता लायसन्स, पॅन कार्ड, आधार कार्ड, जीएसटी व कापडाचे नमुने जोडावे.

२) निविदेमध्ये ट्रान्सपोर्टींग, इन्स्टालेशन व सर्व करासह बँकेच्या प्र.का.त पुरवठा करण्याचे दर नमुद करावे.

३) कापडाचा पुरवठा झाल्यानंतर बीलामधुन ५% सिक्युरिटी डीपॉझिट कपात करण्यांत येईल व ६ महिण्याचा कालावधी समाप्त झाल्यानंतर तक्रारी नसल्यास बिनाव्याजी रक्कम परत करण्यांत येईल.

४) अनामत रक्कमेचा डीडी चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., चंद्रपुर या नावाने जोडावा किंवा प्रमुख कार्यालयांत नगदीने भरणा करून पावती जोडावी.

५) सिलबंद निविदा वितरीत करण्याची अंतीम दि. १२.१२.२०२४ ते दि. १९.१२.२०२४ पर्यंत (कार्यालयीन वेळेत)

६) सिलबंद निविदा सादर करण्याची दि. २०.१२.२०२४ दुपारी ३.०० वाजेपर्यंत बँकेच्या प्रमुख कार्यालयांत प्राप्त होईल अशा बेताने पाठवावे. उशीरा प्राप्त होण्याऱ्या निविदांचा विचार केल्या जाणार नाही.

६) कापडाचे मागणीमध्ये कमी जास्त बदल करण्याचा तसेच आवश्यक्तेप्रमाणे खरेदीचा अधिकार बँकेला राहील.

७) निविदा अंशतः, पुर्णतः मंजुर अथवा नामंजुरीचा अधिकार बँकेला राहील.

८) कापड २ गणवेश प्रमाणे कापड कटींग करून दयावी लागेल.

चंद्रपुर
दि. ११.१२.२०२४

स्वा/-
मुख्य कार्यकारी अधिकारी

# ३६९ कोटी ७८ लाख देऊनही लोणारच्या विकासकामांना विलंब?

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. ११ :** जिल्हयातील ऐतिहासिक लोणार सरोवरात मागील अनेक वर्षांपासून विकास कामे केली जात आहेत. ही कामे अतिशय मंद गतीने होत असल्याने आयुक्त निधी पांडेय यांनी काम करणा?या संस्थेला व प्रशासनाला चांगलेच खडसावले होते. आता या ठिकाणी घडणा?या प्रत्येक विकास काम व इतर छोटया मोठया घडामोडीवर लक्ष ठेवण्यासाठी प्रशासनाने तिसरा डोळा उघडला असून याची जवाबदारी पोलिस विभागाकडे देण्यात आली आहे.



लोणार विकास आराखड्याअंतर्गत असलेल्या विविध विकासकामांची प्रत्यक्ष स्थळपाहणी व कामांच्या प्रगतीचा आढावा डॉ. पाण्डेय यांनी शनिवारी लोणार येथे घेतला. यावेळी बुलडाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, समितीचे सदस्य तथा न्यायालयीन मित्र अॅड. एस. सान्याल, अॅड. दीपक ठाकरे, ?ड. कप्तान, ?ड. परचुरे, भारतीय पुरातत्व विभागाचे अधीक्षक अरुण मलिक, विशेष कार्य अधिकारी सुशील आग्रेकर, वन विभाग, नगर परिषद, एमएमआरडीएचे अधिकारी, उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त पाण्डेय म्हणाल्या की, बुलडाणा जिल्ह्यातील बेसॉल्ट खडकात उल्कापातामुळे निर्माण झालेले लोणार सरोवर हे जगविख्यात आहे. विभागीय आयुक्त निधी पाण्डेय लोणार येथे विकासकामांची पाहणी करताना. हे स्थळ जैवविविधतेने संपन्न असून, पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. लोणार सरोवराच्या जतन, संवर्धन व विकास तसेच परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाद्वारे ३६९ कोटी ७८ लाख रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. विकास आराखड्यातील नियोजित कामे पूर्णत्वास जाण्यासाठी समितीद्वारे नियमितपणे आढावा घेण्यात येतो. आराखड्याअंतर्गत येणा?या विविध विकासकामांना प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सर्वज्ञे सर्ववरदे सर्वदुष्ट भयंकरी । सर्व दुःख हरे देवी महालक्ष्मी नमोस्तूते? सिद्धीबुद्धीप्रदे देवी भुक्तिमुक्ति प्रदायिनी। मंत्रमूर्ते सदा देवी महालक्ष्मी नमोस्तूते ? सर्व दुष्टांचा नाश करणा?या देवी महालक्ष्मीच्या रूपात मेहकर येथील श्री शारंगधर बालाजींना मंगळवारी महालक्ष्मीच्या रूपात अलंकारित करण्यात आले.

भबुलडाणा जिल्ह्यातील बेसॉल्ट खडकात उल्कापातामुळे निर्माण झालेले लोणार सरोवर हे जगविख्यात आहे. हे स्थळ जैवविविधतेने संपन्न असून पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. लोणार सरोवराच्या जतन, संवर्धन व विकास तसेच परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाद्वारे ३६९ कोटी ७८ लक्ष रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. विकास आराखड्यातील नियोजित कामे पूर्णत्वास जाण्यासाठी समितीद्वारे नियमितपणे आढावा घेण्यात येतो. आराखड्यातील विकासकामे गतीने पूर्ण होण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. -डॉ. निधी पांण्डेय, विभागीय आयुक्त अमरावती

सरोवरातील गोमुख परिसरात लावण्यात आला सीसीटीव्ही लोणार परिसरातील गोमुख या परिसरात नुकतेच कॅमेरा लावण्यात आलेल्या आहे.या ठिकाणी कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये या करता या सीसीटीव्हीची लिंक पोलिस विभागाला देण्याचे आदेश विभागीय आयुक्त पाण्डेय यांनी दिले आहेत.

# मानव केंद्रबिंदू असलेली राज्यघटना चिरकाल टिकेल-डॉ. जयसिंह चव्हाण

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. ११ :** भारताची राज्यघटना तयार झाल्यावर अनेकांनी यावर शंका उपस्थित केली होती. राज्यघटनेची वैशिष्ट्ये असलेली संघराज्य पद्धती देशाला फार काळ एकसंघ टिकवून ठेवू शकणार नाही, इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टल चर्चिल यांनी तर स्वातंत्र्यानंतर भारतात केवळ दहा वर्षात यादवी माजेल व भारत परत पारतंत्र्यात जाईल असे भाकीत केले. मात्र ७७ वर्षापासून आजपावेतो भारताची राज्यघटना टिकून आहे. कारण भारताच्या राज्यघटनेचा केंद्रबिंदू हा मानव आहे, त्यामुळे ती चिरकाल टिकून राहील असे प्रतिपादन डॉ. जयसिंह चव्हाण यांनी महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमात केले. जिजाऊ शिक्षण महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची दूरदृष्टी या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



अध्यक्षस्थानी प्राचार्य सुनील कावळे हे होते. प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा न्यायालयातील ज्येष्ठ वकील ?ड. जयसिंह चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून नैक समन्वयक डॉ. प्रकाश नागदेवते उपस्थित होते. डॉ. चव्हाण यांनी ब्रिटिश काळातील कायदे, राणीचा जाहीरनामा, कौन्सिल एक्ट, गोलमेज परिक्षदा आदी अनेक कायद्यांचा संदर्भ देत भारतीय राज्यघटना तयार कशी झाली. राज्यघटनेची श्वेतपत्रिका म्हणून ओळखला जाणारा १९३५ चा कायदा त्यात बाबासाहेबांची भूमिका सांगितली. बाबासाहेबांच्या दूरदृष्टिमुळे राज्यघटना स्वत इतकी कणखर झाली आहे की सामान्य माणसाला कोणीही अधिकारापासून वंचित करण्याचा प्रयत्न केला तर ती त्याला हाणून पाडते हे त्यांनी सोदाहरण सांगितले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते बीएड प्रथम वर्ष सुभाष गृहच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रिकाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ.नागदेवते व प्राचार्य सुनील कावले यांनीही समयोचित मार्गदर्शन केले.

प्रा.योगेश निमजे व प्रा. नीलेश भगत यांच्या मार्गदर्शनखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रस्तावना भावना व ?हाडे हिने केले. परिचय एकता जयपुरिया हिने करून दिला. संचलन सूरज गेडाम याने केले. तर आभार दीक्षा डोंगरे हिने मानले. कार्यक्रमाला सतीश राणा, डॉ. प्रशांत कीर्दक, डॉ. कपिल परचाके, यशवंत आम्बुलकर, डॉ.खुशवंत राठोड, प्रा. मनीषा मुलकलवार, प्रा. सुरेंद्र राउत, प्रा. विजय देऊलकर, वृषाली काले व विद्यार्थी उपस्थित होते.

# आरोग्य विभागाच्या वतीने क्षयरोग मोहिमेचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. ११:** शासनाच्या सूचनेनुसार जिल्ह्यात शंभर दिवस क्षयरोग शोध मोहीम राबवण्यात येत आहे. ही मोहिम ७ डिसेंबर ते २४ मार्च म्हणजे पर्यंत क्षयरोग दिनापर्यंत चालणार आहे. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील जिल्हा स्त्री रुग्णालय येथे मोहिमेचे उद्घाटन झाले.




जिल्हाधिकारी, डॉ.पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शोध मोहिमेच्या उद्घाटनाला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.प्रल्हाद चव्हाण, डॉ.सुखदेव राठोड, डॉ.आशिया, डॉ. तनवीर शेख, डॉ. रवींद्र राठोड, आयएमएचे सचिव डॉ. शरद राखुंडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सागर जाधव, जिल्हा क्षयरोग केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन खरोडे उपस्थित होते. या मोहिमेतून क्षयरुग्ण शोधून त्यांना उपचारावर आणणे, क्षयरुग्णाचा मृत्युदर कमी करणे, नवीन क्षयरुग्णांचे प्रमाण कमी करणे, वंचित, अति जोखमीच्या घटकापर्यंत पोहोचून आरोग्य सेवा पुरविणे, क्षयरोग, क्षयरोगाविषयी जनजागृती करुन कलंक कमी करण्याचा उद्देश आहे. जिल्हा क्षयरोग विभागाच्या माध्यमातून ही शोधमोहिम राबवणार आहे. पुढील शंभर दिवस शहरी ग्रामीण भागातील कारखाने, वृध्दाश्रम, अनाथाश्रम, निवासी शाळा, कारागृहात तपासणी शिबिर घेणार आहे. ६० वर्षावरील नागरीक, मधुमेहग्रस्त, कर्करोगग्रस्त, पिएलएचआयव्ही, मागील दोन वर्षात निदानित क्षयरुग्ण, स्थालांतरीत, उसतोड कामगार, उच्च जोखीमग्रस्त भाग, वंचित घटक आदी ठिकाणी आरोग्य कर्मचा?यांच्या माध्यमातून सर्वेक्षण केले जाणार आहे.

# काँग्रेस हरली तरी थांबणारी नाही-मानकर

**इव्हीएम विरोधात पक्षातर्फे जनआंदोलन उभारणार**

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. ११:** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये राज्यात आणि जिल्ह्यातही काँग्रेसला पराजयाचा सामना करावा लागला आहे. या ठिकाणी काँग्रेस हरली असली तरी काँग्रेस थांबली नाही. यानंतर पुढे काय करायला हवे याचे नियोजन सुरू झाले आहे. त्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटीची बैठकही आज पार पडली आहे. इव्हीएममध्ये घोळ असल्याची बाब पुढे येत असल्याने इव्हीएमविरोधात लवकरच जनआंदोलन सुरू करु असे प्रतिपादन जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रफ्फुल्ल मानकर यांनी केले.



शहरातील आर्णी मार्गावर असलेल्या सहकार भवन येथे मंगळवारी दि. १० डिसेंबर रोजी पार पडलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे जिल्ह्यातील एकमेव आमदार बाळासाहेब मांगुळकर, ज्येष्ठ नेते माणिकराव ठाकरे, शिवाजीराव मोघे, वसंतराव पुरके, वामनराव कासावार यांच्यासह जिल्हा बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील, जावेद अन्सारी, संतोष बोरले, अनील गायकवाड उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रफ्फुल्ल मानकर म्हणाले की, यानंतरच्या सर्व निवडणुकी या बॅलेट पेपरवर व्हाव्या यासाठी राज्यभर स्वाक्षरी मोहिम राबवण्यात येणार आहे. इतकेच नव्हे तर काँग्रेसच्या ज्या ग्रामपंचायती आहेत त्यामध्ये इव्हीएम विरोधात ठराव घेण्याचे नियोजनही केले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी काँग्रेसचे नेते माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम घोटाळा झाला . त्यामुळे इव्हीएमविरोधात जनआंदोलन उभारण्यात येणार आहे. आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने संघटन मजबुतीच्या दृष्टीने प्रयत्न केले जाणारआहे. विधानसभा निवडणुकीत बोगस मतदारांचा समावेश मोठ्या प्रमाणात झाला आहे. बाहेर जिल्ह्यातील मतदारांची नावे यादीत समाविष्ट केली होती.

हे कृत्य भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवकांनी केल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. बहुतांश उमेदवार ईव्हीएममधील गडबड घोटाळ्यामुळेच आल्याचेही ते म्हणाले. विधानसभा निवडणुकीत काही गावात अपेक्षेपेक्षा खूप कमी मते मिळाली. त्या गावातील नागरिकांनीसुद्धा यावर संशय व्यक्त केला आहे.

आता आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी चालू करण्यात आली आहे. य

ावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सूचना मांडल्या असून, त्यात सूचनांनुसार सुधारणा केली जाणार आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे पक्ष संघटनांवर अधिक भर दिल्या जाणार आहे. निवडणुकीच्या काळात पोलिंग बूथ, गावाची जबाबदारी सांभाळणा ऱ्यांचा सन्मानसुद्धा केल्या जाणार आहे. काँग्रेसला मजबूती आणण्यावर भर दिल्या जाणार असल्याचेही ते म्हणाले.

# वर्षभरात घटल्या खून, दरोड्याच्च्या गंभीर घटना

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. ११:** शहरासह जिल्ह्यात वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिबंधात्मक कारवाया पोलिस प्रशासनाकडून करण्यात आल्या. यामध्ये मोक्का, एमपीडीए, मपोका, यासह इतरही कारवाया समावेश असून यावर्षी २० हजार ५४३ कारवाया करून गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. तर चालु वर्षात खून, दरोडा, जबरी चोरीच्या घटना घटल्याचे पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी मंगळवारी दि. १० डिसेंबरला आयोजीत पत्रकार परिषदेत दिली.



जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने पोलिस विभागाने ?क्शन मोडवर आले होते. दरम्यान गंभीर गुन्ह्यात सहभागी आरोपींच्या मुसक्या आवळत त्यांच्यावर एमपीडए सारख्या कारवाया सुद्धा करण्यात आल्या. चालू वर्षांत ९६ गुन्हेगारांना महाराष्ट्र पोलिस कायद्यान्वये कारवाई केली. यावर्षी २१ कारवाया वाढवण्यात आल्या आहेत. एमपीडीएच्या २४ कारवाया करण्यात आल्या असून, एका व्यक्तीवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. गतवर्षी ७२ खुनाचे गुन्हे दाखल झाले होते. यावर्षी ५६ गुन्ह्याची नोंद आहे. यातील ५४ गुन्हे उघडकीस आले. १२ दरोड्याच्या घटना घडल्या असून ११ गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली आहे. गेल्या वर्षी जिल्ह्यात घरफोडीच्या २०३ घटना घडल्या होत्या. तर यावर्षी १४९ घटना घडल्या. ६३ घरफोडीचा पोलिसांनी छडासुद्धा लावला आहे. तर वेगवेगळ्या चोरीच्या गतवर्षी एक हजार १४२ घटना घडल्या होत्या. तर यावर्षी ९४८ घटना घडल्या असून, ४४३ घटना उघडकीस आल्या आहेत. विधानसभा निवडणुका शांततेत पार पडल्या असून, या कालावधीत कुठलीही अनुचित घटना जिल्ह्यात घडली नसल्याची माहिती कुमार चिंता यांनी दिली.

कर्मचारी हल्लयाच्या घटनांना लागला ब्रेक गेल्या वर्षी वेगवेगळ्या कारणाने जिल्ह्यात ११५ दंगल झाल्या होत्या. तर चालू वर्षात आतापर्यंत ९७ दंगा घडला आहे. कर्मचारी हल्लयाच्या घटनांनाही ब्रेक लागला असून, यंदा ३० हल्लयाच्या घटनांचा समावेश आहे. विनयभंगाच्या ३५७ घटनांचा समावेश आहे. मागील वर्षी कौटुंबिक वादाच्या ३१२ घटना घडल्या होत्या. यावर्षी ३६ घटना कमी असून, आतापर्यंत २७६ प्रकरणात गुन्हे नोंद करण्यात केले आहे.

# एफडीआरडी धारकांनी दुसऱ्या दिवशीही घातला गोंधळ



**१४ कोटी रुपयाने ठेवीदारांची फसवणूक**

■ महासागर प्रतिनिधी,

**पुसद , दि. ११:** येथील जन संघर्ष अर्बन निधीच्या शाखेमध्ये एफडी आरडी धारकांनी मंगळवारी दि. १० डिसेंबरला दुस?या दिवशी देखील गोंधळ केला आहे. ठेवी परत मागण्यासाठी गेलेल्या ठेवीदारांनी खुर्च्या फेकल्या होत्या. सोबतच लावलेला एसी देखील काढून घेऊन जाण्याच्या मनःस्थितीत होते.

शेवटी शाखा व्यवस्थापकाने शहर पोलिस ठाण्याला संपर्क साधून पोलिसाला बोलावून घेतल्याने काही वेळेसाठी गोंधळ थांबला नुकसान झालेल्या ठेवीदारांचा गोंधळ थांबता थांबेना शाखा व्यवस्थापक वाळले यांनी संस्थेच्या अध्यक्ष विरोधात तक्रार दिली आहे. संस्थेच्या अध्यक्ष मार्फतच ठेवीची रक्कम मिळत नसल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

यावेळी ठाणेदाराने ठेवीदाराची समजूत काढली आहे. सध्या पुसद येथील शाखेत ठेवीदारांचा गोंधळ थांबता थांबेना हे विशेष.

# 'एपीके' फाइल उघडल्याने दोघांचे अकाउंट झाले हॅक

■ महासागर प्रतिनिधी,

**पुसद , दि. ११:** मोबाईलवर भारतीय स्टेट बँकेची एपीके फाईल आली. त्यात रिवार्ड असल्याचे सांगण्यात आले. ती फाईल दोघांनी उघडली असता दोघांचेही मोबाईल, बँक खात्यासह ईमेल आयडी हॅक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. दोघांनीही वसंत नगर पोलिस ठाण्यात चौकशी करून कारवाई करण्यासाठी तक्रार दिली आहे. दोघांच्याही बँक खात्यामध्ये रक्कम नसल्यामुळे मोठी आर्थिक हानी टळली आहे.




राजकुमार साहेबराव ठाकरे रा. भोजला यांनी दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी तक्रार दिली आहे. तर गजानन सुदाम ढोले यांनी दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी तक्रार दिली आहे. प्राप्त माहितीनुसार दोघांनाही एका व्हाट्सअप ग्रुपला अनोळखी नंबर वरून एसबीआय रिवार्ड नावाचा मेसेज आला. त्यानंतर दोघांनीही लिंक उघडली असता मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी टाकले असता दोन्ही हॅक झाले. हॅक झाल्यामुळे त्यांचे मोबाईल नंबर ज्या व्हॉट्सअप ग्रुपला लिंक होते ते सर्व व्हॉट्सअप ग्रुपवर व वैयक्तिक व्हॉट्सअप अकाउंटवर मेसेज गेला. दोघांनाही आलेल्या लिंक मुळे नंबर हॅक झाल्याचे निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली आहे. त्या तक्रारीमध्ये चौकशी करून कारवाई करण्याची मागणी त्यांच्यामार्फत केली आहे. यात विशेष बाब म्हणजे दोघांच्याही बँकेच्या खात्यामध्ये रक्कम नसल्यामुळे मोठी आर्थिक हानी टळली आहे. याच लिंकमुळे एक पोलिस देखील अडकला असून त्यांच्या अकाउंटमधून पाच लाख रुपये रक्कम गायब केल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

हे आवर्जून करावे : अनेक प्रकरणांत स्कॅमर्स स्वत:ला बँक अधिकारी म्हणून सांगतात आणि माहिती काढतात. त्यानंतर बँक अकाउंट बंद होणं किंवा त्यात बदल करण्याच्या कारणाने बँक डिटेल्स मागतात आणि युजरच्या अकाउंटमधून पैशांची चोरी करतात. अशा फोन-कॉलवेळी फ्रॉड करणारे युजर्सला सर्वात आधी त्यांचं नाव आणि आडनाव विचारतात. त्यामुळे त्यांचं काम अधिक सोपं होत. तुम्हालाही कधी असा कॉल आल्यास, फोनवरच बँकिग डिटेल्सची माहिती विचारली गेल्यास, फोनवर कोणतंही उत्तर न देता लगेच बँकेत रिपोर्ट करा.

लिंकवर क्लिक करू नका यवतमाळ जिल्हा पोलिस अधीक्षकाकडून व्हॉट्सअप वर येणा?या विविध लिंकवर क्लिक करू नका असे वारंवार सांगण्यात येत आहे. सायबर पोलिसांनी सावध केल्यानंतर ही अनेकांची फसवणूक होत असल्याचे दिसून येत आहे.केवळ अज्ञान व स्वार्थामुळे अशा प्रकारचे गुन्हे घडत आहेत असेच म्हणण्याची वेळ आली आहे. त्यामुळे व्हाट्सअप वर येणा?या अशा कुठल्याही फसव्या लिंकला बळी पडू नये असे पोलिस खात्याकडून वारंवार सांगण्यात येत आहे.

# निवडणुकींच्या प्रशासकीय खर्चाचा हिशेब जुळवणे सुरु

**२० कोटीचा अंदाज**

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ११:** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या प्रशासकीय खर्चाचा हिशेब जुळविण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. त्यासाठी जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदार संघांच्या निवडणूक अधिका?यांना (आरओ) पत्रं पाठविण्यात आली असून खर्चाची आकडेवारी मागविण्यात आली आहे. एका अंदाजानुसार या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाला सुमारे २० कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्च करावी लागली. गेल्या २० नोव्हेंबरला विधानसभेच्या निवडणुकीसाठीचे मतदान पार पडले. त्यानंतर २३ तारखेला निकालाअंती आठही आमदारांच्या विजयाची घोषणा करण्यात आली. या निवडणुकीसाठी जिल्हाभरात सुमारे १५ हजाराहून अधिक अधिकारी, कर्मचारी काम करीत होते. यामध्ये निवडणूक अधिका?यांपासून ते मतदान केंद्राध्यक्ष, मतदान आणि मतमोजणी अधिकारी तसेच कर्मचारी, पोलिस आणि इतर कर्मचा?यांचा समावेश आहे. या सर्वांचे वेतन आणि भत्ते, निवडणूक काळातील त्यांच्या प्रशिक्षणावर झालेला खर्च, जेवणावळींचा खर्च, वाहनांचे भाडे, मतमोजणी केंद्रासाठी वापरलेल्या इमारतींचे भाडे, निवडणुकीसाठीच्या वेगवेगळ्या कागदपत्रांची छपाई, व्हीडीओ व फोटोग्राफी, स्वीप उपक्रमासाठी तयार करण्यात आलेली पथनाट्ये, मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी तयार करण्यात आलेले बॅनर, पोस्टर तसेच फिरत्या वाहनांवरील डिजीटल फ्लेक्स असा सर्व बाबींचा यामध्ये समावेश आहे.



सूत्रांच्या मते निवडणुकीचा प्रशासकीय खर्च म्हणजे निवडणुकीची घोषणा होण्याआधीपासून तयार केली जाणारी मतदार यादी ते मतमोजणीपर्यंत पूर्ण कराव्या लागणा?या विविध टप्प्यांवर झालेला एकूण खर्च असतो. हा खर्च प्रत्येक विधानसभा मतदारसंघाचा वेगवेगळा असतो. तेथील निवडणूक अधिका?यांच्या मार्गदर्शनात तो केला जातो. त्यामुळे त्या-त्या निवडणूक अधिका?यांकडून तो मागविण्यात आला आहे. साधारणत: ४५ दिवसांच्या आंत ही संपूर्ण मोजदाद केली जाते. त्यानंतर तो निवडणूक आयोगाकडे पाठवून तेवढ्या रकमेची मागणी केली जाते.

**सारे काही उधारीतच**

निवडणुकीचा बहुतेक खर्च हा उधारितच केला जातो. वेगवेगळ्या कामांचे कंत्राट घेणा?यांनाही त्याची माहिती असते. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया आटोपल्यानंतर बील तयार करुन ते निवडणूक अधिका?यांकडे पाठविणे आणि त्यांच्यामार्फतच पुढे जाऊन रक्कम मागवणे, हीच नेहमीची पद्धत आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# हिवाळ्यात हृदयविकाराला निमंत्रण

**हि**वाळा ऋतू तसा आल्हाददायक आहे; पण हवामानात बदल झाला की, अनेक आजार डोके वर काढू लागतात. सध्या अशा वातावरणातील प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अनेक आजारांना आमंत्रण मिळते. आता हृदयविकाराच्या रुग्णांना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. कारण हिवाळ्यामध्ये हृदयविकाराच्या घटनांमध्ये सर्वाधिक वाढ होताना दिसते. या दिवसांमध्ये हवामानातील तापमान घटते. कमी तापमानामुळे हृदयाला शरीराची मज्जासंस्था सक्रिय होते. ज्यामुळे रक्तवाहिन्या अरुंद होतात ज्याला 'व्हॅसोकॉन्स्ट्रक्शन' म्हणतात. रक्तदाब अचानक वाढतो आणि शरीरात असलेल्या इतर अवयवांना रक्त पंप करण्यासाठी हृदयाला अधिक मेहनत करावी लागते आणि हृदयविकाराचा झटका येतो. हवामानासाठी अनुकूल कपडे परिधान करा. असे केल्याने उबदार राहण्यास आणि हिवाळ्यात हृदय सुरक्षित ठेवण्यास मदत होईल. टोपी, हातमोजे आणि स्वेटर घाला. रोजच्या शारीरिक हालचालींमुळे



रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्या आकुंचन पावतात. यामुळे रक्त हळूहळू हृदयापर्यंत पोहोचते. रक्तपुरवठा मंदावतो, तेव्हा रक्तवाहिन्यांमध्ये गुठळ्या तयार होतात. अशा स्थितीत रक्तपुरवठा खंडित होऊन हार्ट अटॅक येतो. थंड वातावरणामुळे शरीरातील उष्णता टिकवून ठेवणे कठीण होते. अशा परिस्थितीमध्ये हायपोथर्मिया होऊ शकतो. ज्यामुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यांचे नुकसान होऊ शकते. परिणामी हृदयविकाराच्या झटका येण्याची संभावना असते. बाहेरचे तापमान थंड असेल तर प्रतिकारशक्ती वाढते. शरीरातील उष्णता नियंत्रित करण्यास आणि तंदुरुस्त राहण्यास मदत करते. डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच व्यायाम करा. रक्तदाब आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवल्याने हृदयविकाराचा धोका कमी होऊ शकतो. ताजी फळे, भाज्या, कडधान्ये, शेंगा, संपूर्ण धान्य, बेरी, शेंगा, फ्लॅक्ससीड्स, पालक, गाजर आणि ब्रोकोली खा. गरम सूप प्या. जंक, मसालेदार, तेलकट आणि हवाबंद डब्यातील अन्नपदार्थ टाळा.

काळजी घ्या

# यकृताच्या कर्करोगाचा धोका अधिक



**य**कृत हा आपल्या शरीराचा महत्त्वाचा भाग आहे. यकृतामध्ये कोणत्याही प्रकारची समस्या असल्यास संपूर्ण शरीरात समस्या निर्माण होतात. यकृताशी संबंधित अनेक आजार आहेत; पण यकृताचा कर्करोग हा सर्वात गंभीर आणि जीवघेणा आजार आहे. यकृताचा कर्करोग म्हणजे यकृतातील पेशींची अनियंत्रित वाढ. एवढेच नाही तर यकृतामध्ये कर्करोग झाल्यास तो शरीराच्या इतर भागातही पसरतो. यकृताचा कर्करोग यकृताच्या पेशींमध्ये सुरू होतो. यकृत हा एक फुटबॉलच्या आकाराचा अवयव आहे, जो पोटाच्या वरच्या उजव्या भागात असतो. यकृतामध्ये अनेक प्रकारचे कर्करोग होऊ शकतात. यकृताच्या कर्करोगाचा सर्वात सामान्य प्रकार म्हणजे 'हेपॅटोसेल्युलर कार्सिनोमा.' यकृत पेशींच्या मुख्य प्रकारात (हेपॅटोसाइट) सुरू होते. इतर प्रकारचे यकृत कर्करोग, जसे की इंट्राहेपॅटिक कोलांजिओकार्सिनोमा आणि हेपॅटोब्लास्टोमा, खूपच कमी सामान्य आहेत. यकृताच्या पेशींमध्ये सुरू होणाऱ्या कर्करोगापेक्षा यकृतामध्ये पसरणारा कर्करोग अधिक सामान्य आहे. यकृताचा कर्करोग शरीराच्या इतर कोणत्याही अवयवामध्येदेखील होऊ शकतो, जसे की कोलन, फुफ्फुस किंवा स्तन आणि नंतर यकृतामध्ये पसरतो. त्याला यकृताच्या कर्करोगाऐवजी मेटास्टॅटिक कर्करोग म्हणतात. या प्रकारच्या कर्करोगाचे नाव ज्या अवयवातून सुरू झाले त्या अवयवावरून देण्यात आले आहे. मेटास्टॅटिक कोलन कर्करोग, जो कोलनमध्ये सुरू होतो आणि यकृतामध्ये पसरतो. बहुतेक लोक प्राथमिक यकृत कर्करोगाच्या सुरुवातीच्या टप्प्यात लक्षणे दर्शवत नाहीत. प्रयत्न न करता वजन कमी होणे, भूक न लागणे, वेदना मळमळ आणि उलट्या, सामान्य अशक्तपणा आणि थकवा पोटात सूज येणे, त्वचा आणि डोळ्यांचे पांढरे पिवळे पडणे ही त्याची लक्षणे आहेत.

आरोग्य चर्चा

# आरोग्यदायी पंचकर्म

**आ**युर्वेद उपचारांचा महत्त्वाचा भाग म्हणून पंचकर्मांकडे पाहिलं जातं. खरं पाहता आयुर्वेदाचा प्रथम भर निरोगी असण्यावर आहे. पण तुमच्या प्रकृतीत बिघाड असेल तर तो बरा करण्यासाठी पंचकर्माची मदत घेतली जाते. तुमच्या आसपासचे वातावरण तुमच्यावर प्रभाव टाकत असतं. वातावरणाचा नकारात्मक प्रभाव टाळण्यासाठी पंचकर्म घेणं आवश्यक आहे. पंचकर्म उपचार पद्धती प्रतिबंध उपचार पद्धती किंवा आरोग्यास प्रोत्साहन देणारी उपचार पद्धती म्हणूनही केली जाते. शरीरातील दोषांवर उपचार करून बाहेर टाकले जातात. त्यानंतर शरीर आरोग्यपूर्ण रहावं यासाठीचे प्रयत्न पंचकर्मामध्ये केले जातात. पाच कर्मांच्या सहायाने केली जाणारी कृती म्हणजे पंचकर्म होय. जुनाट विकारांवर पंचकर्म उपचार लाभदायी ठरतात. पाच उपचार पद्धतींचा मेळ पंचकर्मात घातला जातो. वमन, विरेचन, बस्ती, नस्य, रक्त मोक्षन अशा पाच क्रिया पंचकर्मात समाविष्ट असतात. जाणून घेऊ त्या विषयी...



* वमन – यामध्ये वांती म्हणजेच उलटीच्या सहायाने शरीरातील रोग बाहेर टाकला जातो. शरीरातील कफ दोष वाढला असता, वमन उपचार पद्धती अवलंबली जाते. यामध्ये औषधांच्या सहायाने नियंत्रित उलट्या(ओकाऱ्या) निर्माण केल्या जातात. रुग्णाला उलट्या व्हाव्यात यासाठी औषधं दिली जातात. उलट्यांद्वारे शरीरातील अतीरिक्त कफ दोष किंवा पित्त दोष निवारण्यासाठी मदत केली जाते. वमन हे लहान मुलं आणि गरोदर स्त्रियांना देऊ नये.

* विरेचन – या प्रक्रियेमध्ये रेचकाचा वापर करून दोष शौचावटे शरीराच्या बाहेर टाकण्यास मदत केली जाते. काविळ, जंत, कृमी यामध्ये ही पद्धत वापरली जाते. विरेचन डॉक्टरांच्या देखरेखीखाली द्यावं.


* बस्ती – यात वापरली जाणारी औषधे काढा, शुद्ध तेलं, दुध अशा प्रकारची असू शकतात. मणक्याची जुनी दुखणी, संधिवात, पाठदुखी अशा विकारांमध्ये बस्ती या पंचकर्म पद्धतीचा वापर केला जातो. लहान मुलं आणि गरोदर स्त्रियांना बस्ती देऊ नये. हे उपचार तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली घ्यावेत.

* नस्य – या प्रकारामध्ये नाकावाटे औषधं दिली जातात. औषधी चूर्ण, काढा किंवा तेलाचे थेंब हे नाकपुडीतून दिले जातात. त्यामुळे डोकं व मानेच्या वरच्या भागात असाणारे दोष दूर केले जातात. मायग्रेन, अपस्मार, सायनस अशा विकारांमध्ये नस्य प्रभावी उपचार पद्धती आहे.

* रक्त मोक्षता – या पद्धतीचे दोन मुख्य प्रकार आहेत. शीर कापून किंवा जळू लावून. त्वचेचे आजार, रक्त दोष, हत्ती रोग यामध्ये रक्त मोक्षता पद्धतीचा वापर करून उपचार केले जातात.

प्रासंगिक

# नखांवरून ओळखा विकार



*शरीर अंतर्गत घडामोडींबाबत अनेकदा आपल्याला संदेश देत असतं. पण आपल्याकडून त्याकडे दुर्लक्ष केलं जातं. त्याचे परिणाम बाह्य अवयवांवर दिसून येतात. या बदलांचा परिणाम नखांवर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे नखांचा रंग बदलतो किंवा ती लवकर तुटू लागतात. बरेचदा बोटांना सूजही येते. नखांवरील परिणामांवरून व्याधीची कल्पना येऊ शकते. त्या विषयी जाणून घेऊ...*

**बो**टांच्या त्वचेवरील संरक्षक आवरण म्हणजे नखं. नखं वेळच्यावेळी कापणं हे आरोग्याच्या दृष्टीने चांगलं असतं असं नेहमी म्हटलं जातं. पण या नखांच्या ठेवणीवरून व्यक्तीच्या आरोग्याविषयी अनुमानही लावता येतं. नखांलगतचा भाग निळा पडणं हे रक्ताभिसरण नीट होत नसल्याचं लक्षण असू शकतं. ही स्थिती फार धोकादायक नसली तरी हातापायांची बोटं लाल, निळी किंवा पांढरी दिसू लागतात. यासोबत वेदना, बधीरता, मुंग्या येण्यासारख्या समस्या उद्‌भवतात. या लक्षणांसोबत ताप आल्यास न्यूमोनिया असण्याची शक्यता असते. * तळहातांना घाम येणं हे ताणाचं लक्षण असू शकतं. तसंच जास्त कार्यरत असणाऱ्या थायरॉइडमुळेही ही समस्या निर्माण होते. अशा थायरॉइडमुळे चयापचय क्रिया वाढते. यामुळे आपण जास्त कॅलरी खर्च करतो आणि तळव्यांना घाम येतो. ही सततची समस्या असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेणं योग्य ठरतं. * नखांवर असलेल्या उभ्या रेषा म्हणजे कॅन्सरसारख्या दुर्धर आजारपणातून नुकतंच उठल्याचं लक्षण असू शकतं. खूप आजारी असल्यावर नखांची वाढ होत नाही आणि ही समस्या निर्माण होते. * निरोगी व्यक्तीच्या नखांचा रंग सर्वसाधारणपणे पांढरट गुलाबी असतो. नखं दाबली तर पांढरी दिसू लागतात आणि दाब सोडल्यावर ती पुन्हा गुलाबी होतात. पण बराच काळपर्यंत नखं पांढरीच राहिली तर शरीरात लोहाची कमतरता असल्याचं समजावं. * कॅफिनचं अतिरिक्त प्रमाण, ताण-तणाव, अस्थमा आणि नैराश्यावरची औषधं यामुळे हात थरथरू लागतात. हे थरथरणं तात्पुरत्या स्वरूपाचं असतं. पण हाच प्रकार वारंवार होत असेल तर मेंदूशी संबंधित विकार असण्याची शक्यता असते. हे पार्किंसन्स या विकाराचं लक्षणही असू शकतं. * तुमची बोटं सुजली असतील तर आहारात मीठाचं प्रमाण जास्त आहे हे लक्षात घ्यावं. यासोबत थायरॉइड सारख्या समस्येमुळेही बोटं सुजू शकतात. तसंच तुम्हाला डिहायड्रेशनची समस्याही असू शकते.

हेल्दी लाईफ

# पार्किन्सन्सविषयी...

**शा**रीरिक हालचालींना प्रभावित करणारा विकार म्हणजे पार्किन्सन्स. मेंदूच्या पेशींमुळे डोपामिन या रसायनाची कमतरता निर्माण झाली तर व्यक्ती पार्किन्सन्स या विकाराला बळी पडते. या विकाराची नोंद जेम्स पार्किन्सन्स या शास्त्रज्ञाने पहिल्यांदा केली. म्हणून या विकाराला पार्किन्सन्स याचं नाव देण्यात आलं. अवयवांना असणारा कंप, ताठरलेले स्नायू, मंदावलेल्या हालचाली, सतत तोल जाणं ही या आजारपणाची लक्षणं आहेत. याखेरीज लाळ सुटणं, स्नायुदुखी, आवाज बारीक होणं ही लक्षणंही दिसून येतात. या विकारामध्ये रुग्णाची प्रतिकारशक्ती कमी होत असल्याने इतर रोगाचा संसर्ग होण्याची शक्यता मोठ्याप्रमाणावर असते. असम असलं तरी हा आजार अनुवांशिक असतो, याबद्दल कोणताही ठोस पुरावा नाही. पार्किन्सन्सच्या सर्वच टप्प्यांमध्ये व्यक्तीला अपंगत्व येतंच असं नाही. या विकाराच्या पहिल्या टप्प्यामध्ये व्यक्ती संपूर्णपणे कुणावरही अवलंबून नसते. पण पार्किन्सन्समुळे होणारे त्रास आपलं स्वरूप प्रकट करू लागले असतात. अनेकदा वैयक्तिक कामं स्वत: केली जातात. पण बाहेरच्या कामांसाठी कुणाची तरी सोबत हवीशी वाटते. एकटं जाण्याचा आत्मविश्वास नाहीसा होत जातो. अनेकदा रुग्ण पूर्णतया कोणावर तरी अवलंबून राहू लागतो. अंथरुणाबाहेर हालचाल करणं नकोसं वाटू लागतं. या विकारावर मात करण्यासाठी तीव्र इच्छाशक्तीची आणि नातेवाईकांच्या पाठबळाची गरज असते.



व्याधीविचार

# सकाळचा नाश्ता टाळला जातोय?

*सकाळी योग्य प्रमाणात नाश्ता करणाऱ्या व्यक्तींचं आरोग्य चांगलं राहतं असं एका संशोधनांमधून सिद्ध झालं आहे. सकाळचा नाश्ता करताना आहारात आरोग्यदायी पदार्थांचा समावेश असावा. दोन जेवणांच्या दरम्यान आठ ते दहा तासांचं अंतर असणं आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक असतं. याविषयी अधिक जाणून घेऊ...*

**आ**जकालची तरूणाई सतत घाईत असते. त्यामुळे योग्य आणि समतोल आहार त्यांच्या पोटात जातोच असं नाही. त्यातही सकाळचा नाश्ता अनेकदा त्यांच्याकडून केला जात नाही. मात्र, सकाळच्या वेळी उपाशी राहिल्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. जाणून घेऊ त्याविषयी...

* सकाळचा नाश्ता सतत टाळत राहणाऱ्या युवांना टाईप टू डायबेटिसचा त्रास होण्याची शक्यता असते.

* खेळ किंवा इतर शारीरिक उपक्रमांमध्ये भाग घेणाऱ्या युवकांनी सकाळचा नाश्ता टाळणं हानीकारक ठरू शकतं.

* सकाळच्या नाश्त्यामुळे शरीरात ग्लुकोज साठवलं जातं. त्यामुळे स्मरणशक्ती उत्तम राहण्यास मदत होते.

* नियमित नाश्ता न करणाऱ्या युवांमध्ये



ब्लड प्रेशर लो व्हायची शक्यता असते. यामुळे चक्कर येणं, छातीत धडधडणं असे त्रास होऊ शकतात.

* नाश्ता टाळणाऱ्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. परिणामी आजारांचा संसर्ग कमी वेळात होतो.

* सकाळच्या नाश्त्यामध्ये हाय फायबर आणि लो कार्बोहायड्रेड असलेल्या पदार्थांचं सेवन केल्यास दिवसभर ॲक्टीव्ह राहण्यास मदत होते.

रहा फिट

# आहारात जायफळ हवंच!

*मसाल्यांच्या पदार्थांमध्ये जायफळाचं विशेष स्थान आहे. पदार्थांना चव आणि रंग देण्याचं काम जायफळ करतं. मिष्ठान्नांमध्ये जायफळाचा वापर आवर्जुन केला जातो. पण या व्यतिरिक्त जायफळ अनेक गुणांनी समृद्ध आहे. जायफळ आपल्याठायी उच्च पोषणमूल्यं बाळगून असतं. अशा जायफळाच्या औषधी गुणधर्मांबद्दल जाणून घेऊ.*

**जा**यफळाच्या वापरामुळे पदार्थात चव आणि सुगंध असे दोन्ही हेतू साध्य होतात. जायफळाच्या झाडापासून दोन मसाले मिळतात. जायफळ आणि जायपत्री. पदार्थाची चव वाढवण्यासाठी जायफळाचा वापर तर पदार्थाला केशरासारखा रंग यावा यासाठी जायपत्री वापरली जाते.




* ग्रीक आणि रोमन संस्कृतीत जायफळाचा वापर आरोग्यविषयक समस्या सोडवण्यासाठी आणि शारीरिक स्वाथ्य राखण्यासाठी केला जात असे. * थंडीत छातीत कफ जमा होतो. जायफळामुळे ही समस्या दूर होते. यामुळे हृदय आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित संस्था उत्तेजित होऊन योग्य पद्धतीने कार्यरत राहते. शरीरातून विषारी घटक काढून टाकण्याच्या प्रक्रियेत जायफळाची भूमिका महत्त्वाची मानली जाते. जायफळ हे मेंदूचं खाद्य मानलं जातं. * गरोदर महिलांनी ओटीपोटालगत जायफळ तेलाने मालिश केल्यास बाळाला जन्म देण्याची प्रक्रिया अत्यंत सुलभतेने पार पडते. * जायफळाची पूड पाणी किंवा मधात मिसळून चेहऱ्याला लावल्यास त्वचा तजेलदार बनते. जायफळात जंतूनाशक गुणधर्म असल्याने त्वचेचं आरोग्य सुधारण्यास मदत होते. मुरमं, पुटकुळ्या, डाग यावर जायफळाची पूड गुणकारी ठरते. * बॅक्टेरियाविरोधी गुणधर्मामुळे जायफळाच्या तेलाचा वापर अनेक टूथपेस्टमध्ये केला जातो. ॲंटिसेप्टीक असल्यानं दातदुखी तसंच हिरड्यांशी संबंधित तक्रारींवर हे लाभदायक ठरतं. * ओटीपोटातील वेदनांवर जायफळ गुणकारी ठरतं. मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या वेदनांवर उपचार म्हणून याचा वापर केला जातो. सांधेदुखी, स्नायू दुखण्यावर याचं तेल प्रभावी ठरतं. * पचनसंस्थेशी संबंधित विकारांवर जायफळ गुणकारी ठरतं. जायफळामुळे किडनी आणि यकृतातील विषारी घटक बाहेर टाकले जातात आणि त्यांचं कार्य सुधारतं.

आरोग्यदायी

# इतर कारणांमुळेही छातीत वेदना

**छा**तीत दुखणे हे हृदयाशी संबंधित आजारांचे कारण असू शकते; परंतु काही वेळा इतर आजारांमुळेदेखील छातीत दुखू शकते. छातीत दुखत असेल तर सर्व प्रथम ईसीजी चाचणी केली जाते. त्यामुळे निदान करता येते; पण छातीत दुखत असेल, तर हृदयविकाराचा झटका येणारच असे अजिबात नाही. दीर्घकाळ छातीत दुखत असेल त्यांना इतर काही आजार असू शकतात. छातीत बराच काळ दुखत असेल आणि 'ईसीजी' चाचणी देखील नॉर्मल आली असेल, तर समजून घ्या, की हे गंभीर दुखणे नाही.

छातीत दुखणे हे केवळ हृदयाशी संबंधित गंभीर आजारामुळेच होत नाही, तर ते 'कॉस्टोकॉन्ड्रिटिस' रोगामुळेदेखील होऊ शकते. 'कॉस्टोकॉन्ड्रिटिस' हा छातीच्या हाडांशी संबंधित एक गंभीर आजार आहे. यामध्ये



हाडांमध्ये वेदना होऊ लागतात. ज्यामध्ये बरगड्या आणि स्तनाचे हाड एकमेकांशी जोडलेले असतात. 'कॉस्टोकॉन्ड्रिटिस' हा एक गंभीर आजार आहे आणि त्यामुळे होणारी वेदनादेखील खूप तीव्र असू शकते. न्यूमोनिया झाल्यास छातीत दुखण्याची समस्या असते. न्यूमोनियामुळे फुफ्फुसात हवेचा पुरवठा जास्त होतो आणि खोकल्याबरोबर छातीत दुखते. मुलांमध्ये न्यूमोनियाची सर्वाधिक प्रकरणे आढळतात.

'कोस्टोकॉन्ड्रिटिस' नावाच्या आजारात बरगडीची हाडे फुगतात आणि तीव्र वेदना होतात. अशा स्थितीत या दुखण्याला हृदयविकाराचा झटका किंवा गॅस असे समजू नये. छातीत दुखणे हे एनजाइनाचे लक्षण असू शकते. हा आजार होतो, तेव्हा हृदयातील रक्ताचा प्रभाव कमी होतो. यामुळे छातीत दुखण्याची समस्या उद्भवू शकते. वैद्यकीय भाषेत याला इस्केमिक छातीत दुखणे असेही म्हणतात.

पॅनिक अटॅकमुळे छातीत दुखू शकते. या समस्येमध्ये श्वास घेण्यास त्रास होतो, कधीही पॅनिक अटॅक येऊ शकतो. हे खूपच धोकादायक आहे. कधीकधी छातीत दुखणे ॲसिड रिफ्लक्समुळे होते. आम्ल शरीराच्या अन्ननलिकेमध्ये प्रवेश करते. या प्रकारच्या समस्येमुळे पोटदुखीदेखील होऊ शकते.

निदान

# मधुमेहींसाठी हिवाळा त्रासदायक

**स**ध्या हिवाळा सुरू आहे. ऋतू बदलला की वातावरणही बदलते. त्यामुळे विविध आजार डोके वर काढतात. त्याचा सामना लोकांना करावा लागतो. मधुमेहींनी या काळात जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. सध्या जगात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. मधुमेहाच्या रुग्णांना हिवाळ्यात अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. मधुमेहींच्या रक्तातील साखरेच्या पातळीत चढउतार पाहू शकता. त्याची अनेक कारणे असू शकतात. काही गोष्टींची काळजी घेतल्यास मधुमेही रुग्ण हिवाळ्यातही रक्तातील साखरेची पातळी सामान्य ठेवू शकतात. हिवाळयात, जवळजवळ प्रत्येकाला आळसपणा येतो आणि या दिवसात लोकांना अधिक विश्रांती घेणे आवडते. तापमान घसरल्याने आळस वाढतो आणि त्यामुळे शारीरिक हालचालीही कमी होऊ लागतात. अशा परिस्थितीत, कमी शारीरिक हालचाली आणि जास्त खाणे ही साखरेची पातळी वाढवण्यास कारणीभूत आहे. यासोबतच वाढत्या थंडीमुळे शरीरातील ग्लुकोजच्या पातळीवर परिणाम होतो. साखरेची पातळी वाढण्याचे कारण म्हणजे ऑक्सिजनची




कमतरता आणि रक्तवाहिन्यांचे चुकीची रिडींग असू शकते. हिवाळ्यातील जीवनशैलीत कमी शारीरिक हालचालींचा समावेश आहे आणि जास्त कॅलरी वापरल्याने साखरेची पातळी वाढू शकते. हिवाळ्यात मधुमेहींमध्ये रक्तातील साखरेची पातळी असामान्य होते. हे तेव्हाच घडते जेव्हा शरीरात इन्सुलिन योग्य प्रकारे तयार होत नाही किंवा शरीरातील पेशी इन्सुलिनसाठी योग्य प्रकारे काम करत नाहीत. हिवाळ्यात अन्न अधिक चांगले मानले जाते, कारण आजकाल बाजारात अनेक हिरव्या भाज्या उपलब्ध आहेत. म्हणूनच काही लोक काहीही विचार न करता खातात; पण असे करणे शुगर लेव्हलसाठी धोकादायक ठरू शकते. हिवाळ्यात मधुमेही रुग्णांनी आपला आहार मर्यादित आणि आरोग्यदायी ठेवावा. हिवाळ्यात तापमानात घट झाल्यामुळे शरीराचे तापमानही कमी होऊ लागते. त्यामुळे इन्सुलिनची पातळी बिघडू शकते. त्यामुळे आवश्यक असल्यास, बाहेर जा. विनाकारण घराबाहेर पडू नये आणि बाहेर जात असाल तर स्वतःला चांगले झाकून घ्या. तणाव कमी करण्यासाठी प्राणायामची मदत घ्या. स्वतःला एकटे ठेवल्याने नैराश्य येण्याचा धोका वाढतो. कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवा.

जीवनशैली

## स्कूलबस आणि दुचाकीची धडक युवकाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ११ :** बुलढाणा ते चिखली राज्य मार्गावर आज झालेल्या अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. बुलढाणा नजीकच्या येळगाव नजीक एका शैक्षणिक संस्थेची बस आणि दुचाकीची समोरासमोर धडक होऊन ही दुर्घटना घडली.

आज बुधवारी, ११ डिसेंबर रोजी झालेल्या या दुदेवी अपघातात येळगाव जवळील आश्रम शाळेजवळ ही घटना घडली. अपघातात ठार झालेला तरुण हा बुलढाणा तालुक्यातील खूपगाव येथील रहिवासी असून जिवन इंगळे असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे.

बुलढाणा नजीकच्या सागवान येथील शिवसाई ज्ञानपीठ संस्थेची बस आणि मोटरसायकलची समोरासमोर धडकून हा अपघात झाला. अपघात झाल्यावर घटनास्थळी नागरिकांनी धाव घेतली. अपघातात दुचाकीची मोडतोड होऊन युवक जागीच दगावला. काही जवाबदार नागरिकांनी घटनेची माहिती बुलडाणा शहर पोलिसांना दिली. शहर पोलिसांच्या पथकाने येळगाव गाठून घटनास्थळचा पंचनामा केला.

## चोरीचा आरोपी गुन्हे शाखेच्या जाळ्यात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकाने शहर आणि ग्रामीण भागात चोरी करणाऱ्या एका टोळीचा भंडाफोड करून एकाला अटक केली. चौकशीत या टोळीने 5 घरफोडी आणि 2 वाहन चोरी असे एकूण 7 गुन्हे केल्याची माहिती मिळाली.

अमोल चंद्रशेखर चाफेकर (24)असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याचे साथीदार अफरोज शमशाद अंसारी (25) रा. अंबेनगर, पारडी, आरिफ रा. कांजी हाऊस चौक आणि नीलेश विश्वकर्मा रा. नंदनवन झोपडपट्टी हे फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. मोरेश्वर हरकाडे यांच्या घरी चोरी झाली होती. चोरांनी मुख्य दाराचे कुलूप तोडून घरातील एलसीडी टीव्ही व गॅस सिलिंडर चोरून नेला होता. तांत्रिक तपास आणि माहितीच्या आधारावर पथकाने अमोल चाफेकर याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. सखोल चौकशी केली असता अमोलने साथीदारांसोबत मिळून नंदनवन, वाठोडा, कपिलनगर आणि कन्हान ठाण्यांतर्गत आणखी 4 घरफोड्या केल्याची माहिती दिली. तसेच पाचपावली आणि हुडकेश्वर ठाण्यांतर्गत दोन दुचाकी वाहन चोरी केल्याचेही सांगितले.

# नकली औषधांनी समाजस्वास्थ धोक्यात

### लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार!

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ११ :** वाममार्गाने पैसा कमावण्यासाठी स्वतःचे माणूसपण विसरून मानवतेशी प्रतारणा करणाऱ्या आरोग्य क्षेत्रातील अपप्रवृतींनी समाजातील लोकांच्या आयुष्याची सौदेबाजी सुरू केलेली आहे. या क्षेत्रातील औषधांचे शासकीय पुरवठादार,विक्रेते आणि आर्थिक महत्वांकांक्षांनी आरोग्य क्षेत्राचा बाजार करणाऱ्या काही डॉक्टरांनी समाजाशी बेइमानी करत लोकांच्या खिशांवर आर्थिक डल्ले मारण्याचे काळे कारनामे सुरू केलेले आहेत.

अस्तित्वातच नसलेल्या देशातील अनेक बनावट कंपन्यांकडून या नकली औषधांचे पुरवठे होत असून ही अत्यंत संतापजनक बाब आहे. शासन आणि सर्वसामान्यांना लूटून आडमार्गाने पापाची माया कमावण्यासाठी रूग्णांचे स्वास्थ संकटात आणण्याचे क्रूर फंडे या अनैतिक साखळीने सुरू केल्याची माहिती पुढे येत आहे.

औषध कंपन्याकडून पुरवठादार आणि सरळ मार्गाने डॉक्टरांना सुध्दा औषधांच्या पॅकेटवर आणि बॉटल्सवर पाहिजे त्या दरांची एम.आर.पी प्रिन्टसह देण्याची आश्वासने दिली जातात. यासाठी आर्थिक हितसंबंधांपासून तर परदेशात वेगवेगळ्या सोई सुविधा पुरविल्या जातात याचेही शोध आरोग्य क्षेत्रातील माहितगारांकडून मिडीया प्रतिनिधींनी लावलेले आहेत.

अवाजवी किंमतीची आणि नकली औषधे बाजारात, शासकीय आणि खाजगी रूग्णालयांना पाठविली जातात. प्रचंड किंमतीतून लूटमार तर होत आहेच.परंतू प्रत्येक जिल्ल्ह्याच्या ठीकाणी उतरणाऱ्या औषधांचे नमुने घेऊन ते लॅबमधून प्रमाणित करून घेण्याची कर्तव्य बांधिलकी सुध्दा



पार पाडली जात नाही. दक्षता घेण्याचीही संवेदनशिलता अन्न व औषध प्रशासन विभागाकडे उरली नसल्याने पैसे खर्च करून वरून मृत्यूलाही निमंत्रण देण्याची संकटे समाजावर ओढवलेली आहेत.

औषधांचे पुरवठादार आणि राज्यभरातील अन्न व औषध प्रशासनाचे मतलबी साटेलोटे हे या भयानक प्रकरणातील मुख्य कारण असल्याचे समजते. समाजजीवनाचे हे असे मारेकरी जागोजागी निर्माण होणे हे एक मोठे सामाजिक दुर्दैव आहे.म्हणून महाराष्ट्र शासनाने या प्रकरणांची गंभीर दखल घेऊन अन्न व औषधे प्रशासन विभाग, पुरवठादार,आणि बेकायदेशीर कंपन्यांच्या चौकशा करून कार्यवाही करावी. प्रत्येक विभाग आणि जिल्ल्ह्याच्या ठीकाणी ही औषधे बाजारपेठा आणि रूग्णालयांमध्ये पसरण्याअगोदर त्यांचे नमुने घेऊन प्रमाणिकीकरण का केले जात नाही याचा शोध घ्यावा. समाजस्वाथ्यावरील भयानक संकटाचे निराकरण करण्यासाठी या प्रकरणी प्राधान्याने लक्ष घालावे, अशी मागणी लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ या समाजाभिमुख राष्ट्रीय संघटनेने मुख्यमंत्री आणि आरोग्य मंत्री तथा राज्य आयुक्तांकडे केली आहे.

लोकस्वातंत्र्यचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम. देशमुख यांनी पाठविलेल्या पत्रातून ही मागणी केली .तसेच अकोला जिल्ह्यासाठी लोकस्वातंत्र्य सामाजिक सेवा संघ या कक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय कृष्णराव देशमुख यांनी अकोला जिल्हाधिकारी, अन्न व औषध प्रशासनाच्या जिल्हा स्तरावरील अधिकारी आणि विभागीय आयुक्तांना या बातमीची पत्रे सादर केली आहे.

अशाच मागण्या लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाच्या राज्यभरातील पदाधिकाऱ्यांनी सुध्दा आपल्या संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेनांव्दारे कराव्यात असे आवाहन संस्थापक-राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम. देशमुख यांनी केले आहे.

रूग्णांच्या जीवांचा खेळ मांडणाऱ्या या भरमसाट किंमतीच्या आणि काही नकली औषधांचे साठे अलिकडेच पकडले गेले आहेत. ही प्रकरणेच औषधी व आरोग्य व्यवसायातील या मतलबी काळ्या बाजारातील यमदुतांच्या चोरट्या मार्गाचे काळे वास्तव दर्शविणारी असून याची पाळेमुळे शासनाने खोदून काढली पाहिजेत. पैसा कमावण्याच्या अघोरी वाम मागार्ने समाजातील लोकांची आयुष्येच हिरावण्याचे राक्षसी प्रयोग होत आहेत.त्याला मानवी जीवनमुल्ये हरविलेल्या काही डॉक्टर नामक काळ्या यमदुतांचाही मोठा सहभाग आहे. अशा संकटजनक परिस्थितीला नियंत्रणात आणावे. जिल्हा आणि विभागीय पातळीवर प्रशासनाला यासाठी सक्रीय करावे अशी सामाजिक अपेक्षांची मागणी लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाने व्यक्त केली आहे.

## विदर्भ गारठला... गोंदिया ९.४



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ :** फेइंगल चक्रीवादळाचे संपूर्ण राज्यावर दाटलेले मळभ आता दूर झाले आहे आणि पुन्हा एकदा राज्याची वाटचाल थंडीच्या दिशेने सुरू झाली आहे.

किमान तापमानाने त्याची किमया दाखवण्यास सुरुवात केली असून हे तापमान झपाट्याने खाली येत आहे. एवढेच नाही तर कमाल तापमानात देखील झपाट्याने घसरण होत आहे. एरवी उन्हाळ्यात तापमानाचा उच्चांक गाठणाऱ्या विदर्भात गोठवणाऱ्या थंडीची सुरुवात झाली आहे. विदभार्तील सर्वाधिक कमी किमान तापमानाची नोंद गोंदिया येथे ९.४ अंश सेल्सिअस इतकी आहे.

गेल्या काही दिवसांपासून नागपूर व संपूर्ण विदर्भावर जमा झालेले ढग आता परतले आहेत आणि थंडी पुन्हा परतू लागली आहे. गेल्या २४ तासांत शहरातील तापमानात तब्बल २.८ अंश सेल्सिअसने घट झाली आहे. किमान तापमान १२ अंश सेल्सिअसवरून १० अंश सेल्सिअसवर आले आहे. गेल्या आठवड्यात बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला होता. त्यामुळे मध्य भारतात ढगाळ वातावरण तयार होऊन किमान तापमान २० ते २१ अंश सेल्सिअसवर पोहचले होते.

आता मात्र शहर व विदभार्तील वातावरण परत एकदा कोरडे झाले आहे. हवामानात प्रचंड बदल झाला आहे. पश्चिमी विक्षोपामुळे उत्तरेकडे होत असलेल्या हिमवृष्टीचा व थंडीचा परिणाम मध्य भारतावरही होऊ लागला आहे. त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून शहरातील तापमानात प्रचंड वेगाने घसरण होत आहे. गेल्या २४ तासात शहरातील किमान तापमान २.८ अंश सेल्सिअसने कमी झाले आहे. तर दिवसाच्या तापमानात देखील घसरण झाली आहे.

रात्रीच नाही तर दिवसादेखील गार वारे वाहत आहेत. त्यामुळे दिवसासुद्धा किंचित गारवा जाणवत आहे. यंदाच्या मोसमातील नागपूरचा नीचांक १० अंश सेल्सिअस इतका आहे.

# बंगला सज्ज, नाव गुलदस्त्यात..

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ :** सोमवार १६ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह विधानसभेतील विरोधी पक्ष नेत्याचा बंगलाही सज्ज झाला आहे, पण अद्याप नेताच न ठरल्याने अनिश्चिता कायम आहे.



दरवर्षी होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाची लगबग नागपुरात सुरू झाली आहे. गुरूवारपासून विधिमंडळाचे सचिवालय नागपुरात सुरू होणार आहे. मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान रामगिरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी देवगिरी आणि अजित पवार यांच्यासाठी विजयगड सज्ज झाले आहे. बंगल्यांची रंगरंगोटी झाली आहे.

त्याच प्रमाणे विधानसभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विधान परिषदेचे सभापती, उपसभापतीं व विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांचे बगलेही त्यांच्या आगमनाच्या प्रतिक्षेत आहे. अपवाद ठरला आहे तो विधानसभेच्या विरोधी पक्ष नेत्यांच्या बंगल्यांचा.

रविभवनातील हा बंगला सर्व सोयींनी सूसज्ज ठेवण्यात आला आहे. तेथे मंडपही टाकण्यात आला आहे, पण अद्याप विरोधी पक्ष नेता न ठरल्याने तेथे नामफलक लावण्यात आला नाही.

२८८ सदस्यांच्या विधानसभेत एकाही पक्षाकडे विरोधी पक्ष नेतेपदासाठी आवश्यक संख्याबळ नाही. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष यांच्या इच्छेवरच विरोधी पक्ष नेत्यांच्या नियुक्तीचा निर्णय अवलंबून आहे.

महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विरोधी पक्षनेता नियुक्ती केली होती. त्याला फडमवीस यांनी सकारात्मक प्रतिसादही दिला होता. परंतु विशेष अधिवेशन आटोपूनही काही दिवस गेले तरी अद्याप याबाबत काहीच हालचाली झालेल्या दिसत नाही.

विरोधी पक्ष नेता नियुक्तीला सत्ताधाऱ्यांनी मान्यता दिल्यास महाविकास आघाडीकडून कोणत्या पक्षाच्या नेत्याचे नाव सूचवले जाईल याबाबतही अनिश्चितता आहे. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते पद शिवसेनेकडे असल्याने विधानसभेतील विरोधी पक्ष नेतेपदावर काँग्रेस किंवा राष्ट्रवादी दावा करू शकते, परंतु राष्ट्रवादीचे सर्वात कमी संख्याबळ आहे.

काँग्रेसकडे यापूर्वी हे पद होते. त्यामुळे सध्याच्या स्थितीत आगाडीत सर्वाधिक सदस्य संख्या (२०) असलेल्या शिवसेना ठाकरे गट या पदासाठी आग्रह धरू शकते. दोन दिवसात याबाबत चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## विरोधी पक्षनेता हवा असेल तरच सरकारला नाव देऊ

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ :** विरोधी पक्षनेते पदासाठी आवश्यक संख्याबळ आमच्याकडे नाही. राज्य सरकारला विरोधी पक्षनेता हवा असल्यास त्या पदासाठी नाव सुचवण्यात येईल अन्यथा नाही, असे माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी येथे स्पष्ट केले. ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.



विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात महाविकास आघाडीची बैठक होईल. त्यात चचेअंती विरोधी पक्षनेतेपदासाठी नाव निश्चित केले जाईल. पण, भारतीय जनता पक्षाला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्यात खरच विरोधी पक्षनेता हवा आहे का? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे नाव सुचवण्यापूर्वी आधी मुख्यमंत्र्यांना विचारले जाईल आणि त्यानंतर नाव सुचवले जाईल. आधीच नाव देऊन उपयोग नाही. आम्ही नाव सुचवायचे आणि तोंडघशी पडायचे, याला काही अर्थ नाही. त्यामुळे मुख्यमंत्री यांना विचारल्यानंतरच नाव दिले जाईल आणि अन्यथा नाही, असेही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

**गटनेता ठरलेला नाही**

काँग्रेसचा गटनेता अद्याप ठरलेला नाही. याबाबतचा प्रस्ताव पक्षश्रेष्ठींकडे पाठवला आहे. पक्षश्रेष्ठींशी बोलणेही झाले असून लवकरच याबाबत निर्णय घेतला जाईल, असेही वडेट्टीवार म्हणाले.

सरकारमध्ये खातेवाटपावरून सुरू असलेल्या गोंधळाविषयी ते म्हणाले, कोणते खाते कोणाला द्यावे हा सत्ताधाऱ्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. पण, शिंदे आणि अजित पवार यांना दिल्लीतील भाजप पक्षश्रेष्ठी जे खाते देतील ते घ्यावे लागेल हे मात्र निश्चित. शिंदे, पवार यांच्या रुसण्या-फुगण्याला काही अर्थ नाही, असेही वडेट्टीवार म्हणाले. कर्नाटक सीमावादावर अंतिम निर्णय घेऊ शकतो. केंद्र सरकारने या प्रकरणात लक्ष घालावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## तीन वर्षीय चिमुकलीवर नराधमाचा लैंगिक अत्याचार

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. ११ :** घाटंजी तालुक्यातील एका गावात तीन वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचाराची मन सुन्न करणारी घटना घडली. आजोबांच्या वयाच्या व्यक्तीने हा अत्याचार केला. ही घटना ७ डिसेंबरला घडली. घटनेच्या दोन दिवसानंतर शेजारी राहणाऱ्या महिलेच्या सतर्कतेने ही घटना उजेडात आली.

अनिल शालिक शेंडे (५४) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. घरापुढे बंद अवस्थेत असलेल्या ऑटो रिक्षात ७ डिसेंबरला पीडित चिमुकली खेळत होती. आई-वडील मजुरीला, तर आजोबा शेळ्या चारण्यासाठी रानात गेल्याने ती एकटीच घरी होती. नेमक्या याच गोष्टीचा फायदा घेत नराधम अनिलने तिला जवळ घेतले. त्यानंतर तिच्याशी विकृत चाळे केले. तिला वेदना असह्य झाल्याने ती रडायला लागली.

तिचे रडणे ऐकून रस्त्यावर बसून असलेल्या महिला ऑटोरिक्षाकडे धावून गेल्या. यावेळी विकृत अनिलने तेथून पळ काढला. दरम्यान, सायंकाळी आई-वडील आणि आजोबा घरी परतले. मात्र, चिमुकलीला आपबिती कथन करता येत नव्हती. दुसऱ्या दिवशी तिची आई शेतात कापूस वेचायला गेली होती. यावेळी शेजारी महिला त्या शेतात पोहोचली. त्यानंतर तिने या घटनेची वाच्यता तिच्याकडे केली.

स्वतःला सावरत तिने घर गाठले. शिवाय पती आणि सासऱ्याला घरी बोलाविले. मुलीसोबत घडलेला प्रकार त्यांच्याकडे कथन केला. त्यानंतर ९ डिसेंबरला रात्री त्यांनी पीडित चिमुकलीला घेऊन घाटंजी पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी तिची वैद्यकीय चाचणी केली. शिवाय नराधम अनिल शेंडे याच्याविरुद्ध भा.न्या.सं. ६५(२) आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

## शांतता राखा... आठवलेंचे आवाहन

■ **वृत्तसंस्था, परभणी, दि. ११ :** परभणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ असलेल्या संविधानाच्या प्रस्ताविकेची काल समाजकंटकाकडून विटंबना करण्यात आली. याच्या निषेधार्थ बुधवारी परभणी बंद ला हिंसक वळण लागलं. परभणीत जाळपोळीची घटना घडली. यानंतर रिपाइंचे नेते रामदास आठवले यांनी आंबेडकरी अनुयायींना महत्त्वाचं आवाहन केलं आहे.

परभणी मराठवाड्यातील महत्वाचं शहर आहे. तिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. कोणी माथेफिरूने संविधान आणि बाबासाहेब यांचा अपमान केला. आरोपी पकडला गेला आहे. मात्र त्याच्या मागे कोण आहे का याची चौकशी व्हावी. मी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी देखील दिल्लीत बोलणार आहे. मी आंबेडकरी अनुयायांना आवाहन करतो की, त्यांनी शांतता राखावी, असं रामदास आठवले म्हणालेत.

परभणीत झालेला प्रकार निंदनीय आहे. बाबासाहेब यांच्याबद्दल सगळ्यांना आदर आहे. अशा संतप्त प्रतिक्रिया येणे अपेक्षित आहे. बाबासाहेब यांच्या पुतळ्या बाबत घडलेली घटना अनेक दिवसांनी घडली आहे. अनेक ठिकाणी बाबासाहेब यांचे पुतळे आहेत. ते उभे करण्यात मराठा समाजाचा देखील मोठा सहभाग आहे. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, शिवाजी महाराज या कोणत्याही महापुरुषाच्या पुतळ्यांची विटंबना होऊ नये. यामामगे ज्याचा हात असेल त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे. मुख्यमंत्री चौकशी करून आरोपींना शिक्षा करतील, असे आठवले म्हणाले.










नागपूर
महासागर
वृत्तसागर
■ गुरूवार, दि. १२ डिसेंबर २०२४ ■

## पैशाच्या जोरावर लोकशाही विकत घेण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



देशात विरोधी पक्षच नको अशी भाजपची भूमिका आहे. त्यामुळे ईव्हीएमच्या माध्यमातून महाराष्ट्रात ऑपरेशन लोटस झाले व आता लोकसभेतही असाच प्रकार सुरु आहे. भ्रष्ट मार्गाने मिळवलेल्या पैशाच्या जोरावर लोकशाही विकत घेण्याचा प्रयत्न म्हणजे ऑपेरेशन लोटस्, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसचे काही खासदार आमच्या संपर्कात असल्याचे वक्तव्य केले होते. त्यावर पटोले यांनी ही टीका केली. पटोले यांनी बुधवारी नागपूरमध्ये प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असा लौकिक असलेल्या भारतातील लोकशाहीला संपुष्टात आणण्याचे पाप केले जात आहे. भाजपा सरकार सर्व यंत्रणांच्या माध्यमातून लोकशाही पायदळी तुडवत असून निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतांवर दरोडा टाकला जात आहे. ग्रामसभा ठराव करून मतपत्रिकेवर मतदान घेण्याची मागणी केली जात आहे. रात्रीत ७६ लाख मते कशी वाढली ते निवडणूक आयोगाने अद्याप सांगितले नाही. असे नाना पटोले म्हणाले.

## १ किलो सोने अन् १८ लाख...
# मुख्य आरोपीला अटक
### गुन्ह्यात वापरलेल्या गाडीसह रोख ७ लाख रुपये जप्त

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** कोंढाळी येथील दरोड्यातील मुख्य आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेकडून अवघ्या चोवीस तासांत अटक करण्यात आली. एक किलो सोने २८ लाखात देतो असे आमिष दाखवून ही फसवणूक करण्यात आली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, नागपूर- अमरावती राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर कोंढाळी जवळील अंकलेश्वर ढाबा येथे ९ डिसेंबरच्या दुपारी गजानन सुखदेव ब्राह्मणे (४३, रा. वरुड, जि. अमरावती) यांना स्वस्त दरात सोने देण्याबाबत आरोपींनी चर्चा केली. जमिनीत मिळालेल्या गुप्त धनातील सोने आपल्याकडे आहे. ते मी तुम्हाला कमी किमतीत विकतो असे सांगत आरोपींनी पिवळ्या धातुचे शिक्के दाखवले.

चर्चेनंतर ब्राम्हणे यांनी १८ लाख रुपये रोख दिले आणि उर्वरित १० लाख रुपये देण्यासाठी गजानन सोने विकणाऱ्या आरोपींसह त्यांच्या एमएच ४३, ऐआर ७३९९ क्रमाकांच्या कारमधून त्याच्या गावी वरूडला जात होता.

आरोपींसोबतच दोन गाड्यांमध्ये त्यांचे साथीदार येत होते. वाटेत चारडोड गावाजवळ आल्या नंतर पाठीमागील गाडीत बसलेल्या साथीदारांनी गजाननला गजाननला मारहाण करून वाहनातून ढकलून दिले आणि १८ लाख रुपये घेऊन पळ काढला.

गजानन सुखदेव ब्राह्मणे हे वरुड येथील रहिवासी आहेत. त्यांचा मासेमारीचा व्यवसाय आहे. महिनाभरापूर्वी गजानन आणि आरोपींनी एक किलो सोन्यासाठी २८ लाख रुपये देण्याचा सौदा झाला होता.

मात्र या दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या काळात कडेकोट बंदोबस्त असल्याने आरोपींनी फियार्दी गजानन यांच्याशी सोन्याच्या देवाणघेवाणीबाबत नंतर सौदा करण्याचे ठरले होते.

घटनेनंतर आरोपींच्या अटकेसाठी गुन्हेशाखेच्या चार तपास पथकांची स्थापना केली होती. तपास पथकाने कसोशीने तपास करीत यातील आरोपी पप्पु उर्फ प्रमोद कृष्णकुमार अवस्थी (वय ५७) याला देवलापार येथून अटक केली. तर आशुतोष प्रमोद अवस्थी (वय २७) याला चोवीस तासाच्या आत अटक केली.

त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली एमएच ४३, एआर ७३९९ ही मर्सिडीज बेंझ गाडी तसेच एमएच ३१, डीव्ही ९९२२ क्रमाकांची शेवरलेट गाडीही जप्त करण्यात आली. तसेच फिर्यादीकडून हिसकावलेल्या १८ लाखांपैकी ७ लाख रोख जप्त केले. या प्रकरणातीत फरार आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

## पहिल्यांदा १२, नंतर १३ आणि आता १५ डिसेंबर....
# फडणवीसांच्या दौऱ्याची तारीख पे तारीख

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

पाच वर्षात तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे नागपूरकर देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दौऱ्याचा मुहूर्त वारंवार टळत आहे. पूर्वी १२ डिसेंबरला ते नागपूरला येणार होते, नंतर ही तारीख १३ डिसेंबर झाली आणि आता १५ डिसेंबर झाली आहे.

फडणवीस मुख्यमंत्री झाल्याने नागपूरच्या भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. कधी ते नागपुरात येतात आणि कधी त्यांचा भव्य स्वागत समारंभ आयोजित केला जातो, असे स्थानिक नेते व कार्यकर्त्यांचे झाले आहे. पूर्वी १२ डिसेंबरला ते येणार म्हणून स्वागत समारंभाची तयारी करण्यात आली होती. स्वागत समिती स्थापन करण्यात आली होती. विमानतळ ते त्यांचे धरमपेठेतील निवासस्थान असा त्यांच्या मिरवणुकीचा मार्ग निर्धारित करण्यात आला होता. मात्र १० तारखेला संध्याकाळी फडणवीस यांच्या दौऱ्यात बदल झाल्याने व ते १२ ऐवजी १३ डिसंबरला येणार, असे शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांनी जाहीर केले. १३ तारखेला फडणवीस यांचा जंगी सत्कार होणार म्हणून कार्यकर्ते कामाला लागले असतानाच ते आता १५ डिसेंबरला येणार असे त्यांच्या स्थानिक कार्यालयाकडून सांगण्यात



आले.

१६ तारखेपासून विधिमंडळाचे अधिवेशन आहे. त्याच्या पूर्वसंध्येला संपूर्ण सरकारच नागपूरमध्ये येते. दिवसभर कॅबिनेटची बैठक, विरोधी पक्षाचे चहापाणी आणि संध्याकाळची पत्रकार परिषद असे बरेच कार्यक्रम दिवसभर असतात. या काळात त्यांचे स्वागत व सत्काराला वेळ मिळण्याची शक्यता कमी आहे.

मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री यांच्या शपथविधीला आठवडा लोटला तरी मंत्रिमंडळाचा विस्तार झाला नाही. सोमवारपासून विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन आहे. त्यापूर्वी विस्तार होणे आवश्यक आहे. त्यामुळे फडणवीस मुंबईत अडकून पडले असावे,अशी स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

अधिवेशन एक आठवडा चालणार आहे, त्यात वाढ झाली तर फडणवीस यांच्या नागपुरातील सत्काराचा मुहूर्त आणखी काही काळ लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

२०२४ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यावर फडणवीस यांचा नागपूरमध्ये जंगी सत्कार करण्यात आला होता. विमानतळापासून तर त्यांच्या धरमपेठेतील निवासस्थानापर्यंत त्यांची मिरवणूक काढण्यात आली होती अशाच प्रकारची तयारी याही वेळी भाजप कार्यकर्त्यांनी केली होती,मात्र वारंवार त्यांच्या दौऱ्याची तारीख बदलत असल्याने कार्यकर्त्यांची निराशा होत आहे.

## सुल्तानवर लावला एमपीडीए

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** अनेक वर्षांपासून गुन्हेगारीत सक्रीय गुंड अब्दुल सुल्तान हनीफ ताजी (25) रा. मोठा ताजबागविरुद्ध पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी एमपीडीए लावला आहे.

सुल्तानविरुद्ध सक्करदरा ठाण्यात खुनाचा प्रयत्न, मारहाण, आर्म्स ॲक्ट, विनयभंग, दंगा, मालमत्तेचे नुकसान करणे, लोकांना धमकावण्यासह अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे नोंद आहेत.

2019, 2021 आणि 2023 साली पोलिसांनी त्याच्यावर सीआरपीसी अंतर्गत प्रतिबंधक कारवाईही केली होती. परिमंडळ क्र. 4 च्या डीसीपींनी त्याला एक वर्षासाठी जिल्ह्यातून तडीपारही केले होते. मात्र सुल्तानमध्ये सुधारणा झाली नाही.

तो सतत गुन्हेगारीत सक्रीय होता. त्याची लगाम कसण्यासाठी सक्करदराचे ठाणेदार अनिल ताकसांडे यांनी गुन्हे शाखेमार्फत एमपीडीएचा प्रस्ताव पोलिस आयुक्तांकडे पाठवला. पोलिस आयुक्तांनी सुल्तानला एक वर्षासाठी नाशिक मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले.

## कर्तव्यावर तैनात असताना डोक्यात घातली गोळी
# वायुसेनेच्या जवानाची आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** वायुसेनेत सेवारत एका जवानाने कर्तव्यावर हजर असताना स्वतःच्या डोक्यात गोळी घालून आत्महत्या केली. ही थरारक घटना बुधवारी पहाटे दोन वाजता उघडकीस आली. जवीर सिंग असे आत्महत्या करणाऱ्या वायुसेनेच्या जवानाचे नाव आहे.

गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत वायुसेनेचे कार्यालय आहे. तेथे जवीर सिंग हे सेवारत होते. मंगळवारी जवीर सिंह हे अल्फा-८ गार्ड ड्युटी करीत असताना पहाटे दोन वाजताच्या सुमारास त्यांनी अचानक शासकीय बंदुकीतून स्वतःच्या डोक्यात गोळी घातली.

गोळी डोक्यात शिरल्यानंतर काही क्षणातच त्यांचा मृत्यू झाला. गोळीचा आवाज ऐकताच मेंटेनन्स कमांड सेंटरमध्ये कार्यरत जवानांनी आवाजाच्या दिशेने धाव घेतली. त्या ठिकाणी जवीर सिंग हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले. त्यांनी लगेच वायुसेनेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली.

काही वेळातच घटनेची माहिती सर्व जवानांना मिळाली. त्यांनीही तेथे धाव घेतली. त्यामुळे एकच खळबळ उडाली. वायुसेनेच्या अधिकाऱ्यांनी गिट्टीखदान पोलिसांना माहिती दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलाश देशमाने यांचे पथक वायुसेना परिसरात दाखल झाले. त्यांनी तेथून मृतदेह ताब्यात घेतला आणि उत्तरिय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात रवाना केला. या प्रकरणी तुर्तास आकस्मिक मृत्यूची नोंद गिट्टीखदान पोलिसांनी केली असून पुढील तपास सुरू केला आहे.

जवीर सिंह हे वायुसेनेत सार्जेंट पदावर कार्यरत होते. त्यांची ड्युटी अल्फा -८ परिसरात होती. गेल्या दोन दिवसांपासून ते तणावात दिसत होते, अशी माहिती त्यांच्या सहकाऱ्यांनी पोलिसांना दिली. त्यांनी तणावातून डोक्यात गोळी घालून आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. मात्र, जवीर सिंह यांच्या आत्महत्येचे नेमके कारण गुलदस्त्यात आहे.

गेल्या वर्षभरात ७३० जवानांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती केंद्रीय मंत्री नित्यानंद रॉय यांनी राज्यसभेत दिली. लष्करी सेवेतील ५५ हजार जवानांनी राजीनामा आणि स्वेच्छानिवृत्ती स्वीकारल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

जवानांच्या आत्महत्येमागे कौटुंबिक वाद, वैवाहिक कलह किंवा घटस्फोट, आर्थिक अडचणी आणि मुलांसाठी अपुरी शैक्षणिक संधी, या आणि इतर विविध कारणांचा समावेश असल्याचे अहवालात म्हटले आहे. तसेच या अहवालात लष्कराच्या अनेक जवानांनी वैयक्तिक कारणांमुळे आत्महत्या केल्याचे निदर्शनास आल्याचेही नमूद करण्यात आहे. यामुळे जवानांच्या आत्महत्या सुरक्षा दल आणि पोलीस विभागासाठी चिंतेचा विषय ठरल्या आहेत.

## ट्रॅव्हल्स बसेसचा ठिय्या अन् वाहतूक कोंडी



■ **नागपूर :** शहरातील गणेशपेठ भागात एसटी महामंडळाचे मुख्य बसस्थानक आहे. येथून विदर्भ आणि अन्य भागासाठी मोठ्या संख्येने बसेस सुटतात. बस स्थानकानजिकचा जाधव चौक ते मोक्षधामकडे जाणारा मार्ग प्रचंड वर्दळीचा आहे. याच मार्गावर एसटीचे एक आगारही आहे. परंतु, हा मार्ग खासगी ट्रॅव्हल्स कंपनीच्या बसेसनी चक्क गिळंकृत केला आहे. या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा विविध ट्रॅव्हल्स कंपनीच्या बसेस उभ्या केल्या जातात. येथेच रस्त्याच्या मधात बसेस ठेवून प्रवासी घेतले जातात आणि सामानही भरले जाते. परिणामी, या मार्गावर वाहतुकीची मोठीच कोंडी होत असून, येथून कॉटन मार्केटकडे जाणाऱ्या एसटी बसेस तसेच खासगी वाहनांना बराच वेळ अडकून पडावे लागते. वाहतूक कोंडीमुळे येथे दररोज वाद होत आहेत. याकडे प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

## प्रवाशाला मारहाण करून लुटले

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** ऑफिसला जाण्यासाठी ऑटोत बसलेल्या व्यक्तीला चालकाने इतर तीन साथीदारांच्या मदतीने लुटले. मारहाण करून सोन्याची चेन लुटली आणि फरार झाले. धंतोली पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा नोंदवून एका आरोपीला अटक केली. इतरांचा शोध सुरू आहे. अशोक मुलचंद मुनेश्वर (35) रा. दंतेश्वरीनगर झोपडपट्टी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

सूर्यकांत उद्धवप्रसाद शुक्ला (36) रा. नरेंद्रनगर हे मंगळवारी सकाळी 8.50 वाजताच्या सुमारास ऑफिसला जाण्यासाठी साई मंदिर बस थांब्यावर प्रवासी वाहनाची प्रतीक्षा करीत उभे होते. या दरम्यान ऑटो त्यांच्याजवळ येऊन थांबला. ऑटोमध्ये चालकासोबत तीन आरोपी बसलेले होते. सूर्यकांतही ऑटोत बसले. प्रवासादरम्यान चालक व इतर तिघांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरीने हिसकावण्याचा प्रयत्न केला. सूर्यकांत यांनी विरोध केला असता आरोपींनी दांड्याने हातपाय व डोक्यावर मारून त्यांना जखमी केले. त्यानंतर त्याची चेन हिसकावून फरार झाले.

सूर्यकांत यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. घटनास्थळाजवळील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ऑटोचा नंबर मिळाला आणि पोलिसांनी अशोकला अटक केली. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

## प्रेयसीचा भाऊ व मित्रावर जीवघेणा हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** एका तरुणाने साथीदारांसोबत मिळून प्रेयसीचा भाऊ आणि त्याच्या मित्रावर जीवघेणा हल्ला केला. ही घटना सोनेगाव पोलिस ठाण्यांतर्गत घडली. मोहित (18) आणि राज (19) अशी जखमींची नावे आहेत.

पोलिसांनी मोहितच्या तक्रारीवरून आरोपींवर विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. सलिल जयस्वाल (19), आदित्य राऊत (19) आणि प्रितम शर्मा (18) तिन्ही रा. गोपालनगर अशी आरोपींची नावे आहेत.

बहिणीचे सलिलसोबत प्रेमसंबंध असल्याची माहिती मोहितला मिळाली होती. त्याने बहिणीचे इंस्टाग्राम तपासले. त्यात सलिल आणि बहिणीमध्ये झालेली चॅटिंग दिसली. मोहितने बहिणीला फटकारत सलिलपासून दूर राहण्यास बजावले. बहिणीने सलिलला ब्लॉक केले. 8 डिसेंबर रोजी मोहितने सलिलला फोन केला. त्याला बहिणीपासून दूर राहण्यास सांगितले. सलिलने त्याला बोलण्यासाठी भेंडे लेआऊटच्या मैदानात बोलावले. मोहित आणि त्याचा मित्र राज तेथे गेले. सलिल, आदित्य आणि प्रितम तेथे आधीपासूनच हजर होते.

चर्चेदरम्यान मोहित आणि सलिलमध्ये वाद झाला. दोघांनीही एकमेकांना शिविगाळ केली. सलीलने साथीदारांसोबत मिळून मोहित आणि राजला मारहाण सुरू केली. या दरम्यान आदित्यने चाकू काढून राजवर हल्ला केला. राजने तेथून पळ काढला. मोहितला मारहाण होताना पाहून स्थानिक नागरिक गोळा झाले. पकडले जाण्याच्या भीतीने तिन्ही आरोपींनी तेथून पळ काढला. मोहितने घटनेची माहिती पोलिसांना दिली. सोनेगाव पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## पत्नीचे सेक्स रॅकेट, पतीचे हुक्का पार्लर
### गुन्हे शाखेने केला भंडाफोड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

गुन्हे शाखेच्या पथकांनी गोपनिय माहितीवरून स्पा सेंटरच्या आड सुरू असलेले सेक्स रॅकेट आणि कॅफेच्या आड सुरू असलेल्या हुक्का पार्लरचा भंडाफोड केला.

चौकशीत दोघांचेही संचालक पती-पत्नी असल्याची माहिती पुढे आली आहे. सीमा अंशुल बावणगडे (36) आणि अंशुल बावणगडे (दोन्ही रा. बुद्धनगर, कमाल चौक) असे आरोपी दाम्पत्याचे नाव आहे.

बजाजनगर ठाण्यांतर्गत लक्ष्मीनगर चौकात हेव्हन स्पा सेंटरमधून सेक्स रॅकेट चालत असून तेथे येणाऱ्या ग्राहकांना आमिष दाखवत तरुणींकडून देह व्यवसाय करून घेतला जात असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा शाखा (एसएसबी)ला मिळाली होती.

या माहितीच्या आधारावर पोलिसांनी आपल्या पंटरला ग्राहक बनवून हेव्हन स्पामध्ये पाठवले. सौदा ठरताच पंटरने पोलिसांना इशारा दिला आणि धाड टाकण्यात आली. आरोपी सीमा स्पा सेंटरमध्ये उपस्थित तीन तरुणींकडून देह व्यवसाय करून घेताना आढळली.

पोलिसांनी तिन्ही पीडित तरुणींना ताब्यात घेतले. सीमाविरुद्ध बजाजनगर ठाण्यात पीटा ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. तिच्याकडून 2 मोबाईल फोन, रोकड, सीसीटीव्हीचे डीव्हीआर आणि इतर साहित्य असा एकूण 37,385 रुपयांचा माल जप्त केला.

दुसरी कारवाई गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथक (एनडीपीएस)ने केली. सदर ठाण्यांतर्गत माऊंट रोडवरील नो हिअर कॅफेमध्ये हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी कॅफेत धाड टाकली.

11 ग्राहक तंबाखू मिश्रित हुक्का पिताना आढळले. पोलिसांनी कॅफे मालक निखिल खुशाल कुमेरिया (31) रा. इतवारी विरुद्ध गुन्हा नोंदविला. तपासात निखिलने कॅफे सीमाचा पती अंशुलला चालविण्यासाठी दिले असल्याची माहिती पुढे आली. सीमा स्पाच्या आड सेक्स रॅकेट चालवत होती, तर तिचा पती अंशुल कॅफेच्या आड हुक्का पार्लर चालवत होता. पोलिसांनी कोटपा ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

**फ्यूजन कॅफेमध्येही धाड**

गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथक (एएचटीयू)ने सीताबर्डी ठाण्यांतर्गत धरमपेठ परिसरातील फ्यूजन कॅफेत धाड टाकून हुक्का पार्लरचा भंडाफोड केला. कॅफेत येणाऱ्या ग्राहकांना हुक्का पिण्याची सुविधा उपलब्ध केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी धाड टाकली असता युवक-युवती हुक्क्याचे सेवन करताना आढळले. पोलिसांनी कॅफे संचालक मयंक गौरीशंकर अग्रवाल (40) रा. खापरीपुरा, इतवारीविरुद्ध कोटपा ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. फ्यूजन कॅफेमध्ये पोलिसांनी यापूर्वीही अनेकदा धाड टाकली आहे.

## भरधाव ट्रकच्या धडकेत तरुणाचा करूण अंत

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :** भरधाव ट्रकने दुचाकीस्वार दोन तरुणांना जबर धडक दिली. यात गंभीर जखमी होऊन एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसऱ्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ही घटना प्रतापनगर पोलिस ठाण्यांतर्गत हिंगणा टी पॉइंटजवळ घडली. बेचन असरफी यादव (32) रा. धनगवळीनगर, बहादुरा रोड असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी ट्रक चालक कृष्णकुमार शाहू याला अटक केली आहे.

मृतक बेचन आणि राकेश मंगळवारी रात्री मोटारसायकलने हिंगणा टी पॉइंट येथून घराकडे जात होते. सुभाषनगरकडे जाताना ट्रकचालक कृष्णकुमार याने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली.

दुचाकीसह खाली पडून दोघेही गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिक मदतीला धावले. प्रतापनगर पोलिस घटनास्थळी पोहोचले. दोघांनाही उपचारार्थ जवळच्या रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून बेचनला मृत घोषित केले.

## मेडिट्रीना ठरले विदर्भातील पहिले पेपरलेस व डिजिटल हॉस्पिटल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

एक रुग्ण दाखल झाल्यापासून त्याला डिस्चार्ज मिळेपर्यंत 75 ते 100 कागद लागतात. सर्व रुग्णालयांचा एकत्र विचार केला तर होणारी अफाट वृक्षतोड थांबविण्याचे ध्येय ठेवून नागपूरचे प्रख्यात न्युरो तज्ञ डॉक्टर समीर पालतेवार यांनी त्यांचे हॉस्पिटल पूर्णपणे पेपरलेस करण्याचा निर्णय घेतला.

असा निर्णय घेऊन तो अमलात आणणारे डॉक्टर समीर पालतेवार व त्यांची टीम यांचे मेडिट्रीना इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस हे विदर्भातील पहिले पेपरलेस व डिजिटल रुग्णालय ठरले आहे.

एका झाडापासून वीस हजार कागदांचे पाने बनतात. नागपुरातील एकंदरीत हॉस्पिटलचा विचार केल्यास होणारी वृक्षतोड अफाट आहे व त्याचा परिणाम म्हणजे ग्लोबल



वार्मिंग आहे. ही वृक्षतोड थांबविण्यासाठी डॉक्टर समीर पालतेवार यांनी मेडिट्रीना इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस हे रुग्णालय प्रेस्को टेक्नॉलॉजीचा वापर करीत

### प्रेस्को ॲप उपयुक्त

विदर्भातील पहिले पेपरलेस व डिजिटल रुग्णालय म्हणून निर्माण करण्यात यश मिळविले आहे.

याकरिता मुंबईमधील तीन युवकांनी एकत्र येऊन तयार केलेल्या प्रेस्को ॲपचा यशस्वीरित्या वापर गेल्या तीन वर्षांपासून संपूर्ण भारतात 600 हून अधिक इस्पितळे करीत आहेत.

या टॅबवरील ॲपचा वापर सुलभ आहे. त्यासोबत येणाऱ्या विशिष्ट पेनाने त्यावर लिहिता येते. रुग्णांच्या निरीक्षणासाठी जे विविध प्रकारचे रकाने डॉक्टर्स व नर्सेस यांना भरावे लागतात ते सर्व खूप सोप्या पद्धतीने येथे भरल्या जातात. त्यामुळे हे ॲप वापरण्यास उपयुक्त असून कागदावर लिहिण्याची किंवा प्रिंट काढण्याची गरज नाही.

यामुळे सुमारे 7.5 कोटी कागदांचे एका वर्षात बचत होऊन 20 दशलक्ष पेक्षाही जास्त झाडे वाचली आहेत. शिवाय कागदाद्वारे रुग्णांना होणारा जंतू संसर्ग टाळता येत आहे. प्रेस्को टेक्नॉलॉजी चा वापर करीत मेडिट्रीना इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस हे रुग्णालय विदभार्तील एकमेव पेपरलेस व डिजिटल रुग्णालय ठरण्याच्या दिशेमध्ये डॉक्टर समीर पालतेवार यांना अर्पण पांडे, अमृता शर्मा व टीमने सहकार्य केले आहे.

## १० वर्षापासून ७० टक्के पदे रिक्त, विद्यार्थ्यांची फरफट सुरूच
# शासकीय दिव्यांग संस्थांना अखेरची घरघर

■ सुजाता बंडावार
नागपूर, दि. ११ :
तज्ज्ञ शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सुमारे ७० टक्के पदे गेल्या १० वर्षापासून भरलीच गेली नसल्याने शासकीय दिव्यांग संस्थांतील दिव्यांग विद्यार्थ्यांची फरफट सुरू असून, शासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे या संस्था बंद पडण्याच्या मार्गावर आल्या आहेत.

जिल्ह्यातील शासकीय बहुउद्देशीय दिव्यांग मुलांचे संमिश्र केंद्र सदर, शासकीय दिव्यांग बालविकास गृह, प्रतापनगर तसेच शासकीय दिव्यांगाचे कार्यशाळा सदर अशा नागपूर जिल्ह्यातील तीन शासकीय संस्थांमध्ये एकूण मंजूर पदांच्या ८० टक्के पदे ही गेल्या दहा वर्षापासून रिक्त आहेत.

शासन दरबारी वारंवार पाठपुरावा करूनही ही पदे भरण्यात आली नसल्याने विद्यार्थ्यांच्या अभावी या संस्था बंद होण्याच्या मार्गावर आहेत.

१९६० पासून अस्तित्वात असलेले सदर येथील शासकीय बहु. दिव्यांग मुलांचे संमिश्र केंद्रात एकूण मंजूर २० पदांपैकी १४ पदे २०१२ पासून रिक्त आहेत. यातील सहा पदे भरली असून तीन विशेष शिक्षकांपैकी केवळ एक शिक्षकाचे पद मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी भरले गेले आहे.



त्यामुळे अस्थिव्यंग, मूकबधिर, अंध विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या या संमिश्र केंद्रात अस्थिव्यंग व अंध मुलांच्या ॲडमिशनच नाहीत. ५० विद्यार्थी संख्येची मान्यता असलेल्या या केंद्रात ३८ मूकबधिर विद्यार्थी आहेत. याच परिसरातील शासकीय दिव्यांगाच्या कार्यशाळेत १६ मंजूर पदांपैकी सात पदे रिक्त आहेत.

या कार्यशाळेत स्वयंपाकी, क्लर्क यांची पदे रिक्त आहेत त्यामुळे नजीकच्या केंद्रातूनच जेवणाची गरज भागविली जाते. येत्या मार्च महिन्यात सुतारकाम, फॅशन डिझायनिंगचे शिक्षक व केअर टेकर रिटायर्ड होणार असून ही पदे भरली जाणार नाहीत, अशी भीती येथील शिक्षकांना वाटते.

तसेच शासकीय दिव्यांग बालविकासगृह येथील मंजूर १७ पदांपैकी तब्बल १४ पदे रिक्त आहेत या रिक्त पदांच्या घरघरी मुळे या संस्थांना आवश्यक सोयी सुविधा पुरविण्यात अपयश येत असल्याने त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर होतो. या रिक्त पदांबाबत दिव्यांग आयुक्तालय पुणे येथे सतत पाठपुरावा करूनही ही पदे भरण्यात आलेली नाहीत. त्यामुळे शासकीय अनास्थेमुळे संस्था बंद होण्याच्या मार्गावर असून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न समोर उभा आहे. शासनाचा समाज कल्याण विभाग या संस्थांबाबत कमालीचा उदासीन आहे.

> जिल्ह्यातील खाजगी अनुदानित व विनाअनुदानित दिव्यांग संस्थांना ना हरकत प्रमाणपत्र देऊन तेथील पदभरतीसाठी दिव्यांग आयुक्तालय पुणे प्रयत्नशील आहे. मात्र दिव्यांगांच्या शासकीय संस्थांकडे शासनाने अनास्था दाखवून येथील पदभरतीकडे पाठ फिरवली आहे. पदे रिक्त झाली की ती वारंवार पाठपुरावा करूनही भरली जात नाही. त्यामुळे योग्य सोयी, सुविधा व शिक्षणाच्या अभावामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर परिणाम होतो परिणामी या संस्था बंद होण्याच्या मार्गावर आहेत.
>
> **प्रवीण मोंढे, अधीक्षक**

> शासकीय दिव्यांग संस्थांमध्ये शासन स्तरावरूनच अनास्था असून वेळोवेळी पाठपुरावा करूनही येथील रिक्त पदे भरण्यात न आल्याने निश्चितच याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेवर होत आहे.
>
> **किशोर भोयर**
> **समाज कल्याण अधिकारी**

## स्वस्त धान्य वाटप रखडले
# सर्व्हर डाऊनचा फटका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
राज्यभरातील सरकारी स्वस्त धान्य दुकानात सरकारकडून धान्याचा पुरवठा झाल्यावरही तांत्रिक अडचणींमुळे वितरण रखडले आहे.

केंद्र व राज्य सरकारकडून दारिद्र्य रेषेखालील गरीब कुटुंबाला सरकारी स्वस्त धान्य दुकानातून निःशुल्क धान्याचे वाटप केले जाते. त्यासाठी संबंधित दुकानाला सरकारकडून महिन्याच्या सुरुवातीलाच आवश्यक राखीव धान्याचा पुरवठा केला जातो.

डिसेंबरमध्येही हा पुरवठा वेळेवर झाला. परंतु, ९ डिसेंबरपर्यंत पुरवठा झालेल्या धान्याची नोंद ई-पॉस यंत्रात झाली नाही. त्यामुळे दुकानदारांना बायोमेट्रिक घेऊन धान्य देता येत नव्हते. हा तांत्रिक घोळ १० डिसेंबरला सकाळी दुरुस्त झाला. परंतु, आता सर्व्हर डाऊन असल्याने एका ग्राहकाला धान्य देण्यासाठी ई-पॉस यंत्रावर लागणारा कालावधी एक ते दीड मिनिटांवरून १५ मिनिटांवर गेला आहे. त्यामुळे तासनतास रांगेत उभे राहूनही ग्राहकांना धान्य उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी आहेत.

राज्यातील एकूण शिधापत्रिकेची संख्या २०१४ च्या तुलनेत ३१ डिसेंबर २०२२ रोजी वाढून २ कोटी ५६ लाख ५५ हजार ३१४ झाली. त्यात दारिद्र्य रेषेखालील ३७ लाख ६१७, ह्यअंत्योदय अन्न योजनाचे २५ लाख ६० हजार ३३५, केशरी प्राधान्य कुटुंबाचे ९० लाख ३५ हजार ५२३, केशरी प्राधान्य कुटुंब शेतकरीचे ८ लाख ८७ हजार ४८१, बिगर प्राधान्य कुटुंबचे ७२ लाख ४४ हजार ३४९, अन्नपूर्णाचे ६३४७, पांढरेचे २२ लाख २० हजार ५६४ शिधापत्रकधारक आहेत.

त्यामुळे २०१४ मध्ये राज्यात दारिद्र्य रेषेखालील (अंत्योदयसह) एकूण ७० लाख ७ हजार ५८९ शिधापत्रक असल्याचे माहितीच्या अधिकारातून सामाजिक कार्यकर्ते संजय अग्रवाल यांनी पुढे आणले.

ही दारिद्र्य रेषेखालील (अंत्योदयसह) शिधापत्रिकांची संख्या २०२२ मध्ये ६२ लाख ६१ हजार ५० होती. त्यामुळे २०१४ च्या तुलनेत २०२२ मध्ये दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रकांमध्ये ५ टक्के घट झाली.

ईपॉस यंत्रावर धान्याचा साठा विलंबाने दर्शवण्यात येत होता. अखेर ती अडचण दूर झाली असून १० डिसेंबरपासून धान्याचा पुरवठा सुरू झाला. परंतु, आता सर्व्हरची समस्या उद्भवत धान्य वाटायला वेळ जास्त लागत असल्याचे राशन दुकानदार संघ, नागपूरचे सचिव रितेश अग्रवाल यांनी सांगितले.



> राष्ट्रीय माहिती-विज्ञान केंद्राद्वारे (एनआयसी) तयार संगणकीय प्रणालीद्वारे देशभरात धान्य वाटप होते. सर्व्हरमध्ये समस्या आल्याने काही काळ त्रास झाला. परंतु, समस्या दूर करण्यात आली असून आता धान्य वाटप होत आहे.
>
> **अनिल बनसोड, उपायुक्त,**
> (पुरवठा), नागपूर विभाग.

## महिला हक्कांसाठी मंत्रीपदाचा राजीनामा देणारे एकमेव मंत्री डॉ. आंबेडकर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
जातिव्यवस्थेने केवळ कामगारांचीच विभागणी केली नाही तर महिलांचे श्रमही दुय्यम मानले गेले. यातून सुटका करून घेण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कायदेशीर प्रयत्न केले. कामगार मंत्री झाल्यावर त्यांनी महिलांसाठी प्रसूती रजा, कामाचे तास, कुटुंब नियोजन यासह अनेक कायदे केले आणि त्यांना शोषणापासून दिलासा दिला. महिलांच्या हक्कांसाठी हिंदू कोड बिल आणले. संसदेत कायदा मंजूर झाला नाही म्हणून त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. महिलांच्या हक्कांसाठी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देणारे ते एकमेव मंत्री होते. ते स्त्रीवादी विचारवंत होते. असे गौरवोद्गार डॉ. विद्या चौरपगार यांनी डॉ. आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागात आयोजित व्याख्यानात व्यक्त केले.



डॉ.आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागात व्याख्यानाचे आयोजन

महापरिनिर्वाण दिनानिमित्त नागपूर विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्ययन व विचारधारा विभागातर्फे 'स्त्रीवादी आंबेडकरवाद' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. अविनाश फुलझेले होते. राज्यशास्त्र विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापिका डॉ. विद्या चौरपगार पुढे म्हणाल्या की, डॉ. आंबेडकरांनी केवळ महिलांच्या हक्कच सांगितले नाही तर त्यांनी स्वतंत्र मजदूर पक्षाच्या जाहीरनाम्यात स्त्रियांसाठी स्वतंत्र तरतूद केली. त्यांनी केवळ दलित महिलांसाठी काम केले नाही तर त्यांचे कार्य देशातील सर्व वर्गातील महिलांसाठी होते. मात्र देशात महिलांवरील अत्याचाराचा प्रश्न जेव्हा येतो तेव्हा प्रस्थापित महिला संघटना नाव बघून घोषणाबाजी करतात.

ते लिंगभेदाशिवाय इतर मुख्य मुद्द्यांवर बोलत नाहीत. याउलट जेव्हा संघर्षाचा प्रश्न येतो तेव्हा दलित महिला समाजातील सर्व घटकांसाठी रस्त्यावर उतरतात. अध्यक्षीय भाषणात डॉ.अविनाश फुलझेले म्हणाले की, डॉ.आंबेडकरांचा स्त्रीवादी दृष्टीकोन त्यांच्या प्रत्येक कामात दिसून येतो.

बाबासाहेबांनी महिलांसाठी स्वतंत्र परिषदा आणि सभा आयोजित केल्या. महिलांचे प्रश्न किती महत्त्वाचे आहेत हे दिसून येते. समता सैनिक दलातही महिलांची स्वतंत्र तुकडी तयार करण्यात आली.

कार्यक्रमाचे संचालन सपना रावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन अशोक जामगडे यांनी केले. कार्यक्रमात डॉ . मोहन वानखडे, डॉ रमेश शंभरकर, डॉ सुभाष नगराळे, डॉ. प्रमोद चिमुरकर, प्रा. मंगेश जूनघरे, प्रा. प्रीती वानखेडे, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## इमारतीवरून पडल्याने पेंटरचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
एका अपार्टमेंटमध्ये पेंटिंगचे काम करताना एक मजूर दुसऱ्या माळ्यावरून खाली पडला. यात त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना गिट्टीखदान पोलिस ठाण्यांतर्गत घडली. राजू रामा भोयर (46) रा. आदर्शनगर, असे मृताचे नाव आहे.

मंगळवारी दुपारी 12.30 वाजताच्या सुमारास राजू दाभाच्या हिमालया सनशाईन अपार्टमेंटच्या दुसऱ्या माळ्यावर पेंटिंगचे काम करीत होता. बाल्कनीत घोडी लावून पेंटिंग करीत असताना त्याचा तोल गेला आणि तो थेट खाली पडला.

गंभीर जखमी अवस्थेत स्थानिक नागरिकांनी त्याला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी मिळालेल्या सूचनेवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करीत तपास सुरू केला आहे.

## यूपीएससीकडून सुधारित वेळापत्रक जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
केंद्रीय लोकसेवा आयोगाने सुधारित वार्षिक वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार एनडीए, एनए १ भरती परीक्षेसाठी अधिसूचना येत्या आठवड्यात प्रसिद्ध केली जाणार आहे. ही अधिसूचना अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध केली जाईल. परीक्षेत बसलेले उमेदवार अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर अधिकृत वेबसाइटला भेट देऊन ते डाउनलोड करू शकतात.

सुधारित वार्षिक कॅलेंडरनुसार राष्ट्रीय संरक्षण अकादमी आणि नौदल अकादमी परीक्षेची अधिकृत अधिसूचना ११ डिसेंबर २०२४ रोजी प्रसिद्ध केली जाईल. भरती परीक्षेसाठी अर्ज करण्याची विंडो ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत खुली राहील. यानंतर अर्जात दुरुस्ती करण्याची संधी दिली जाईल. ही परीक्षा १३ एप्रिल रोजी होणार आहे. दरवर्षी एनडीए आणि एनए परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते. सुधारित वार्षिक दिनदर्शिकेनुसार एनएडी आणि एनए (दोन) परीक्षा १४ सप्टेंबर २०२५ रोजी घेतली जाईल.

परीक्षेची अधिसूचना २८ मे २०२५ रोजी प्रसिध्द केली जाणार आहे. तसेच, १७ जून २०२५ पर्यंत परीक्षेसाठी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. नागरी सेवा पूर्व परीक्षा आणि भारतीय वनसेवा पूर्व परीक्षा २०२५ साठी अर्ज प्रक्रिया २२ जानेवारी पासून सुरू होईल. ११ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज स्वीकारले जातील. ही परीक्षा २५ मे २०२५ रोजी घेतली जाईल.

## परेडदरम्यान कोसळल्याने शिक्षकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
कामठीच्या सैन्य छावणी परिसरात परेडदरम्यान एका एनसीसी शिक्षकाचा मृत्यू झाला. गणेश भामैया कोकनी (49) रा. रायगड, नंदूरबार असे मृताचे नाव आहे.

गणेश एनसीसी प्रशिक्षक होते. ते प्रशिक्षणासाठी नागपूरच्या कामठी येथे सैन्य प्रशिक्षण संस्थेत आले होते. गार्ड रेजिमेंटल सेंटरच्या मैदानात परेड दरम्यान भोवळ आल्याने ते खाली पडले. त्यांना उपचारार्थ कामठीच्या उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

## प्रशासनाच्या गलथानपणामुळे खोळंबले शिक्षकांचे पगार

### तातडीने वेतन अदा करा शिक्षक समितीची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :
शासनाकडून वेतन अनुदान वेळेवर प्राप्त होवून आणि इतर कोणतीही प्रशासकीय व तांत्रीक अडचण नसताना केवळ प्रशासनाची दिरंगाई व गलथानपणामुळे जि.प च्या प्राथमिक शिक्षकांचे नोव्हेंबर महीन्याचे वेतन खोळंबले असल्याने अडचण निर्माण झाली आहे.

तातडीने वेतन अदा करण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे व जिल्हासरचिटणीस निळकंठ लोहकरे यांनी एका निवेदनाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेकडे केली आहे.

माहे नोव्हेंबर 2024 च्या वेतनासाठी शासनाकडून 27 तारखेलाच अनुदान उपलब्ध करून देण्यात आले त्यानुसार शिक्षण विभागाकडून कार्यवाही करण्यात आली परंतू वित्त विभागाच्या दिरंगाईमुळे विहीत कालावधीत कोषागाराकडे सादर करण्यात आले नाही. जि. प. च्या प्रशासना च्या दिरंगाई मुळे वेतनास झालेल्या विलंबामुळे शिक्षकांवर कर्जावरील व्याजाचा अतिरिक्त भुर्दंड बसत असून शिक्षकांची आर्थिक कुचंबणा होत आहे.

त्यामुळे शिक्षकांचे माहेर नोव्हेंबरचे वेतन तातडीने अदा करण्यात यावी अशी मागणी जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे, सरचिटणीस निळकंठ लोहकरे यांचेसह अनिल नासरे, विलास काळमेघ, राजू बोकडे, सुरेश श्रीखंडे , प्रकाश सव्वालाखे , सुरेंद्र कोल्हे , धर्मेंद्र गिरडकर, उज्वल रोकडे , विजय उमक, दिगांबर ठाकरे, अनिल श्रीगिरीवार, सुरेश भोसकर, अनिल वाकडे, अशोक बांते आदींनी केली आहे.

## क्रेनच्या मदतीने जनरेटर चोरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
चोरांनी क्रेनच्या मदतीने रिलायंस रिटेल स्टोअर परिसरात लागलेला मोठा जनरेटर चोरी केला. ही घटना वाडी पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी पवन सेलोकर रा. बेलतरोडीच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला आहे.

वाडी टी-पॉइंटजवळ रिलायंस रिटेलचे आऊटलेट होते. गत दोन महिन्यांपासून हे स्टोअर बंद असून येथील सर्व सामान मिहान येथील वेअरहाऊसमध्ये पोहोचविण्याचे काम सुरू आहे. गत 5 डिसेंबरच्या रात्री अज्ञात आरोपीने स्टोअरच्या बाहेर लागलेले वजनी जनरेटर चोरून नेले. दुसऱ्या दिवशी स्टोअरमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने पवन यांना घटनेची माहिती दिली.

सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता अज्ञात आरोपी क्रेनच्या मदतीने मालवाहूमध्ये जनरेट ठेवून नेताना दिसला. वाडी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. नागपूर शहरात चोरी, घरफोडी आणि तत्सम घटनांचा आलेख चढत असून, चोरटे शिरजोर झाले आहेत.

## नायलॉन मांजा विक्रेत्यांची जोरात धरपकड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
मकर संक्रातीला आणखी महिनाभर वेळ असला तरी शहरात प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री करणारे सक्रीय झाले आहेत. अशात पोलिसांनीही त्यांच्याविरुद्ध मोहीम सुरू केली आहे.

गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी शहरभरात धाडसत्र चालवून नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या 4 जणांवर कारवाई करीत 123 चक्रीसह 3 लाख 81 हजार रुपये किंमतीचा नायलॉन मांजा जप्त केला आहे. शमीम शकील खान (18) रा. आदर्शनगर, प्रतिक राम श्रीवास्तव (18) रा. धनवंतरीनगर, खुशाल शाहू (20) रा. डिप्टीसिग्नल, आकाश शाहू (23) रा. शक्तीमातानगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

**५० चक्रीसह दोघे ताब्यात**

गुन्हे शाखा युनिट 3 चे पथक नंदनवन ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान शमीम आणि प्रतिक दुचाकी वाहनाने संशयास्पदरित्या जाताना दिसले. त्यांना थांबवून झडती घेतली असता एका पोत्यात प्रतिबंधित नायलॉन मांजांच्या 50 चक्री मिळून आल्या. पोलिसांनी मांजा आणि दुचाकीसह 1.55 लाखाचा माल जप्त करून दोघांनाही अटक केली. पुढील कार्यवाहीसाठी त्यांना नंदनवन पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले.

**कारमधून नायलॉन मांजा जप्त**

दुसरी कारवाई युनिट 4 च्या पथकाने केली. मध्यरात्रीच्या सुमारास पथक कळमना ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान खुशाल शाहू नावाचा तरुण एमएच-31/सीएम-2674 क्रमांकाच्या कारने प्रतिबंधित नायलॉन मांजा घेऊन जात असल्याची माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारावर पोलिसांनी चिखली चौकात वरील क्रमांकाची कार अडवली. झडती दरम्यान कारमध्ये 56 चक्री प्रतिबंधित नायलॉन मांजा मिळाला.

पोलिसांनी मांजा आणि कारसह एकूण 1.94 हजारांचा माल जप्त केला. सखोल चौकशीत खुशालने हा मांजा मोमीनपुरा परिसरात राहणाऱ्या अमितचा असल्याची माहिती दिली. पोलिसांनी दोघांवरही पर्यावरण संरक्षण अधिनियमासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. पुढील कार्यवाहीसाठी खुशालला कळमना पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले आहे.

**१७ चक्रीसह तरुणास अटक**

गुन्हे शाखा युनिट 5 चे पथक वाठोडा ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारावर पोलिसांनी सापळा रचून आकाश शाहू नावाच्या तरुणाला ताब्यात घेतले.

झडतीमध्ये त्याच्याजवळ 17 चक्री नायलॉन मांजा मिळाला. चौकशीत त्याने हा माल शाहीद नावाच्या व्यक्तीचा असल्याचे सांगितले. पोलिसांनी आकाश आणि शाहीदविरूद्ध गुन्हा नोंदवून मांजासह 32 हजारांचा माल जप्त केला. पुढील कार्यवाहीसाठी आकाशला वाठोडा पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. शाहीदचा शोध सुरू आहे.

## नागपूर स्टेशन पुनर्विकास प्रकल्पाची प्रगती अद्यावत



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
सेंट्रल रेल्वेच्या महत्वाकांक्षी नागपूर स्टेशन पुनर्विकास प्रकल्पात वेगाने प्रगती होत आहे, ज्यामध्ये प्रकल्पाच्या विविध मुख्य घटकांमध्ये स्टेशनला अत्याधुनिक परिवहन पायाभूत सुविधांमध्ये बदलण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती दिसून येत आहे.

हा व्यापक प्रकल्प, ज्यामध्ये पूर्व आणि पश्चिम स्टेशन इमारतींचे, फुट ओव्हर ब्रिजेस, केंद्रीय हॉल आणि सुधारित सुविधा यांचे पूर्ण आधुनिकीकरण समाविष्ट आहे, विविध महत्वाच्या बांधकाम टप्प्यांमध्ये स्थिर प्रगती सुरू आहे.

पूर्व स्टेशन इमारतीत महत्त्वपूर्ण टप्पे गाठले गेले आहेत, त्यात सामूहिक बेसमेंटचे काम पुर्णत्वास येत असून, आगमन इमारतीचे संरचनात्मक काम पाचव्या मजल्यापर्यंत पूर्ण झाले आहे. छत स्लॅब कास्टिंगचे 60% काम पूर्ण झाले आहे.

प्रस्थान इमारतीमध्ये स्लॅब कास्टिंग पूर्ण झाले असून, अनेक मजल्यांवर ब्लॉकवर्क चालू आहे. बेसमेंट पार्किंगच्या कामात पायाभूत काम 20% पूर्ण झाले असून खोदाई आणि तूटवण कार्य जवळपास पूर्ण होत आले आहे. पश्चिम स्टेशन इमारतीमध्ये देखील महत्त्वपूर्ण प्रगती होत असल्याचे दिसून येते प्रशासकीय ब्लॉक अंतर्गत स्लॅब कास्टिंग दुसऱ्या मजल्यापर्यंत पूर्ण झाले असून उच्चतम मजल्यांवर स्तंभ आणि बीम काम चालू आहे.

बेसमेंट पार्किंग अंतर्गत संरचनात्मक काम पूर्ण झाले असून पार्किंग क्षेत्र हस्तांतरित करण्यासाठी फिनिशिंग काम चालू आहे.

महत्त्वपूर्ण संरचनात्मक कामांमध्ये प्लेटफॉर्म 8 वरील केंद्रीय हॉल आणि उत्तर एफओबीचे पायाभूत काम पूर्ण करण्यात आले आहे. दक्षिण एफओबीच्या पायाभूत खोदाईचे काम निरंतर गतीने सुरू आहे. माल यार्ड आणि प्लेटफॉर्म ठिकाणी तात्पुरते ओव्हरहेड उपकरण बदल कार्य चालू आहे.

हा पुनर्विकास प्रकल्प प्रवासी अनुभव आणि परिचालन कार्यक्षमता महत्त्वपूर्णपणे सुधारण्याचा उद्देश ठेवतो, ज्यामुळे नागपूर स्टेशनाला जागतिक मानकांशी सुसंगत केले जाऊ शकते. सेंट्रल रेल्वे या परिवर्तनशील प्रकल्पाला वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे.

### महिलेचा विनयभंग, आरोपीस अटक

**नागपूर :** दुचाकीस्वार महिलेचा पाठलाग करून विनयभंग करणाऱ्या टवाळखोराला तहसील पोलिसांनी अटक केली आहे. राजेश ढोके (47) रा. तहसील असे आरोपीचे नाव आहे.

पीडित 31 वर्षीय महिला दुचाकी वाहनाने मुलीला शिकवणीतून आणण्यासाठी जात होती. रस्त्यात राजेशने त्यांचा पाठलाग केला आणि आक्षेपार्ह वर्तन केले. 15पीडितेने त्याला फटकारत घटनेची माहिती पोलिसांना दिली.

## अजनी कोचिंग कॉम्प्लेक्समध्ये वातावरणीय जल जनरेटरची स्थापना

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
सततता आणि पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, सेंट्रल रेल्वेच्या नागपूर विभागाने अजनी कोचिंग कॉम्प्लेक्समध्ये २५० लिटर प्रतिदिन क्षमता असलेला वातावरणीय जल जनरेटर यशस्वीरित्या स्थापित केला आहे. हा अत्याधुनिक तंत्रज्ञान नोव्हेंबर २०२४ मध्ये सुरू करण्यात आले, जो विभागाच्या सतत चालू असलेल्या शाश्वत प्रथांशी आणि संसाधन व्यवस्थापनाशी संबंधित आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून थेट वातावरणातून पाणी संकलित करतो, ज्यामुळे एक विश्वासार्ह आणि पर्यावरणास अनुकूल जल




पुरवठा सुनिश्चित होतो. पारंपारिक जल स्त्रोतांवर अवलंबित्व कमी करत, या स्थापनेमुळे रेल्वेच्या जल संसाधनांच्या संरक्षणाचा उद्देश पूर्ण होतो, तसेच परिचालन आणि मानवी गरजा देखील पूर्ण होतात.

हे नाविन्यपूर्ण उपक्रम कोचिंग कॉम्प्लेक्सच्या गरजा पूर्ण करण्यास मदत करण्यासोबतच भारतीय रेल्वेमध्ये संसाधन अनुकूलनाच्या व्यापक मिशनमध्ये योगदान देईल, अशी अपेक्षा आहे. नागपूर विभाग हरित तंत्रज्ञान लागू करण्यासाठी आणि परिचालन कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी कटिबद्ध आहे, ज्यामुळे पर्यावरणीय जबाबदारीसाठी आदर्श निर्माण केला जात आहे.